
म. ग्रं स. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. ११८६
REFBK-0022545

चक्रवाकदेशी

REFBK-0022545



# चक्रवाकदेशी

## प्रकाश गोळे



प्रकाशन-दिन
३० सप्टेंबर १९७८

प्रकाशक
सौ. मालती माटे
विश्वकर्मा साहित्यालय
२०३५/२ सदाशिव पेठ
टिळक पथ, पुणे ४११ ०३०



© प्रकाश गोळे



मूल्य रुपये पंधरा

मुखपृष्ठ छायाचित्र : टी. एन्. ए. पेरूमल
बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या सौजन्याने

रेखाचित्रे : ल. म. कडू

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लि.
४०५ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०

22474

# FOREWORD

The Blacknecked Crane is one of the rarest and least known species of crane in the world Tibet is its major homeland, whence, during the first quarter of the present century, a few pairs were reported by exploring British naturalists as spilling over into the adjoining areas of Ladakh Ladakh is the only region in the Indian subcontinent where this crane is known to breed in small numbers, in the swamps around some of the high elevation lakes In recent years, with the incursion of the Indian Army and other para military agencies into the remotest areas of Ladakh—once considered the safe natural refuges of the crane—and reports of the killing of the birds for food by the Defence personnel, aroused serious concern among nature conservationists in India and abroad for the safety of the species which, due to its scarcity, had already been placed on the international list of birds threatened with extinction

In order to estimate the population in Ladakh, determine its status as an endangered species, and suggest practical measures for its preservation, the World Wildlife Fund – India jointly with the Bombay Natural History Society sponsored a scientific expedition to Ladakh in the summer

of 1976 Shri. Prakash Gole, an enthusiastic and knowledgeable young Poona naturalist and nature photographer—and an experienced Himalayan trekker and mountaineer to boot—was a member of the team of field researchers under my leadership I am happy that Shri Gole has prepared this narrative on the expedition, and feel confident that it will be enjoyed and profitted from by all lovers of unspoilt Nature and the exhilaration of the out-of-doors Happily Ladakh is still one of the few places in the subcontinent which can be enjoyed for its untramelled wildness and solitude And inspite of the picture of bleak desolation it conveys in cold print, it is a land of unique enchantment and peerless grandeur May it long remain so, despite the ominously mounting pressure of international tourism!

Bombay
6 September 1978

**Salim Ali**



# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| एक | श्रीनगर | १२ |
| दोन | झोजी ला | २० |
| तीन | कारगिल | २५ |
| चार | लेह | ३२ |
| पाच | चांग ला | ३८ |
| सहा | पँगाँग | ४५ |
| सात | क्रौंच | ५१ |
| आठ | चुशुल | ५६ |
| नऊ | किआंग | ६२ |
| दहा | डुंगटी | ६८ |
| अकरा | हान्ले | ७५ |
| बारा | पुन्हा क्रौंच | ८० |
| तेरा | पुगा | ८८ |
| चौदा | त्सो कार | ९४ |
| पधरा | चक्रवाक | ९९ |
| सोळा | स्टारत्सापुक त्सो | १०६ |
| सतरा | खिंडीत | ११० |
| अठरा | त्सो मोरीरी | ११७ |
| एकोणीस | मार्मोट | १२५ |
| वीस | परत | १२० |

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
५८६
२२५७५
(स्थळ प्रत)

पंधरा जून

एक

# श्रीनगर

श्रीनगरला येऊन पोहोचलो. पावसाच्या हलक्या सरींनी स्वागत केले. मुबई सोडल्यापासून आभाळ भरलेलेच होते. त्यामुळे उन्हाचा त्रास नाही, गरमी नाही. सवाई माधवपूरजवळचे हिरवे, पोपटी रान पाहून मनाला फार बरे वाटले. जम्मू जवळ आले आणि चातक दिसला वळणाआड पावसाळा येऊन थबकल्याची ही आणखी एक खूण.

गेल्या वर्षीचा जम्मूचा उन्हाळा मी कधीच विसरणार नाही. पण काल जम्मू चक्क थडगार होते. पावसाच्या एक-दोन सरीही पडल्या. सरकारी स्वागत-गृहाच्या खोलीच्या भाड्यात एकदम दुपटीने वाढ झालेली पाहून आमचे 'टेंपरेचर' मात्र वाढले.

सकाळी बसने जम्मू सोडले तेव्हाही पाऊस पडतच होता. गेल्या वर्षी याच दिवसांत अगातून घामाच्या धारा वहात होत्या. उधमपूर. त्यानतर अधिकाधिक हिरवा होत जाणारा प्रदेश, डोंगराची आकाशाच्या दिशेने अधिकाधिक होत चाललेली वाटचाल आणि त्याच्या डोक्या-खाद्यावर वाढलेले दाढीच्या खुंटा-सारखे दुरून दिसणारे, पाईनचे वृक्ष. मुलुख परिचित होता. पुढे तर एका जागी गाजर (कॉंग्रेस गवत किंवा चटक चांदणी) गवत दिसले आणि पुण्याची चरचरून आठवण झाली.

काश्मीरच्या निसर्गाला सुधारणेचे वारे लागणार काय ? एका ठिकाणी पाईन आणि निवडुंग (युफोर्बिया) सुखाने शेजारी नादताना दिसले ! जवाहर बोगदा ओलाडला की मात्र सारी दुनियाच बदलते. निळे आकाश, पांढरी हिमशिखरे,

हिरव्या शेतात नाचणारे आणि झुळझुळत्या पाण्यात मासोळीसारखे विहरणारे सूर्यकिरण पाहून नजर निवते आणि मन भराऱ्या घेऊ लागते.

---

काल इथे आल्याबरोबर सरकारी स्वागतगृहात जागा मिळाल्याने सामान एका जागी लागले. आघोळींचीं गोळी घेण्याची जरूर उरली नाही, सारा शीण धुवून निघाला. आणि झोपेच्या गोळ्यांचा ओव्हरडोस घ्यावा तशी झोप लागली.

सकाळी श्रीनगरमध्ये फेरफटका मारण्यास बाहेर पडणार इतक्यात हुसेन आणि डॉ. विजयन भेटले. त्यांच्या वाढलेल्या दाढ्या आणि तुळतुळीत टकले पाहून ते दोघे जंगली (म्हणजे जगलात हिंडणारे) शास्त्रज्ञ आहेत याची ओळख पटावी. भूतान आणि अदमानच्या जगलातील पक्षि-निरीक्षण ही हुसेनची शिदोरी तर विजयनने कर्नाटक व केरळमधील जगलातून भटकती केलेली आणि बुल-बुलावर पी. एच्. डी. साठी प्रबध लिहिलेला. ते आमच्याच शोधात होते ही त्यानी दिलेली थाप आम्ही खरी मानून घेतली. लडाखमधील पक्षि-निरीक्षणाच्या मोहिमेत मी आणि डॉ. सलीम अली याच्याशिवाय बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसा-यटीचे हुसेन आणि डॉ विजयन आणि झूऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इडियाचे कलकत्ता येथील अधिकारी डॉ. बिस्वास यांचा समावेश झालेला होता. ही मोहीम बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीने पुरस्कारिलेली होती आणि तिला वर्ल्ड वाइल्ड लाइफ फडाचे आर्थिक पाठबळ होते. आमचे नेते होते अर्थात् डॉ. सलीम अली.

डॉ. सलीम अली कालच श्रीनगरला येऊन पोहोचल्याची खबर हुसेनने दिली. श्रीनगरला आल्याआल्याच त्या दोघावरही लष्कराची झडप पडली होती आणि शहरापासून चार मैल दूर असलेल्या 'आर्मी कॅम्प'मध्ये ते लष्कराचा पाहुणचार घेत होते. याचे कारण म्हणजे या आमच्या मोहिमेचे सूत्रचालन भारतीय लष्कराकडे होते. बिचारे डॉ. सलीम अली मात्र आलीशान अतिथिगृहात जम्मू आणि काश्मीर सरकारचा पाहुणचार घेत बसले होते. या सरकारच्या वनविभागाने विमानतळावरच त्याना गाठले आणि मुलकी शासन लष्करापेक्षाही कित्येकदा झटपट हालचाल करू शकते, हे दाखवून दिले. आम्हालाही लष्कराच्या ताब्यात देण्याची व्यवस्था हुसेनने तत्परतेने केली हे सागणे नकोच.

डॉ. सलीम अलींना भेटणे हा आजचा पहिला कार्यक्रम होता. तेच स्मित, तेच सौजन्य, तोच आपलेपणा. पद्मविभूषण आणि जागतिक सन्मान मिळाल्या-बरोबर कोण म्हणत माणूस बदलतो ? डॉ. विश्वासना मात्र प्रथमच पाहिले, इतके दिवस नुसतेच ऐकून होतो, वाचून होतो. एडमड हिलरीच्या बरोबर हिमालयात 'यती ' (स्नो-मॅन) शोधण्याच्या मोहिमेत त्यानी भाग घेतलेला होता. नेपाळ आणि पूर्व हिमालयातील पक्षी हा त्याच्या अभ्यासाचा, संशोधनाचा विषय. हेमिंग्वेसारखा चेहरा-मोहरा आणि तोंडात तसेच अग्निहोत्र. त्यांना घशाखालीही जळजळ हवी असते, हे नतर समजले. डॉ सलीम अलींच्या सहवासात आल्या-पासून दाढी वाढविण्याचा सराव करीत असावेत असा संशय आहे.

मोहिमेतील सारे सदस्य आता एकत्र आले आहेत. काश्मीर सरकारचे प्रतिनिधी रशीद वानी येऊ शकणार नाहीत ही कोणालाही आश्चर्यचकित न करणारी बातमी आज समजली. या गृहस्थांचा बराचसा वेळ युरोप-अमेरिकेत जातो आणि उरलेला नव्या दिल्लीत जातो असे कळले. डॉ. सलीम अलींबरोबर लडाखला येण्यापेक्षा त्याच्यासमवेत छायाचित्र घेण्यात आणि श्रीनगर दूरचित्र-वाणीवर त्याची मुलाखत घेण्यातच ते समाधानी दिसले.

लडाखमध्ये प्रदेश उंच. हवा विरळ. तेव्हा आम्हा दक्षिणी लोकाचा कसा काय निभाव लागणार हा काळजीचा विषय सर्वत्र चर्चिला जात आहे. लडाख-मध्ये वनस्पती जवळ जवळ नाहीतच, त्यामुळे हवेत ऑक्सिजनचे प्रमाण कमी, त्यामुळे माणसास ' पल्मनरी एडिमा ' होण्याचा धोका जास्त, असा हा सिद्धान्त माडणाऱ्याचा दावा आहे. हुसेन आणि डॉ. विजयन याचा यावरचा उपाय म्हणजे प्रत्येकाने कुडीत एक रोपटे लावून ते सतत जवळ बाळगावे !

वरील सिद्धान्ताचा हिरीरीने पुरस्कार करणाऱ्या एक बाई आज डॉ. सलीम अलींना भेटावयास आल्या. मिसेस जयाल – हे त्या बाईंचे नाव – भारत सरकारचे वन्य प्राणी संरक्षणविषयक सचिव श्री. जयाल याच्या या पत्नी. जयालबाईंचे सफाईदार भारतीय इंग्रजी, खास ' कॉन्व्हेंट ' पद्धतीचे उच्चार यावरून त्या दिल्लीतील ' अतिविशाल महिला मडळा 'च्या सदस्य आहेत, हे कळत होते. जयाल कुटुंब नुकतेच लडाखचा दौरा करून परत आले होते. पण बाईंचा एकूण आविर्भाव असा की जणू उत्तर किंवा दक्षिण ध्रुवावरून त्या आताच

परतत आहेत.

डॉ. सलीम अलींसारख्या ७९ वर्षांच्या वृद्धाने लडाखमध्ये जाता कामा नये असे बाईंनी निक्षून बजाविले. तेथल्या विरळ हवेत पाऊल उचलणेही जड जाते, आपल्या हातून एखादी वस्तू जमिनीवर पडली तर ती उचलून हातात घेणेही जमत नाही असे ऐकल्याचे त्या म्हणाल्या. सुदैवाने जीपमधून उतरून पाऊल उचलण्याचा प्रसंग त्यांच्यावर आलाच नाही, हे त्यांच्या बोलण्यावरून समजले. बहुधा त्यांच्या हातून एखादी वस्तू जमिनीवरही पडली नसावी.

झेलमच्या किनाऱ्यावरच्या उंच चिनार वृक्षावरची ग्रे हेरॉन (राखी बगळे) आणि नाइट हेरॉन (निशाचर बगळे) यांची मोठी वसाहत पाहून जुन्या मित्रांना भेटण्याचा आनंद अनुभविला. गतवर्षी त्यांची जानपछान प्रथम झाली. श्रीनगर शहराच्या एवढ्या गजबजलेल्या भागात या बगळ्यांना सुखाने संसार करता येतो ही गोष्ट आश्चर्यचकित करणारी तशीच आनंद देणारीही. आता शेजारच्या एका निष्पर्ण वृक्षावर सायंकाळच्या वेळी शेकडो 'जॅकडॉ' (काश्मीरी कावळे) उतरताना दिसले आणि अहो आश्चर्यम्! आज चक्क पोपटांचा थवा उडताना दिसला. दक्षिणेकडून आलेल्या या घुसखोरांचा काश्मीर सरकारला अजून पत्ता लागलेला नव्हता. पाकिस्तानी घुसखोरांपेक्षा हुशार आहेत बेटे. काश्मीरी फळ-बागांच्या मालकांनो जपून रहा!

दलच्या एका फाट्यावर बांधलेल्या पुलाशेजारी एक जुना तुतीचा वृक्ष आहे त्याच्या ढोलीत काळ्या 'स्टारलिंग' पक्ष्याने केलेले घरटे, आणि त्यातून डोकावणाऱ्या चिमुकल्या चोचीं मी रोज पाहतो आहे. पक्षी आणि पक्षीण पिलांना भरविण्यासाठी आळ्या, कीटक आणीत आहेत. आम्ही थबकून उभे राहिलेले पाहून आपण त्या गावचेच नाही असा आव आणीत दूर जात आहेत; आम्हीसुद्धा जरा मागे जाऊन आमचं त्यांच्याकडे लक्षच नाही असे भासविण्याचा प्रयत्न करीत आहोत. मैनेच्या जातीचा आणि आकाराचा हा स्टारलिंग पक्षी काश्मीर खोऱ्यात भातशेतांतून आणि बागांतून नेहमी दिसतो.

काश्मीर सरकारने जयाल बाईंचा सल्ला अखेर मानला, हे सायंकाळी समजले. उंचीचा आणि विरळ हवेचा सराव होण्यासाठी दोन दिवस सोनामर्गला आणि तीन दिवस कारगिलला काढून मगच लेहला जाण्याबद्दल आम्हाला फर्मावण्यात आले आहे. म्हणजे उद्या आम्ही सोनामर्गला हलणार. आमच्या दिमतीसाठी 'बीकॉन'ने (बॉर्डर एंजिनिअरिंग ॲन्ड कन्स्ट्रक्शन ऑर्गनायझेशन) एक

जोंगा (जीप) आणि एक ट्रक दिला आहे.

अठरा जून

सकाळी बरोबर आठच्या ठोक्यापूर्वीच दोन निळी वाहने आमच्या दारात उभी राहिली. लगबगीने आमचे सामान भरून सलीम अलींना घेण्यासाठी आम्ही ' स्टेट गेस्ट हाऊस 'वर गेलो. काही लष्करी अन् मुलकी अधिकारी तेथे जमले होते. हस्तादोलन, सलाम वगैरे प्रकार चालले होते. कर्मचारी ' टिप 'च्या आशेने घुटमळत होते. ' आप मुसलमान हैं ? ' आम्हा तिघांकडे बघत तिथल्या हेड-वेटर 'ने पृच्छा केली. हुसेनचा प्रश्नच नव्हता. विजयनची वाढलेली दाढी, एखाद्या आफ्रिकी ' चीफ 'कडून उसना आणल्यासारखा दिसणारा भडक जाभळा कोट आणि त्याला शोभणारा काळा रंग यामुळे वेटरला त्याचा संशय आला नाही किंवा त्याला विचारण्याची छाती झाली नाही. माझी मूक संमती मात्र त्याला बरीच संशयास्पद वाटली.

अर्थात हा प्रश्न आम्हाला नवीन नव्हता. हॉटेलात, बाजारात हा प्रश्न आम्ही अनेकदा ऐकला. प्रत्येकाने, म्हणजे मी आणि विजयनने, कोणते नाव धारण करावे याबद्दल चर्चाही केली. नावे बदलल्यावर परिणाम काय होतो, हे पाहण्याचे ठरविले आणि खरेदीचे वेळी पाच सात रुपये किंमत कमी केली जाते हे पाहून आपण योग्य नाव धारण केल्याचे आम्हाला समाधानही झाले !

आमचा निरोप घेताना सामानातल्या एका पुडक्याबद्दल लष्करी अधिकारी विशेष काळजी घेत आहेत ही गोष्ट आमच्या नजरेतून सुटली नाही. या मूल्यवान् पुडक्यात काय आहे म्हणून आम्ही अदबीने चौकशीही केली. त्यात ऑक्सिजन सिलिंडर असल्याचे आम्हाला समजले. न जाणो, वाटेतच आम्हा-पैकी कोणाला विरळ हवेचा त्रास झाला तर ? तो सिलिंडर व्यवस्थितपणे (म्हणजे शक्यतो न वापरता !) पुढील अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्याविषयी आमच्या ड्रायव्हरला पुनः पुन्हा बजाविण्यात आले, आणि आम्ही श्रीनगरचा निरोप घेतला.

ते भव्य चिनार वृक्ष, त्याच्या दाट पर्णराशीतून लकाकणारे उन्हाचे बाण, प्रवाश्यांची धावपळ आणि धडपड शांतपणे पाहणारे दल सरोवर आणि त्यावर सुस्त गेंड्यासारख्या लोळणाऱ्या हाऊसबोटी, वाहतुकीची पर्वा न करता संथपणे पण लष्करी शिस्तीत जाणारी बदकांची सेना आणि नसीम बागेच्या हिरवळीवर

छायाप्रकाशात हुदडणारी गोरी काश्मीरी मुले, अशी क्षणचित्रे तेवढी मनाने नकळत टिपून घेतली.

सफरचंद आणि नास्पतीच्या बागांतून, हिरव्या भातशेतातून प्रवास करीत आम्ही सिंद नदीच्या तीरावर आलो आणि कधी खडकाळ प्रदेशातून तर कधी हिरव्या डोंगरामधून वाट काढीत सोनामर्गच्या चढाला लागलो. आता ढगानी आकाशात गर्दी केली, डोंगर-उतारावर फर वृक्षाची रान माजली, बर्फाच्या प्रस्तराची राक्षसी कबंधे भेडसावू लागली आणि खवळलेली सिंद पात्रातील फत्तरांशी झोंबू लागली.

दबा धरून बसलेल्या वादळाने विजाचे फटकारे हाणीत सोनामर्गला आमच्यावर झडप मारली, पण तिथे न थांबता सिंदवरचा पूल ओलांडून आम्ही टेकड्याच्या कुशीत दडलेल्या 'हॉस' म्हणजे 'हाय आल्टिट्यूड वॉरफेअर स्कूल'चा आश्रय घेतला.

पेट्रोमॅक्सच्या उजेडात, बुखारीच्या (उबेसाठी प्रत्येक काश्मीरी जवळ बाळगतो तसली शेगडी) उबेत मी आता लिहीत बसलो आहे. बाहेर अंधारलं आहे, पावसाची रिपरीप चालूच आहे आणि त्यामुळे गारठा चांगलाच जाणवतो आहे. पण भारतीय लष्कराचा पाहुणचार ही किती सुखाची गोष्ट असते, हे आम्ही सध्या अनुभवतो आहोत. अर्थात बरोबर एखादा पद्मविभूषण किंवा भारतरत्न मात्र अवश्य हवा !

दुपारी एकच्या सुमारास इथे पोहोचलो. विद्यालयाच्या प्रमुखानी आमचे स्वागत केले. खाना सिद्ध करण्याची आज्ञा दिली आणि ऊबदार 'ऑफिसर्स मेस'मध्ये आमच्या गप्पा सुरू झाल्या. लष्करी अधिकाऱ्याच्या मते या गप्पाना फारसा रंग भरला नाही, कारण डॉ. विश्वास सोडले तर आमच्यापैकी कोणीच 'पेय' घेणारे नव्हते. मात्र सौम्य पेयाचा ग्लास हातात धरून कशा-बशा गप्पा मारण्याचा आणि तास दीड तास जेवणाची वाट पाहण्याचा शिष्टाचार आम्ही व्यवस्थित पार पाडला. अडीचच्या सुमारास जेवणघरातून खाड्खाड् बूट वाजवीत प्रमुख वेटर महाशयाचे शानदार आगमन झाले. प्रमुखापुढे 'सावधान' पवित्र्यात उभे राहून त्यानी लष्करी सलाम केला आणि घोषणा दिली, 'श्रीमानजी, खाना तैयार है !' प्रमुखांनी तिकडे फारसे लक्ष नसल्याचे दाखविले पण लष्करी खाक्याची सवय नसलेले आम्ही जेवणघराकडे नजर टाकीत उभे राहिल्याने त्यानीही आपल्या हातातला ग्लास बाजूला ठेवला

आणि आमची सेना जेवणघराच्या दिशेने पुढे सरकू लागली.

जेवण साधेच पण उत्तम होते. शेवटी 'स्वीट डिश'च्या पाठोपाठ व्हिटॅमिनच्या गोळ्यांची तबकेही प्रत्येकापुढून फिरली. नंतर पुन्हा गप्पांचे सत्र. इथे शिक्षणासाठी येणाऱ्या तगड्या, तरुण अधिकाऱ्यांशी यावेळी ओळख झाली. त्यांपैकी काही सकाळचा कार्यक्रम आटपून नुकतेच परतले होते आणि अजूनही गिर्यारोहणाच्या वेषात होते. आजूबाजूच्या काही हिमशिखरांवर त्यांनी गिर्यारोहण केले होते. एक-दोन दिवसात ते एका अवघड वाटेने अमरनाथला जाण्यास निघणार आहेत. शिक्षणक्रम अत्यंत खडतर असूनही त्यांची तयारी आणि उत्साह वाखाणण्यासारखा होता. त्रिशूळ या तेवीस हजार फूट उंचीच्या शिखरावरून 'स्कीइंग' करण्याचा विक्रम करणाऱ्या मेजर व्होराशी या वेळी ओळख झाली.

चहाच्या वेळी इथल्या प्रमुखांनी अचानकपणे आमचा सत्कार केला आणि कोणताही शिक्षणक्रम इथे पूर्ण न करताच आम्हाला विद्यालयाची पदके डकविण्यात आली. इथल्या विद्यार्थ्यांना आमचा नक्कीच हेवा वाटला असणार! सलीम अलींना एक चांदीची तबकडी भेट मिळाली.

संध्याकाळी पाऊस आणि धुके यांचा जोर असल्याने ऊबदार खोलीत 'ऑर्डर्लीशी' गप्पा मारीत आणि चहा ढोशीत बसण्याशिवाय उद्योग नव्हता. रात्रीच्या जेवणास फक्त आम्हीच होतो. नाही म्हणायला आमच्या पंगतीला एका लष्करी अधिकाऱ्याच्या सौ. तेवढ्या होत्या. लडाखमधील विरळ हवेबद्दल आम्हाला भीती दाखविण्यात आली आहे ऐकताच त्यांनी सांगितले की त्या दार्जिलिंगच्या रहिवाशी असल्याने त्यांना विरळ (?) अन थंड हवेचा सराव आहे. त्याचबरोबर आपला लहान मुलगा कसा काटक आणि हुशार आहे, त्याचे शिक्षक आणि आपल्या शेजारणी त्याचं कसं कौतुक करीत असतात, हेही त्यांच्याकडून ऐकावे लागले.

कपाळावर नारिंगी टिळा असलेला, चिमणीच्या आकाराचा आणि रंगाचा पक्षी इथेही दिसला. गेल्या वर्षी याच पक्ष्याने मला बुचकळ्यात टाकले होते. उद्या सलीम अलींकडून हे कोडे सोडवून घेतले पाहिजे.

□

दोन

# झोजी ला

एकोणीस जून

सकाळी न्याहरीनतर पक्षि-निरीक्षणासाठी बाहेर पडलो. हवा सुदर होती. कालच्या हिमवृष्टीमुळे बाजूच्या पर्वताचे माथे पाढरेशुभ्र झाले होते, सकाळच्या उन्हात लखलखत होते. आमच्याबरोबर इथल्या प्रमुखाची दोन शाळकरी मुलेही पक्षी पाहण्यासाठी आली होती. बरोबर लहान मुले असली की सलीम अलींच्या उत्साहाला उधाण येते. त्याना ते स्वत.बरोबर हिंडवतील, पक्ष्यांना कसे ओळखावे हे शिकवतील, त्याच्यासबधी मनोरजक माहिती देतील. मला त्या पोरांचा हेवा वाटला. पक्षि-निरीक्षणाचा पहिलाच धडा सलीम अलींकडून मिळायला भाग्य लागते.

नारिंगी टिळा धारण करणारा तो पक्षी मी सलीम अलींना दाखविला. त्याचे नाव सागितले गेले, ' गोल्ड फ्रंटेड फिंच '. तो लडाखमध्येही आढळतो. म्हणजे आज पहिलाच लडाखी पक्षी दिसला म्हणायचा.

या विद्यालयाचा परिसर म्हणजे एक सुन्दर फुलबाग आहे. वनस्पतिशास्त्र-ज्ञाला तर हे नंदनवनच वाटेल. किती तऱ्हेतऱ्हेची रानफुले या हिरवळीत दडलेली आहेत — प्रिम्युला, बटरकप, ॲनिमोन, फरगेट-मी-नॉट, हिमालयीन तेरडा, आणि शिवाय मला न ओळखता येणारी किती तरी! कुणी गवताखाली दडली आहेत; कुणी गवतावर पहुडली आहेत; कुणी मान उंच करून आजू-बाजूस पाहत आहेत; कुणी वळचणीआडून डोकावत आहेत, कुणी फत्तराच्या आधाराने उभी आहेत; तर कुणी पुढे वाकलेल्या गवताच्या पात्याआड दड-ण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याचा शोध तरी किती घ्यावा? चार पावल

टाका, आणखी एक अनोखी सुंदरी गोषाआडून हळूच डोकावणार शिवाय गोल्ड फ्रंटेड फिंच आणि सोनेरी पखाचा गोल्ड फिंच अशा मोहक पक्ष्यांची या फुलांना सोबत आहे.

लेहकडून येणारा लष्करी वाहनांचा ताफा अकरा वाजता इथे पोहोचला आणि साडेअकरा वाजता पुढे जाण्याचा हुकूम आम्हाला मिळाला. एव्हाना हवा बिघडली होती, बोचरे वारे वाहत होते आणि पावसाची झिमझिम सुरू झाली होती.

नंतर झोजी लापर्यंत सतत चढ, डोळे फिरविणारी उंची आणि खोली, ठिकठिकाणी वाहून गेलेला रस्ता, डोंगर-उतारावरून ओघळलेल्या आणि झिरपणाऱ्या बर्फाच्या भिंती, रस्त्यावरून दुडदुडत आडवे जाणारे पाण्याचे प्रवाह, आणि वारा, धुके, ओली थंडी

दुपारी एकच्या सुमारास आम्ही झोजी खिंडीत पोहोचलो डोंगर-उतारावरून खाली घसरलेली पंचवीस-तीस फूट उंचीची बर्फाची प्रचंड नदी फोडून केलेल्या 'एअर कंडिशंड' रस्त्याने ११,३०० फूट (३,४४२ मीटर) उंचीची ही खिंड आम्ही ओलांडली. नोव्हेंबर ते मार्चपर्यंत ही खिंड बंद असते. अजूनही बर्फाच्या भिंतींमधूनच रस्ता काढलेला होता. पण हिमालयाची प्रमुख रांग ओलांडून लडाखमध्ये शिरण्याचा हा सर्वात सोपा मार्ग. दुसरा मार्ग म्हणजे जम्मूहून किश्तवार आणि तेथून झास्कर पर्वतमाला ओलांडून लडाखमध्ये प्रवेश करणे किंवा मनालीहून रोहतांग व बारा लाचा खिंडी ओलांडून आग्नेयेकडून लडाख गाठणे. मात्र काश्मीरहून ल्हासाला किंवा यारकंद-खोतानला जाणारा प्राचीन व्यापारी मार्ग झोजी लामधूनच जातो. १९४८ साली पाकिस्तानी घुसखोरांनी इथून काश्मीर गाठण्याचा प्रयत्न केला. येथेच रणगाड्यांचे तुंबळ युद्ध झाले. रणगाड्यांचे अवशेष कुठे कुठे विखुरलेले अजूनही दिसतात.

झोजी (हा 'शिव'जी या शब्दाचा अपभ्रंश आहे) खिंड तशी बरीच ऐसपैस आहे. बर्फ वितळले की इथे प्रशस्त कुरणे तयार होत असतील. द्रास नदीचा उगम इथेच आहे. झोजी खिंड ओलांडली म्हणजे जीवशास्त्रदृष्ट्या आम्ही एका विभागातून दुसऱ्या विभागात प्रवेश केला हिमालयाच्या प्रमुख रांगा आणि त्यांचे दक्षिण उतार जीवशास्त्राच्या 'ओरिएंटल रीजन' (पौर्वात्य विभाग) मध्ये मोडतात हा विभाग सोडून आता आम्ही त्याच्या उत्तरेकडील 'पॅलिआर्क्टिक' विभागात प्रवेश करीत होतो. या दोन्ही विभागातील पक्षी व

प्राणिजीवन निरनिराळे आहे.

काश्मीरच्या हिरव्या दुनियेचा इथे आम्ही निरोप घेतला. आता पुढे बोडके डोंगर, शुष्क फत्तर आणि वाळू; सकाळी भाजणारी कडक उन्हे आणि रात्री गोठवणारी थंडी

आम्ही झोजी ला ओलाडली आणि हवा सुधारली. ढग, पाऊस मागे पडले. रस्त्याची स्थितीही सुधारली. हिरव्या कुरणांतून रस्ता धावत होता. कुरणात घोडे चरत होते, त्यांच्या पायाशी लाल चोचीचे पर्वतीय कावळे (चफ) टुणटुणत होते. पार्श्वभूमीला पिवळ्या-जांभळ्या फुलानी आणि हिरव्या गवताने भरलेले डोंगर-उतार होते. झाड किंवा झुडुपही, औषधालासुद्धा दिसत नव्हते. लडाखचे शीत वाळवंट आता सुरू होत होते. आता आम्ही दहा किंवा त्याहून अधिक हजार फूट उंचीवर पोहोचणार असलो आणि थंडीने काकडणार असलो तरी हिम आणि पाऊस याचा स्पर्श आम्हाला क्वचितच होणार होता. चफ हा पर्वतीय कावळा हे जणू या प्रदेशाचे प्रतीक होते.

एका जागी दोन प्रचंड हिमालयीन (ग्रिफॉन) गिधाडाना आमच्या वाहनांनी रस्त्यावरून पळवून लावले. पोटे तुडुंब भरल्यामुळे बिचाऱ्याना उडताही येत नव्हते. अर्थातच यापुढील प्रदेशात या हिमालयीन गिधाडांनाही स्थान नव्हते.

जगात सर्वात जास्त थंडी असलेले गाव कोणते ? हे मला माहीत नाही. पण दुसरा क्रमांक मात्र द्रास या गावाचा लागतो हे मला आज कळले. या लौकिकाला साजेशीच हवा इथे आम्हाला अनुभविण्यास मिळाली. धुळीचे प्रचंड वादळ चालू होते. थंडीही चांगलीच बोचत होती. वाहनातून लष्करी बराकीत शिरताना आमची कोण त्रेधा उडाली. आमचा अपराध एवढाच की दुपारच्या आमच्या जेवणाची इथे व्यवस्था केली होती !

तासाभराने जेव्हा आम्ही पुढे निघालो तेव्हा वाऱ्याचा जोर बराच कमी झाला होता, आणि डोळे उघडे ठेवून आजूबाजूस पाहणे शक्य होते द्रास नदीच्या रुंद आणि पुष्कळच सपाट खोऱ्यात वसलेले द्रास लडाखमधील एक बऱ्यापैकी शहर आहे. इथे इतकी कडाक्याची थंडी असली तरीही इथे डाक बंगला आहे, चहाचे अन् किराणा मालाचे दुकान आहे, शाळा आहे, दवाखाना आहे, सरकारी कचेऱ्या आहेत. जिथे जमीन पुरेशी सपाट आहे तिथे हिरवी शेते आहेत, त्याच्या कडेने पोपलरची उंच झाडे आहेत; डोंगरावरून असंख्य प्रवाह द्रास नदीला येऊन मिळत आहेत आणि त्याच्या कडेने विलोची

गुबगुबीत झाडे आरामात डुलत उभी आहेत. सारा प्रदेश सूर्याच्या कलत्या उन्हात प्रसन्न, हसरा दिसतो आहे.

डोंगर मात्र वैराण, कडकडीत, खडबडीत आहेत. उंच बेलाग कडे आणि गगनभेदी सुळके. असल्या दुर्गम प्रदेशात मागे वळलेल्या बाकदार प्रचंड शिंगाचा डौलदार 'आयबेक्स' (पर्वतीय बकरा) नक्कीच वास्तव्य करून असणार.

द्रासजवळच 'मॅगपाय' दिसला. त्याची अपेक्षा आम्ही करीतच होतो. मॅगपाय दिसायला कुठे सुरुवात होते आणि कुठे तो दिसेनासा होतो, याची नोंद ठेवण्यास सलीम अलींनी आम्हाला बजाविले होते.

'मॅगपाय' हा आणखी एक खास लडाखी पक्षी. जात कावळ्याची, रंग बगळ्याकडून उसना घेतल्यासारखा आणि भरीला लांब शेपूट. कावळ्याने बगळ्यासारखे गोरे होण्यासाठी अंग घासायला सुरुवात केली; त्याला बगळा काही होता आले नाही; त्याचा झाला काळा-पांढरा मॅगपाय! गुण मात्र कावळ्याचेच राहिले.

लवकरच आम्ही द्रास नदीच्या निरुंद घळईत शिरलो. नदी फुफाटत होती. दोन्ही बाजूचे डोंगर जणू अंगावर कोसळण्याच्या पवित्र्यात होते. मध्येच रस्ता नदीच्या पात्राशी लगट करी. तिथे डोंगराच्या सपाटीवर शेत लावलेले दिसे आणि नदीच्या कडेला असत गुलाबी तुऱ्यांनी लहडलेली टॅमरिस्कची झुडुपे. रस्ता जणू हजार भुजांनी नदीला नजराणा देऊ पहात आहे

आता आमचा ताफा एकाने वाढला आहे. आमच्या जोंगापाठीमागे आता एक ॲम्ब्युलन्स आहे आणि तिच्यात एक डॉक्टर आहे. आमचा जोंगा थांबला की ती रुग्णवाहिकाही थांबते, आम्ही निघालो की ती पुढे निघते. सलीम अलींच्यासाठी खास डॉक्टरची सरकारतर्फे नियुक्ती झालेली आहे. सलीम अलींना एकटे कुठेही जाऊ न देण्याचा आदेश डॉक्टरला देण्यात आला असावा. त्यामुळे एखाद्या दगडाचा किंवा झुडुपाचा आडोसा सलीम अलींना शोधावासा वाटला की, आमचा जोंगा थांबतो, पाठोपाठ ॲम्ब्युलन्सही. सलीम अली खाली उतरतात, पाठोपाठ डॉक्टरही. सलीम अलींचा चेहरा हताश डॉक्टर त्यांना काही वेळ नजरेआड जाण्याची परवानगी देतात.

लडाखला इतके परदेशी प्रवासी का भेट देतात? १९७५ साली ५००० येऊन गेले. या वर्षी—१९७६ मध्ये—दहा हजार येतील अशी अपेक्षा आहे.

याचे रहस्य आज समजले. हजारो गुलाब पुष्पानी आमचे स्वागत केले. द्रास नदीची घळई काहीशी रुंदावली होती. डोंगर अजूनही शुष्क, वैराणच होते. पण या भगभगीत डोंगर उतारावरून मध्येच एखादे गुलाबाचे झुडुप फुललेले दिसे. फुले तरी किती ? नुसती फुलेच फुले. हिरवी पाने झुडुपाला नाहीतच इतकी फुले आणि आम्ही कारगिलच्या दिशेने जसजसे पुढे सरकू लागलो, तसतशी या रसरसलेल्या, बहरलेल्या गुलाबाच्या झुडुपाची संख्या वाढतच गेली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला दुसरी हिरवी काडी नाही, पण हजारो गुलाब पुष्पे तुमच्या स्वागताला उभी. असे यथोचित स्वागत प्रवाशाना इतरत्र कुठे मिळणार आहे ? आणि हे सर्व होते रानगुलाब !

घळई आता आणखी रुंदावली. पाहता पाहता सुरू नदी द्रासला येऊन मिळाली आणि त्याचा संयुक्त प्रवाह निघाला सिंधूला भेटायला. नदीच्या दोन्ही बाजूस सपाटीवर आता हिरवीगार शेते लागली. नदीच्या कडेने गोलाकार विलो दिसले, डोंगरउतारावर सरळसोट पोपलर आणि जरदाळूची झाडे डुलू लागली आणि एक सफाईदार वळण घेऊन आमच्या गाड्या कारगिलमध्ये शिरल्या.

□

तीन

# कारगिल

**बावीस जून**

गेले तीन दिवस आम्ही कारगिल येथे तळ ठोकून आहोत, आणि उद्या लेहला जाण्यास निघणार. कारगिल गाव हे लडाखमधील दुसऱ्या क्रमांकाचे गाव म्हणावयास हरकत नाही. अतिशय रम्य परिसर. त्यामुळे मला ते फार आवडले. सुरू नदीचे प्रशस्त खोरे. ती ज्या घळईतून खोऱ्यात शिरते, तिच्या टोकास नून-कून शिखरांचा काही भाग दिसतो. गावाभोवतालचे उच्च डोंगर अगदी बोडके आहेत पण नदीच्या दोन्ही तीरावर विलोची दाट बने आहेत. सकाळच्या वेळी त्यातून रोझफिंच आणि हळद्या (गोल्डन ओरिओल) याचे गोड गाणे ऐकू येते. नदीच्या दोन्ही तीरावर एकावर एक अशा रुंद गच्च्या आहेत आणि या सपाटीवरच घरे आहेत. हिरवीगार शेते आहेत आणि मुख्य रस्ता व दुकाने आहेत. सारे गाव उतारावर वसले आहे. हिरव्या शेतामधून विखुरलेल्या घराचे हे गाव फार सुदर दिसते. शिवाय गावात जरदाळूच्या बागा आहेत आणि हॉटेलाचा धदा जोरात आहे. कारण श्रीनगरहून लेहकडे निघालेल्या प्रवासी बसेस रात्रीच्या मुक्कामाला इथे थाबतात आणि रगीबेरंगी परदेशी प्रवाश्यानी सायकाळी गाव गजबजून जाते.

पूर्वी गावाच्या ईशान्येस असलेल्या उच्च डोंगरावर पाकिस्तानचे लष्करी ठाणे होते. तेथून ते गावावर आणि आसपास तोफा डागीत. पण १९७१ च्या युद्धात पाकिस्तान्याना सुमारे वीस किलोमीटर मागे पिटाळण्यात आले आहे.

कारगिल आहे नऊ हजार फूट उचीवर तेव्हा उची आणि विरळ हवेचा भरपूर सराव इथे करण्याचे हुकूम होते आम्हाला. हे तीन दिवस आम्ही आसपास

भरपूर भटकलो. कोणते नवीन पक्षी दिसतात ते पाहिले. इथला लक्षात येण्याजोगा पक्षी म्हणजे चिमण्या ! चिमण्यानी हा प्रदेश असा जिंकलेला आहे की पाकिस्तान्याना हेवा वाटावा.

आमची व्यवस्था करण्यात आली आहे बांधकाम खात्याच्या विश्रामगृहात, गावाच्या एका टोकाला. पाठीमागे विलोची दाट बने आहेत, दलदल आहे. लोकांच्या प्रातर्विधीचे हे आवडते ठिकाण असल्यामुळे तिथे जाण्याची सोय नाही. पण लाल रोझफिंच पक्ष्याचे कूजन आणि काळ्या-पांढऱ्या मॅगपाय पक्ष्याची कर्कश बडबड तिथून सतत कानांवर येत असते. मॅगपायच्या एका जोडीने आमच्याशी घरोबा केला आहे. मागच्या दलदलीतच त्यांचे काटक्यांचे उंच घरटे आहे. आमच्या विश्रामगृहाचे छप्पर ही त्यांच्या प्रणयक्रीडेची आवडती जागा. तिथे टोकावर ते रोज सकाळ-दुपार येऊन बसतात, मग मादी पंख पसरून, शरीर जमिनीसरसे करून लाडीक सूर काढते. नर तिच्या डोक्यावरून आणि मानेवरून हलकेच चोच फिरवितो, एकमेकांना अगदी बिलगून ती काही वेळ घालवितात आणि शेजारच्या विजेच्या खांबावर उतरून मोठमोठ्याने ओरडून जगालाही आपल्या प्रीतीची ग्वाही देतात. त्यांचा उरलेला वेळ आमच्या स्वयपाकघराच्या आसपास जातो. आम्ही आल्यापासून त्याना पोटाची भ्रांत नाही.

दोन दिवस सकाळी आम्ही पुरकुम गावात पक्षि-निरीक्षण केले. लेह रस्त्यावर वाखा नदीच्या काठचे हे आणखी एक रम्य गाव. बार्लीच्या शेतांत आणि विलोच्या रायात लपलेले. वाखा नदीच्या काठाने काही ठिकाणी किरमिजी आणि फिकट पिवळ्या पाषाणाचे मोठे कडे आहेत, तर काही ठिकाणी चिकण मातीच्या उभ्या भिंती आहेत आणि त्याना हजारो क्षते पडली आहेत गावाच्या पार्श्वभूमीला आहेत पिवळ्या, तपकिरी, जांभळ्या आणि हिरव्या टेकड्या. दगडाचा भुगा आणि रेती यामुळे काही ठिकाणी त्या दुरून अगदी गुळगुळीत दिसतात. त्यांचे रंग ही सगळी त्यांच्या दगडाची किमया आहे. टेकड्यांवर एक झुडूप किंवा गवताचे पाते उगवत नाही. काही ठिकाणी या टेकड्यांच्या कड्याना आणि त्यामधील गुहाना असे विचित्र आकार आलेले आहेत की वाटावे ती आदिमानवाची निवासस्थाने आहेत

पुरकुम गावाचा उल्लेख लडाखच्या इतिहासात येतो. काश्मीरचा राजा गुलाबसिंग याचा वजीर जोरावरसिंग याचा तळ इथे पडला होता. इथूनच त्याने

पुढे लेहवर स्वारी केली. कारगिलप्रमाणे इथेही रात्रीची वीज येते आणि इथेही चिमण्या भरपूर आहेत. त्यावरून गावाचे महत्त्व लक्षात यावे! कारगिलप्रमाणेच इथेही वस्ती मुसलमान. लोक दर्द. बुरख्याचे साम्राज्य. शेतात काम करणाऱ्या स्त्रियांचा फोटो काढण्याचा मी कितीदा प्रयत्न केला. पण परक्या माणसाला पाहताच बुरख्यामागे चेहरे गडप होत. शेताच्या बांधाविरून फुललेल्या जांभळ्या आयरिसच्या ताटव्याचे मात्र भरपूर फोटो घेता आले. गावातील पुरुष नुसता हुक्का ओढतात, कामे करीत नाहीत. ती हौस फक्त बायकानी करायची. हा इथला आणखी एक विशेष.

सलीम अलींच्या सांगण्यावरून हुसेनने इथे एक रोजफिंच पक्षी मारला, नमुना म्हणून. मी हळहळलो. सलीम अलींनी तात्काळ मला पदवी प्रदान केली – 'शाकाहारी पक्षि-निरीक्षक'.

सायकाळी सलीम अलींना भेटावयास लोकाची रीघ लागते. मुलकी आणि लष्करी अधिकारी, गावातली प्रतिष्ठित माणसे आणि इतरही. सलीम अलींना अधिकारीवर्ग म्हणतो, 'डॉक्टरसाब'! या नावाने फसून काही लोक आपली तब्येत दाखवून औषध मागायलाही येतात! या वेळी आमचा उद्योग असतो, गावात भटकणे आणि श्रीनगरहून येणाऱ्या बसेसमधून उतरणारे नवे चेहरे पाहणे.

काल सायकाळी इथल्या एका हॉटेलवाल्याने आम्हाला चहाला बोलाविले होते सलीम अली मुसलमान आहेत हेही कदाचित् आम्हाला बोलावण्याच खर कारण असेल! तो म्हणे गावातला सर्वात श्रीमत माणूस आहे. दिल्ली आणि श्रीनगर येथील अनेक मत्र्याची नावे तो सहजपणे घेत होता. पाकिस्तानी लोक कारगिलवर कसा मारा करीत, याचे त्याने रसभरित वर्णन केले. तो आपल्या उबरठ्यावर बसून शातपणे ते सगळे पाही. या वेळी आसपासच्या घरावर आणि भारतीय लष्करी ठाण्यावर पाकच्या तोफा आग ओकीत. हवेबद्दल बोलणे निघाले तेव्हाही पाकिस्तानमध्ये सध्या हवा कशी आहे, कोणत्या नदीला पूर आला आहे, याची बित्तबातमी त्याला होती.

आज सकाळी नूनकूनच्या रोखाने, सुरू नदीच्या काठाने दहा–पधरा मैल गेलो. दोन्ही बाजूला उच पहाड, टोकदार सुळके आणि तुमच्याकडे तुच्छतेने पाहणारे सरळसोट कडे. पर्वताच्या माथ्यावर आणि बाहूवर मधूनमधून सुंदर हिरवळ, नदीकडे गडगडणारे दगडाचे ओहोळ आणि उतार आणि त्याच्या

पायथ्याशी, नदीच्या दुतर्फा, बागा आणि शेते; त्यात मधूनमधून गुलाबाची बहरलेली झुडपे. मुलूख रमणीय, डोळ्यांना सुखविणारा. पक्षीही भरपूर. एका शिळा साम्राज्यात रेडस्टार्ट पक्ष्याच्या कितीतरी जोड्या घरटी बांधण्यात मग्न दिसल्या. रेडस्टार्ट हा आहे लडाखमधला सर्वसामान्यपणे आढळणारा पक्षी. थंडीच्या मोसमात भारतात सर्वत्र तो आढळतो. शेपूट सतत हलविण्याच्या सवयीमुळे त्याला आपण थिरथिऱ्या म्हणतो. उन्हाळ्यात हिमालयीन प्रदेशात तो घरटे बांधण्यासाठी जातो. हिवाळ्यात आपल्याकडे येणारे रेडस्टार्ट बहुधा लडाखमधूनच येत असावेत.

इथल्या लष्करी अधिकाऱ्यांनी आम्हाला रात्री जेवण दिले. जेवण म्हणजे आधी तास-दीड तास कसला तरी ग्लास हातात धरून कटाळवाण्या गप्पा मारायच्या आणि नंतर उभ्याने जेवण उरकायचे. एक-दोन महाराष्ट्रीय अधिकारी भेटले. जेवताना तोंडी लावतान नितपत मराठी सभाषण झाले. असल्या औपचारिक जेवणाचा मला कंटाळा येऊ लागला आहे.

**तेवीस जून**

सकाळी आठ वाजता लेहकडे निघालो. निरोप द्यायला काही अधिकारीवर्ग आणि मॅगपायची जोडीही हजर होती.

सुरू नदी ओलांडून, एक लहानसा घाट चढून आमच्या गाड्या एका सपाट पठारावर पोहोचल्या. दोन-तीन विमानतळ सहज मावतील एवढे हे विस्तृत पठार. त्यापलिकडे घाट उतरून पुश्कुम गाव आणि त्यानंतर वाखा नदीची निरुद घळई. उजाड डोंगर आणि त्यावर फुललेली गुलाबांची झुडपे. मधूनच एखादे शेत, एखादे घर लागे. तिथे कुपण म्हणून गुलाबाची झुडपे, पण या फुलाचा रंग मात्र पिवळा जर्द.

मुलबेखजवळ घळई रुंदावली, पहाड उंचावले आणि त्यांचे माथे ढगात गडप झाले. नदीच्या दोन्ही बाजूने आकाराने खूपच मोठी अशी शेते आणि मधूनमधून सुबक दुमजली घरे. त्यावर रंगीत कापडे गुंडाळलेली निशाणे बांधलेली. लडाखमध्ये दोन जिल्हे आहेत. एक कारगिल अन दुसरा लेह. कारगिलमध्ये बहुसंख्य शेतात काम करीत होत्या बायकाच. पण धीट; मान वर करून कुतूहलाने तुमच्याकडे पाहणाऱ्या—आणि सुंदर चेहऱ्याच्या. मुसलमान मुलूख सोडून आता आम्ही लडाखी – तिबेटी मुलुखात शिरत

आहोत, याची ही खूण.

गावाच्या पार्श्वभूमीला विलक्षण आकाराचे आणि रंगाचे पहाड. चित्र निर्मात्यांना इथे 'काऊ बॉय' चित्रपट काढण्यासाठी यावयास हरकत नाही

रस्त्याच्या कडेला एका ठिकाणी, शभर-सव्वाशे फूट उंचीच्या प्रचंड पाषाणात एक भव्य पुरुषाकृती कोरलेली आहे. ती मूर्ती आहे मैत्रेयाची. इसवी सन-पूर्व दुसऱ्या शतकातील. लडाखमध्ये बौद्ध धर्माचा प्रवेश झाला त्या काळची.

मुलबेखनंतर मात्र मुलूख अधिकाधिक उजाड होत गेला. नाही म्हणायला बोद खार्बू गावाजवळ पुन्हा एकदा हिरवी शेते आणि झाडे दिसली. १२,२०० फूट (३,७२० मीटर) उंचीची 'नामिक ला' ही खिंड आम्ही ओलांडली. बोद खार्बूजवळच पिवळ्या चोचीच्या पर्वतीय कावळ्याचे (चफ) थवे दिसले तांबड्या चफपेक्षा याचा आकार लहान पण तो त्याच्यापेक्षाही अधिक उंच प्रदेशात आढळतो. हिलरी आणि तेनसिंग यांना एव्हरेस्टवर चढताना पिवळ्या चोचीचा चफ २७,००० फूट उंचीवर आढळला. तेथे त्यांच्या तंबूभोवती पडलेले अन्न पदार्थांचे अवशेष खायला ते यायचे. माणसाला श्वासोच्छ्वास करणेही जेथे जड जाते अशा विरळ हवेत हे पक्षी सहज राहतात, उडतात. काश्मीरमध्ये सोनामर्गला त्यांचे थवेच्या थवे मी पाहिले होते. पण झोजी ला ओलांडल्यानंतर हे चफ प्रथमच दृष्टीस पडत होते.

बुटक्या पण विलक्षण रंगीबेरंगी टेकड्यातून वळणे घेत आम्ही चाललो होतो. वाटेत हुसेनला उंचीचा किंचित त्रास झाला, आणि श्रीनगरपासून जपून आणलेल्या ऑक्सिजन सिलिंडरचा उपयोग करण्यावाचून गत्यंतर उरले नाही. डोंगराच्या उतारावर वसलेल्या लामायुरूचा सुप्रसिद्ध गोम्पा आम्ही दुरून पाहिला; आणि त्याच्या समोरचा हिरवा डोंगरही. या डोंगराच्या पायथ्याशी पिवळ्या, बुटक्या टेकड्यांचे वाळवंट पसरले होते. या टेकड्यांचे आणि डोंगर-उतारांचे रंग असे की, या डोंगराची कातडी कोणी सोलून काढली आहे. येथील पिवळ्या टेकड्या महत्त्वाच्या आहेत. कारण त्यामधून चिकण माती (क्ले) हे उपयुक्त खनिज मिळते.

लामायुरूच्या गोम्पाचे माहात्म्य बरेच आहे. त्याचा धर्मगुरू ल्हासाहून नेमला जातो. लडाखमध्ये तीन गोम्पा फार महत्त्वाचे आहेत. पहिला, लेह-जवळील हिमिस गोम्पा, दुसरा दक्षिणेकडचा हान्ले गोम्पा आणि तिसरा लामायुरूचा गोम्पा. गोम्पा हे गुफा या शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे. या गोम्पा-

मधून लामाची संख्या बरीच असते. कारण प्रत्येक कुटुंबातील धाकटी भावंडे लामा होतात, तर स्थावर मिळकत (आणि बायको देखील) फक्त मोठ्या भावाकडेच जाते.

लामायुरूहून एक पायवाट झास्कर प्रदेशाचे मुख्य ठाणे पदम या गावी जाते.

यानतर पुन्हा एक खिंड 'फोटू ला' उची १३,४७९ फूट फक्त. (४,११० मीटर). श्रीनगर-लेह रस्त्यावरील हे सर्वात उच्च ठिकाण. त्यानंतर पुन्हा बुटक्या पण जांभळ्या रंगाच्या टेकड्या आणि पुढे सिंधू नदीपर्यंत चार-साडेचार मैलाची खडी उतरंड, जणू एखादा सर्पच वळवळत खाली उतरतो आहे असा रस्ता. सर्वात वाईट गोष्ट म्हणजे दोन-अडीच हजार फूट खाली, रस्ता सिंधू नदीच्या घळईत कुठे पोहोचतो आहे हे वरून व्यवस्थित दिसते. म्हणजे डोळे तर फिरतातच, पण ड्रायव्हरच्या हातून जराशी जरी चूक झाली तरी आपले काय होईल, या विचाराने मनही चक्रावून जाते.

ही उतरंड उतरले की रस्ता मिळतो, अत्यत अरुंद घळईतून उफाळत येणाऱ्या एका प्रवाहाला. जणू काळ्या गुहेतून चवताळलेली नागीणच फुस्कारत येते आहे, असे दृश्य. या प्रवाहाला ओलांडून एक वळण घेऊन पुढे गेले की, दरी एकदम विस्तारते आणि फेसाळून, फिस्कारत मजेत चाललेल्या सिंधू नदीचा पांढरट-हिरवा प्रवाह दृष्टीस पडतो.

सिंधू नदीची आणि माझी ही पहिलीच भेट. इथे सिंधू अजून शैशवात आहे. हिमालयाच्या बळकट बाहूंच्या आधाराने बागडते आहे. तिचे प्रौढपण खूप दूर आहे. श्योक, गिलगितसारख्या पर्वतकन्या आणि पजाबातील पचकन्या याची आणि तिची भेट व्हावयाची आहे. सिंधूचा हा बालप्रवाह अल्लड आहे, अवखळ आहे, अज्ञात भविष्याचा ठाव घेण्यासाठी अधीरपणे पुढे चालला आहे.

आता खालत्सी या गावात प्रवेश करण्यासाठी आम्ही सिंधू नदीवरचा पूल ओलांडतो. या ठिकाणी फार प्राचीन काळापासून पूल बाधलेले आहेत. जोरावरसिंगाने एका जुन्या पुलाचे नूतनीकरण केले. भारतीय तंत्रज्ञानी १९६२ साली एका रात्रीत इथे नवीन पूल केला, लष्करी वाहने जाऊ शकतील असा.

सिंधू नदीच्या काठाने खालत्सी आणि निमू या रम्य गावांतून जरदाळूची झाडे आणि हिरवी शेते पहात आपण पुढे जातो आणि एक चढ चढून एका अत्यंत उजाड पठारावर पोहोचतो. उजव्या बाजूला डोंगरांच्या रांगेला एक

प्रचंड भगदाड पडलेले दिसते. ही झास्कर नदीने पाडलेली वळई. पश्चिमेकडील झास्कर पर्वतमालेत उगम पावलेली ही नदी आपली जलसंपदा इथे सिंधूला अर्पण करते. इथे झास्करचा प्रवाह सिंधूपेक्षाही मोठा आहे.

आता मैलोन्‌मैल हे उजाड पठार संपत नाही. मग पुन्हा एक प्रवाह, हिरवी शेते आणि झाडी, पुन्हा उजाड पठार आणि मग एक अत्यंत विस्तीर्ण खोरे. दूरवर उत्तर, ईशान्य आणि आग्नेय क्षितिजे बर्फाच्छादित पर्वतांनी व्यापलेली.

इथे आमच्या गाड्या थांबतात. याच विस्तीर्ण खोऱ्यात लेह कोठेतरी लपलेले असते. इथे पहिल्या स्वागतसमितीला आम्हाला तोंड द्यावे लागते. चहा व सरबत यांचा मारा होतो. मग ही समिती आम्हाला पुढे नेते एका लष्करी अधिकाऱ्याच्या बंगल्यात. तेथे दुसरी समिती आमचा ताबा घेते. चकाचकीत गणवेशातले तुकतुकीत सेनाधिकारी आमच्या मळक्या, अस्ताव्यस्त कपड्यांकडे आणि थकलेल्या, घामट चेहऱ्यांकडे कुतूहलाने पाहतात. त्यांच्या सौजन्याने आणि चहा-बिस्किटाने जरा शीण दूर होतो न होतो तोच आम्हाला सेनाःप्रमुखाचे बोलावणे येते.

एव्हाना अंधार झालेला असतो, थंडी वाजत असते. उद्या सकाळी लेह कसे दिसेल असा विचार करीत आम्ही झाडीत लपलेल्या एका अत्यंत आलीशान अशा तिबेटी वाड्यापुढे थांबतो ही म्हणे पूर्वीची ब्रिटिश रेसिडेन्सी, सध्याची लष्करी अधिकाऱ्यांची खास 'मेस'. जनरल मोलिनसाहेबांशी इथे परिचय होतो. त्यांना स्वतःला वन्य प्राण्यांच्या संरक्षणाबद्दल अतिशय आस्था आहे हे आम्ही ऐकलेलेच असते. त्यांच्याशी गप्पा मारताना ते जाणवतेही. पुन्हा एकदा चहा होतो, मग सलीम अली तिथेच थांबतात आणि बाकीची जनता जाते विश्राम-गृहात विश्रांतीसाठी.

□

चार

# लेह

सत्तावीस जून


आभाळातला चित्रकार एकदा एक चित्र रंगवायला बसला. त्याने आपल्या पुढ्यात जो फलक घेतला, तो एवढा मोठा होता की तो कुठून सुरू झाला आणि कुठे संपला हेच दिसत नव्हते. या फलकावर मग त्याने सुंदर निळे आकाश रंगविले, शिडाच्या गलबतासारखे दिसणारे पांढरे ढग त्या आकाशात सोडून दिले त्याने. आकाशाच्या पार्श्वभूमीवर त्याने हिमशिखरांचे समूह रंगविले. ही हिमपुष्पे ज्यातून वर आली होती, त्या लहान टेकड्यांचे, डोंगरांचे पुंजके त्याच्यापुढे उभे राहिले. या टेकड्यांच्या पायथ्याशी त्याने रंगविली विस्तीर्ण मैदाने. या मैदानांतून धावत होती एक नदी – वळणे वळणे घेत. आकाशाचे आणि हिमशिखरांचे चित्र हृदयात साठवीत. कुंचल्याच्या काही फटकाऱ्यांनी त्याने या नदीच्या काठाने हिरवी शेते निर्मिली. या शेतातून कुठे कुठे सुबक पांढरी घरे उभी राहिली आणि एका उंचशा टेकडीवर त्याने काढला एक राजवाडा – पऱ्या राहतात तसला !

या लेहचा परिसर आहेच मुळी असा एखाद्या चित्रासारखा. मात्र या निसर्गदृश्याच्या अफाटपणाला सीमाच नाही. नजरेत मावेल तेवढे पहावे, नजरेच्या पलिकडचे कल्पनेने उभे करावे. उत्तर, पूर्व आणि दक्षिण क्षितिजावर असंख्य हिमशिखरे; पण क्षितिज त्यांच्याही पलिकडे कुठेतरी टेकलेले. या शिखरांच्या मागेही आणखी शिखरांच्या रांगा असणार – न संपणाऱ्या. या पर्वतांच्या पायथ्याशी पसरलेली, नदीच्या दिशेने उतार असलेली ती अफाट मैदाने. त्यांची रुंदी कदाचित मोजता येईल, पण लांबी आहे न संपणारी ! या

प्रचंड निसर्गदृश्यात सिंधूसारखी नदी कुठे लपली आहे कोण जाणे !

कारगिलकडून येताना एका उंचशा पठारावरून आपण हे अथांग दृश्य प्रथम पाहतो, मग एक छोटीशी घाटी उतरून त्यात प्रवेश करतो सपाट मैदानावरून गाड्या पुढे पुढे धावतात - कुठे चालल्या आहेत ते कळत नाही. रस्त्याच्या कडने दगडांच्या कपच्या रचून केलेली एक लांबलचक भिंत लागते. मग गाड्या दोन टेकड्यांमधल्या खिंडाराच्या दिशेने वळतात, एक छोटी घाटी चढतात आणि पूजेच्या घंटेच्या आकाराची, शिखराला चंद्र डकविलेली एक मोठी वास्तू एकदम पुढे येते; आणि तिच्या बाजूने आपण लेहमध्ये प्रवेश करतो.

दोन टेकड्यांच्या मागे लेह असे बेमालूम दडलेले आहे की त्याचे अस्तित्व दुरून अजिबात जाणवत नाही. त्या खिंडारातून आत शिरलं की प्रथम नजरेत भरतो तो टेकडीवरचा जुना राजवाडा. त्याच्या उंच भिंती टेकडीशी अशा एकजीव झाल्या आहेत की टेकडीच मान उंच करून असंख्य डोळ्यांनी भोवती पाहते आहे, असे वाटावे. या राजवाड्याखाली एका उंचवट्यावर आहे एक बुद्ध गोम्पा आणि टेकडीच्या पायथ्याशी पसरले आहे लेह. एक हमरस्ता आणि त्यापासून निघालेले किंवा त्याला येऊन मिळणारे, मातीच्या घरामधून




लेह मधील हमरस्ता

सैरावैरा धावणारे अरुंद बोळ. डोंगराच्या कडेने येऊन गावात बेदरकारपणे घुसणारा एक प्रवाह किंवा लोंढा - हा गावाचा पाणीपुरवठा. या ओढ्यात लोक पाणी भरतात, कपडे व अंग धुतात, नाके शिंकरतात, काय वाटेल ते करतात. पण तो ओढा आणि इतर लोकही त्याबद्दल एकमेकांना कधी बोलत नाहीत. एका घराच्या भिंतीवर विसावलेला आणि या ओढ्यावर सावली टाकणारा एक जीर्ण वृक्ष दाखवून लोक सांगतात की, हा वृक्ष गुरू नानक यानी लावला !

गावातली घराची गजबज ओलांडून पडवीत शिरलो की मात्र दिसतात हिरवीगार शेते, विलोची दाट बने आणि ओल्या हिरवळी, आणि त्यात चरणारे झो, मॅगपाय आणि तुरेवाला हुपो. याक आणि गाय याची संतती म्हणजे झो. झो गाय दूध भरपूर देते.

असे हे लेह मला फार आवडले. विशेषतः हिरव्या शेतात उभी राहिलेली पांढऱ्या भिंतींची, लाकडी, नारिंगी छप्परांची आणि रंगीबेरंगी कापडाच्या गुढ्या उभारलेली तिबेटी घरे आणि पायघोळ झग्याने आपले सर्वांग झाकणाऱ्या आणि तरीही सुंदर दिसणाऱ्या, डोक्यावर चिनी कंदिलासारखी टोपी घालणाऱ्या, रसरशीत, लालबुंद चेहऱ्याच्या आणि आनंदी वृत्तीच्या स्त्रिया. संध्याकाळी मुख्य रस्त्यावर रोज भाजीबाजार भरतो. भाजी विकणाऱ्या आहेत सर्व स्त्रिया तरुण आणि एकजात सुन्दर. एव्हाना लेहचा भाजीबाजार साऱ्या जगात प्रसिद्ध झाला असणार. इथे येणाऱ्या परदेशी प्रवाश्यांनी आणि आम्ही त्याची किती छायाचित्रे घेतली कोण जाणे !

एकूण इथे स्त्री-मुक्ती वर्ष पाळण्याची गरज नाही असे दिसते. बायका बऱ्याच धीट आहेत. दुकानदार बायका, आणि वेटरचे कामही बायकाच करतात. हॉटेलचा धंदा इथे जोरात आहे. परदेशी प्रवाश्यांचे लोंढे दररोज येऊन उतरत आहेत.

अशा या लेहमध्ये येऊन आज आम्हाला चार दिवस पूर्ण झाले. या चार दिवसात लेहच्या परिसरात भरपूर भटकलो. काय करणार ? विरळ हवेचा सराव करण्याचे हुकूम आहेत ना आम्हाला ! टेकडीवरचा जुना राजवाडा पहायला काल 'गिर्यारोहण' केले. डोंगर चढल्यावर तरी विरळ हवेचा त्रास होईल अशी अपेक्षा. पण काही नाही. सगळ्याच्या तब्बेती ठणठणीत आहेत. टेकडीवर स्नो फिंच पक्ष्याची जोडी दिसली. खास इकडचा पक्षी. भुरकट, मातकट रंग -- इथल्या दगडामातीच्या रंगाशी जुळता. त्याच्यामागे धावलो, तरीही

त्रास झाला नाही.

टेकडीच्या मागच्या बाजूला पाढऱ्या मातीचे तीस-पस्तीस फूट उंचीचे कडे आहेत आणि त्यांना बरीच विवरे आहेत. लाल चोचीच्या 'चफ' पक्ष्यांनी त्यात घरटी केली आहेत. थोराड अंगाची त्यांची पोरे त्यातून डोकावतात. दर काही मिनिटांनी त्याचे आई-बाप काहीबाही आणून त्यांना भरवितात. जा-ये सारखी चालू असते. लाल चोचीचे आणि काळ्या रंगाचे चफ हिमालयात दहा हजार फूट उंचीवरील प्रदेशात दिसतात. आपल्या कावळ्याचाच हा पर्वतीय जातभाई. पण लेहमध्ये हे चफही फार दिसत नाहीत. कावळ्याचे काम इथे करतो मॅगपाय, त्यामुळे चफना इथे जागा नाही. चफ पक्ष्याची ही वसाहत मला प्रथम सापडली; आणि मी ती वार्ता सलीम अलींना सांगितली. असे काही नवीन दिसले की सलीम अलींना प्रथम सांगण्याची आमच्यात चढाओढ लागते. ते शाबासकी देतात आणि उत्साहाने स्वतः पहायलाही येतात.

विरळ हवेचा आपल्यावर नेमका काय परिणाम होतो आहे हे जरी आम्हाला कळले नाही, तरी इथल्या रहिवाशावर काय परिणाम झाला आहे हे चटकन ध्यानात येत होते. इथे राहणाऱ्या लोकांना बोलायची हौस फार, ही गोष्ट आमच्या पहिल्याच दिवशी ध्यानात आली. वनविभागाचे अधिकारी, विकास-आयुक्त, लष्कराने आमच्यासाठी नेमलेले संपर्काधिकारी या सर्वांच्या शाब्दिक धबधब्यात चार दिवस कसे गेले हे कळलेही नाही.

आमच्या मोहिमेच्या उद्दिष्टाविषयीही प्रत्येकाने आपापल्या परीने निरनिराळी मते बनविली होती. केवळ पक्ष्याचे निरीक्षण करण्यासाठी इतक्या लांब आणि इतका पैसा खर्च करून आम्ही येऊ, ही गोष्ट कोणालाच खरी वाट नव्हती. पक्ष्याची शिकार नाही तरी निदान पक्ष्यांना पकडण्यासाठी किंवा पकडून त्यांच्यावर प्रयोग करण्यासाठी आम्ही आलो असू, असे प्रत्येकाने आपले समाधान करून घेतले होते.

इथल्या सेनाप्रमुखाना पक्ष्यांची व प्राण्याची विशेष आवड. तेव्हा त्यानी आपल्या 'मेस'च्या आवारात एक 'झू' सुरू केला आहे. चकोर, रामचकोर, तिबेटी ससे, चक्रवाक बदके असे काही पक्षी आणि प्राणी त्यात आम्हाला पहायला मिळाले. प्राणिसंग्रहालयासाठी पक्षी आणि प्राणी पकडून देऊन प्रमुखाची मर्जी संपादन करण्याची चढाओढ इतर अधिकाऱ्यांमध्ये लागली आहे की काय! काही दिवसांपूर्वी आमचे संपर्काधिकारी मेजर प्रभाकर यानी

एक 'कियांग' (तिबेटी वन्य घोडा) पकडला. पण पकडताना तो जखमी झाला आणि थोड्याच दिवसांत मेला. आमच्याबरोबर असताना आणखी काही पक्षी किंवा प्राणी पकडण्याचा मोका मिळणार म्हणून ते आनंदित झाले आहेत, असा संशय आहे मला. मला दिसलेली चफ पक्ष्यांची वसाहत पाहाण्यास सलीम अलींबरोबर मेजर प्रभाकरही आले होते. तेथेही कड्यावर चढून चफची पिले पकडण्याचा उद्योग त्यांनी करून पाहिला. पण सुदैवाने तो अयशस्वी झाला.

सेनाप्रमुखांनी 'झू' निर्मिण्याचा अट्टहास धरल्यावर वनविभागप्रमुख कसे मागे राहतील? लेहपासून काही मैलांवर असलेल्या शे या गावी त्यानीही प्राणिसंग्रहालय चालू केले आहे. त्यात चफ, मॅगपाय, घुबड, ससाणा असे पक्षी व भरल हा अतिउंचावरील मेंढा आणि हिमचित्त्याचा बच्चा पहायला मिळाला. बिचाऱ्याना फारच छोट्या पिंजऱ्यातून ठेवलेले होते. इथल्या प्रमुखाना प्राण्यांवर प्रयोग करून पाहाण्याची अनिवार इच्छा. सलीम अलींचा सल्ला मोलाचा ठरेल असे वाटून त्यांनी विचारल,

"भरल आणि लांडगा याची संतती निर्माण होऊ शकेल का?"

सलीम अली उत्तरले "प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. पण चाचणी म्हणून घोडा आणि उंट या पासून काय निर्माण होते तुम्ही पहा आणि मग या प्रयोगाला हात घाला!"

वनविभाग प्रमुखानी कोणावर काय प्रयोग केले, हे कळले नाही. पण आमच्यावर जेवणाचा त्यानी जो प्रयोग केला तो खरोखरी अत्युत्कृष्ट होता हे कबूल केलेच पाहिजे.

आज सकाळी सेना प्रमुखाच्या कार्यालयात बैठक झाली आणि मोहिमेचा संपूर्ण कार्यक्रम ठरला. लष्कराच्या परिभाषेत उद्याचा दिवस म्हणजे डी-डे. उद्या आम्ही लेह सोडणार. त्यानंतर सुमारे ४२ दिवसानी आम्ही लेहला परतणार. आमचा प्रवास, राहणे,



भरलचा बच्चा

जेवण-खाण याची सर्व जिम्मेदारी लष्कराने घेतलेली आहे. आमच्या दिमतीला तीन जोंगा (जीप) आणि दोन लहान ट्रक्स आहेत. ते आम्हाला आणि आमच्या सामानाला वाहणार. कडक थंडीस तोंड देता यावे म्हणून कपडे, स्लीपिंग बॅग्ज, तंबू हे सामान आज लष्कराकडून मिळाले. शिवाय आमच्याबरोबर स्वयंपाकी, हरकामे, ड्रायव्हर्स मिळून दहा-एक जवान आहेत. या साऱ्या लवाजम्यानिशी आम्ही उद्या सकाळी नऊ वाजता निघणार. आमची व्यवस्था करण्याविषयी ठिकठिकाणच्या लष्कर प्रमुखाना संदेश आज रवाना झाले. आमच्या बरोबर वायरलेस सेट व ऑपरेटर आहे. सलीम अलींची प्रकृती आणि मोहिमेची प्रगती याविषयी रोजचे ' बुलेटिन ' त्यावरून प्रसारित केले जाणार आहे.

आज सायंकाळी विकास-आयुक्तानी आमच्यासाठी पोलोचा सामना आयोजित केला होता. निळे डगलेवाले विरुद्ध तांबडे डगलेवाले असा हा सामना होता. पूर्वार्धात चेंडूबरोबर घोड्यांना काठीचे तडाखे तितक्याच प्रमाणात खावे लागले. त्यामुळे असेल कदाचित, किंवा घोड्याना विरळ हवेचा त्रास होऊ लागला म्हणून असेल, उत्तरार्धात घोड्यांनी पळण्याचे नाकारले. त्यामुळे खेळाडूचा बराचसा वेळ घोड्याना चेंडूपर्यंत नेण्यातच खर्च झाला. मैदान मात्र प्रेक्षकानी फुलून गेले होते आणि प्रेक्षकांचा उत्साह वाखाणण्यासारखा होता. त्यानंतर तासभर सांस्कृतिक कार्यक्रम झाला. अत्यंत धीम्या हालचाली (विरळ हवेचा परिणाम ?) हे लडाखी नृत्याचे वैशिष्ट्य दिसले.

रात्री अकरापर्यंत लिहीत बसलो आहे. रोज रात्री अकराच्या आत कोणी झोपता कामा नये, असा इथला अलिखित नियम आहे. त्याचे कारण इथला जनरेटर. तो गावाच्या मध्यभागी आहे, आणि मुंबईच्या साऱ्या गिरण्या करणार नाहीत, एवढा आवाज तो एकटा करतो. लेहच्या केंद्रभागापासून या ध्वनिलहरी कानाकोपऱ्यात व्यवस्थितपणे पोचविल्या जातात आणि अकरापर्यंत कोणी झोपणार नाही अशी चोख व्यवस्था आपोआप होते. अकराला हा जनरेटर बंद होतो, वीज जाते, आणि प्रत्येकाची रात्र सुरू होते.

□

पाच

# चांग ला

अठ्ठावीस जून

चार जोंगा आणि दोन ट्रक्स काल संध्याकाळीच आमच्या विश्रामगृहाच्या आवारात येऊन उभे राहिले होते. आज सकाळी आम्ही त्यात सामान भरले. सलीम अलींनी आपला सिने-कॅमेरा सज्ज केला. मेजर प्रभाकर यांनी ड्रायव्हर व इतर जवानांना सूचना दिल्या आणि वाहनानी कोणत्या क्रमाने आणि कसे जायचे, याचे आवारातल्या आवारात प्रत्यक्षिक घेतले. आमची वाहने कोरी नसली तरी ड्रायव्हर मंडळी अगदी कोरी करकरीत आहेत! म्हणजे लडाखच्या अंतर्भागात त्यांच्यापैकी अजून कोणीच गेलेले नाही. मेजरसाहेबानी त्याची रंगीत तालीम उगीच नाही घेतली!

नऊ वाजता आम्ही लेह सोडले. प्रत्येक जोंगात आम्ही दोघे-दोघे होतो– सलीम अली आणि डॉ. विश्वास, हुसेन आणि विजयन व मी आणि देशपाल. देशपाल हा आहे वन विभागातील रेंजर – लडाखी बोलू शकणारा आणि अंतर्भागातील वन्य जीवनाची विशेष माहिती असणारा. सर्वात पुढे मेजर प्रभाकर यांचा जोंगा होता. आमच्या वाहनाच्या या ‘लष्करी’ हालचालींचे सलीम अलींना एवढे कौतुक वाटले की जागोजागी उतरून त्यानी त्याची ‘फिल्म’ घेतली.

सिंधूच्या काठाने दक्षिण दिशेने आमचा प्रवास सुरू झाला. आता आमच्या उजव्या हाताला म्हणजे पश्चिमेला होती सपाट जमीन, हिरवी शेते आणि त्या-मधून सरळ खांबासारखे उभे ठाकलेले पोपलरचे वृक्ष; त्याही पलिकडे होती सिंधू नदी. तिच्या पात्रापलिकडे जमिनीला पुन्हा चढ होता. विस्तीर्ण मैदाने

पर्वताच्या पायथ्याला भिडली होती आणि त्या पर्वताने हिमाच्छादित माथे नीलाकाशात घुसले होते.

आमच्या डाव्या हाताला मात्र होत्या खडकाळ टेकड्या. भकास आणि भगभगीत. गरम वाफेचे कढ उसासणाऱ्या. कुठे कुठे वाळूच्या शिगा त्याच्या पार कपाळाला टेकल्या होत्या. या टेकड्याच्या वैराण, शुष्क राज्यातच आम्ही आता घुसणार होतो. काय असेल त्याच्या पलिकडे ? मी मनाशी विचार करीत होतो. 'शांग्रिला' सारखे हिरवे खोरे? कडेकपारीत दडलेल्या, काळोख्या, गतशतकाच्या स्मृती दडविणाऱ्या रहस्यमय गुफा ? दिवसा निखाऱ्यासारख्या धगधगणाऱ्या आणि रात्री थंडीने तडकणाऱ्या या वातावरणात कोणते प्राणी आणि पक्षी रहात असतील ? ज्या तिबेटी क्रौंचाचा शोध घेण्यासाठी जग जग पछाडण्याची तयारी होती आमची, तो दिसेल की नाही ? अंतर्भागात संचार करून आलेल्या ज्या ज्या लष्करी अधिकाऱ्यांशी आमची गाठ पडली होती, त्यानी कोणीही तिबेटी क्रौंच पाहिला नव्हता, ऐकला नव्हता. तरी देशपाल छातीठोकपणे सांगत होता की तिबेटी क्रौंच आपल्याला दिसणार.

हा तिबेटी क्रौंच शास्त्राला माहीत झाला बरोबर शंभर वर्षांपूर्वी—१८७६ साली सुप्रसिद्ध रशियन स्थलसंशोधक प्रेझवॉलस्की याने दक्षिण चीनमधील कोकोनोर सरोवराजवळ हे पक्षी प्रथम पाहिले. दहा ते पंधरा हजार फूट उंचीच्या प्रदेशात वावरणाऱ्या आणि तेथेच घरटे बांधणाऱ्या या पक्ष्याबद्दल शास्त्राला फारशी माहिती नाही. चीनकडून माहिती मिळविण्याचे प्रयत्न यशस्वी झालेले नाहीत. चीनशिवाय हा पक्षी सापडतो फक्त लडाखमध्ये. या पक्ष्याची जास्तीत जास्त माहिती मिळविणे हे तर आमच्या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट होते.

माझी विचारमालिका मध्येच तुटली. कारण आमची वाहने एकदम वळली आणि झपाट्याने एक घाट चढू लागली. घाटाच्या सुरुवातीसच एक पाटी होती— 'आकाशमार्गावर तुमचे स्वागत असो. या आकाशमार्गाने जगातील एक अत्यंत उंच खिंड तुम्ही पार करणार आहात. हा आकाशमार्ग आम्ही बांधला. आपला प्रवास सुखरूप पार पडो —बीकॉन' रस्ता उत्तम होता, पण वळणे घेत आमची वाहने जसजशी उंच उंच चढू लागली आणि जमीन खोल खोल जाऊ लागली, तसतशा आमच्या नजरा अधिक भिरभिरू लागल्या. मार्गावर ठिकठिकाणी छोटी छोटी स्मारके बांधलेली होती. हा आकाशमार्ग बांधण्यात ज्यांची जीविते खर्ची पडली त्याची.

पंधरा हजार फुटावर थांबून आम्ही झास्कर पर्वतराजीचे अफाट दृश्य कॅमेऱ्याने टिपून घेतले. पर्वतावरून वाहात येणाऱ्या पाण्याने आता रस्ता जागोजागी खचला होता, वाहून गेला होता. 'बीकॉन'चे जवान त्याची दुरुस्ती करीत होते. काही वेळा वळणेही अतिशय धारदार होती. एक-दोनदा तर मला असा संशय आला की, आमच्या वाहन चालकानी खरोखरीच आकाशगामी होण्याचा विचार केला आहे की काय? माझ्या ड्रायव्हरला – अमरसिंगला – प्रत्येक वळणावर गाडी कड्याच्या अगदी टोकाला नेऊन मग आत वळविण्याची खोड होती. माझ्या नजरेला उचीचा सराव व्हावा असा त्याचा स्तुत्य हेतू असावा, पण गाडी वळणाच्या कडेवर पोहोचली की माझे डोळे आपोआप मिटले जात! घाटात एखाद्या जागी खडा चढ असला की वाहन त्या चढावर पोहोचेपर्यंत हुसेनचा ड्रायव्हर काही गिअर बदलत नसे. मग चढावरून ते वाहन मागे घरंगळू लागे. पाठोपाठ आमची वाहनेही मागे मागे येऊ लागत आणि आम्हा साऱ्याच्या अगावरचे केस ताठ उभे राहत.

सोळा हजार फुटावर आमची वाहने पुन्हा थावली. चाग ला मधून उतरणाऱ्या लष्करी वाहनाच्या ताफ्याला वाट द्यायची होती. इथे दोन लहान बराकी होत्या आणि काही जवान रहात होते. आम्ही वाहनातून खाली उड्या टाकताच चहाचे पेले आमच्या पुढे आले. थडी चांगलीच जाणवत होती. आम्ही पराचे उबदार कोट चढविले, हातमोजे घातले आणि बराकीच्या मागे धबधबणाऱ्या प्रवाहाच्या काठाने निघालो.

काही अतर चालून जातो न जातो तोच मला 'रॉबिन ॲक्सेंटर' दिसला. चिमणीएवढा तपकिरी पक्षी, पण छाती मात्र लालभडक. तोंडात गवताची काडी धरून खडकाखाली घरटे बाधण्यास निघाला होता. दगडाच्या राशीमध्ये याला गवताची काडी मिळाली कुठे, असे मी आश्चर्य व्यक्त करीत असतानाच पिवळ्या चोचीच्या 'चफ' पक्ष्यांचा थवा मंजूळ आवाज करीत बराकींच्या मागे उतरला. टाकून दिलेल्या अन्नाचा शोध घेण्यासाठी. बोद खार्बूनतर हे चफ पक्षी इथे दिसले, बराकींच्या आसपासच पुन्हा दिसले हे विशेष. लेहमध्ये मात्र त्याचा मागमूस नव्हता. लेहमध्ये होते फक्त ताबड्या चोचींचे चफ.

दोन बराकींमध्ये साफसूफ केलेल्या जागी बुलबुलाच्या आकाराच्या, तांबडट तपकिरी रंगाच्या आणि पखावर पाढरा पट्टा असलेल्या 'माउटन फिंच' पक्ष्याचा थवा इकडेतिकडे करू लागला, आणि त्याच्यामध्ये विटकरी रंगाचा,

डोळ्यांवर शिंगासारखी काळी पिसे मिरविणारा चंडोल लुडबुडू लागला. अनी उंचीवर आढळणाऱ्या या तिबेटी पक्ष्याचे हे संमेलन आम्ही किती तरी वेळ पाहिले.

लडाख आणि तिबेटमधील पक्षि-जीवन आणि हिमालयीन पक्षि-जीवन यांमध्ये फारसे साम्य नाही. लडाखमध्ये मुख्यतः दोन प्रकारचे पक्षी दिसतात. (१) आशियात कोठेही अतिशय उंचीवर आढळणारे पक्षी; उदाहरणार्थ रॉबिन ॲक्सेंटर, तुरेवाला चंडोल आणि माउंटन फिंच व (२) जगात कोठेही फक्त वाळवंटी आणि वैराण प्रदेशात आढळणारे पक्षी. डेझर्ट व्हीटिअरसारखे असले वाळवंटी पक्षी मात्र अजून आम्हाला भेटायचे होते.

दुपारी दोन वाजता आम्ही चाग ला गाठली – उंची १७,३५० फूट किंवा ५,६०० मीटर. आता रस्त्यावर बर्फाचा सहा इंच जाडीचा थर होता. बाजूच्या पर्वतांचे माथे आणि शरीरे बर्फाच्या आणखीनच जाड आवरणाखाली झाकली गेली होती. रस्त्याच्या बाजूला हा थर जिथे फोडलेला दिसत होता, तिथे बर्फाचे असंख्य लोलक उन्हात झगमगत होते. खिडकीच्या नसराळ्यामधून जोराचा वारा अगावर येत होता. आम्ही जोंगातून उतरलो आणि प्रत्येकालाच उंचीचा परिणाम जाणवला. कोणाचा श्वास जड झाला, कोणाचे डोके दुखले. मला कौतुक वाटले इथे राहणाऱ्या जवानाचे. हिवाळ्यात कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत असेल त्याना ? उगीच नाही त्याच्या बराकीच्या मागे महादेवाचे मंदिर बांधलेले ! त्या महादेवाला आम्ही नमस्कार केला आणि चाग ला ओलांडून पुढे निघालो

दोन्ही बाजूला बर्फाच्या भिंती आणि त्याना लटकलेली बर्फाच्या लांब लोलकाची असंख्य झुंबरे, असा होता चाग लाचा उतार. बर्फ फोडून हा रस्ता नुकताच मोकळा केलेला होता. उन्हाने बर्फ वितळून मधूनच धो धो प्रवाह वाहात होते, आमच्या गाड्या अडवीत होते.

हजार दीड हजार फूट खाली उतरून आम्ही पुन्हा थांबलो. जवानांनी आमचा मार्ग रोखला होता. चहा घेतल्याशिवाय आम्हाला पुढे जाऊ देण्यास ते तयार नव्हते. आपल्या जवानांचे मला कौतुक वाटले. आदरातिथ्यात ते कधी कमी पडणार नाहीत आणि या प्रदेशात गरम चहाचा कप पुढे येणे याइतके दुसरे चांगले आदरातिथ्य नाही.

या निमित्ताने पाय मोकळे करण्याची संधी मिळाली, म्हणून मला बरे

वाटले. आजूबाजूच्या प्रदेशाकडे कौतुकमिश्रित आदराने मी केव्हापासून पहात होतो. आता सुमारे सोळा हजार फूट (४,८७९ मी.) उचीवर होतो आम्ही. त्यामुळे आजूबाजूस लहानमोठ्या पर्वताशिवाय काही दिसतच नव्हते. पण डोंगर तरी नेटके, चित्रातल्यासारखे सुन्दर असावेत की नाही? शंकराची स्वारी तांडवनृत्य करून, इथून नुकतीच परतली आहे, असे त्याचे एकदर स्वरूप. का, दिग्गजानी धुडगूस घातला असावा इथे? विच्छिन्न डोंगर-उतार, मरणोन्मुख पडलेल्या लहानमोठ्या शिळा आणि आत्महत्येला प्रवृत्त होऊन बसलेले, कड्यावरून खाली झेपावणारे फत्तर. कोणाही सत्प्रवृत्त मानवाला किंवा देवाला भय वाटावे असा हा प्रदेश. कुठला पक्षी किंवा प्राणी इथे येऊन राहण्याचा मूर्खपणा पत्करेल?

पण इथेही डोंगर उतारावरून वळणावळणाने मजेत खाली उतरणारा एक बारीकसा झरा होता. कुठेकुठे मार्गातील फत्तराशी गुजगोष्टी करण्यासाठी तो अमळ थांबला होता. स्वच्छ, नितळ, चिमुकले जलाशय इथे तिथे साचले होते आणि त्याच्या आधाराने गर्द पोपटी रंगाच्या गवताचे पुंजके उगवले होते, डोंगरावर पाचू उधळून द्यावेत तसे.

या चिमुकल्या प्रवाहाच्या काठावर होता एक रेडस्टार्ट किंवा हिमालयीन थिरथिऱ्या. पांढरी टोपी घातली आहे असे वाटावे असे शुभ्र डोके, गडद तांबडे पोट आणि काळे पख. पंखावर पांढरा ठिपका.

हा रेडस्टार्ट हिवाळ्यात दक्षिण भारतात स्थलांतर करीत नाही.

थिरथिऱ्या इथे वावरत होता म्हणजे उडत्या व पाण्यावर तरंगणाऱ्या कीटकाना इथे तोटा नव्हता म्हणायचा. कारण तेच त्याचे मुख्य खाद्य. माझ्या मनात हा विचार येतो न येतो तोच, डोक्यावर शिंगासारखी काळी पिसे मिरविणारा चंडोल तिथे दाखल झाला. टुण टुण उड्या मारीत कीटक शोधू लागला. मातकट विटकरी रंग, पांढरा गळा आणि पोट, बुलबुलाचा आकार. उन्हाळ्यात थेट १७,००० फूट उचीपर्यंत आढळणारा हा पक्षी. तपकिरी डोक्याच्या माउटन फिंच पक्ष्याचा एक लहानसा थवा इथे होता, ते ठीकच होते. कारण इथे माणूस राहात होता - जवानांच्या काही बराकी इथे होत्या. त्याच्या भोवती पडणारे धान्य, अन्नाचे कण आणि त्यांनी केलेल्या घाणीवर जमणारे कीटक — हे सगळे इथे होते माणसामुळे. म्हणूनच इथे फिंच पक्षी आले, पिवळ्या चोचीचे पर्वतीय कावळे घाण साफ करण्यास जमले आणि तांबड्या छातीचा रॉबिन ॲक्सेंटरही

वावरू लागला. माझी खात्री आहे, रात्री एखादा लांडगा, एखादा कोल्हा इथे चक्कर मारण्यास चुकत नसावा. माझ्या बरोबरचा फॉरेस्ट रेंजर देशपाल म्हणत होता की, या प्रदेशात शापू आणि नयन हे पहाडी बकरेही मिळतात. पण ते गेले असावेत आता अठरा-एकोणीस हजार फूट उंचीवर तिथे वितळणाऱ्या बर्फाच्या पाण्यावर गवत उगवत असणार -- ते खायला.

पुढचा रस्ता उताराचा होता. वळणे घेत, गचके खात, शरीरातील प्रत्येक स्नायूला झकास व्यायाम देत आम्ही सुमारे दोन हजार फूट खाली आलो असू. देशपालने एकदम जोंगा थांबविण्यास सांगितले. मीसुद्धा गाडीतून बाहेर पडण्याला निमित्तच शोधीत होतो. आजूबाजूचा प्रदेशच मुळी होता दृष्ट लागण्यासारखा. ते एक विस्तृत खोरे होते— हिरवेगार. त्यातून एक स्वच्छ पाण्याचा प्रवाह वाहात चालला होता. विस्तीर्ण हिरवळीवर याक आणि घोड्याचे कळप चरत होते. वळणाआडून एका सरोवराचे निळे-हिरवे पात्र डोकावत होते. त्याच्या काठावर एक छोटासा तंबू होता आणि त्यामधून निघणारी धुराची वलये निळ्या आकाशात हलुहलू विरून जात होती.

जोंगातून उतरल्याबरोबर देशपालने एका फत्तराकडे बोट दाखविले. इथले फत्तरही किरमिजी, बदामी रंगाचे, मुलायम, गुळगुळीत गोलाकार होते. त्या फत्तराआडून एक काळे नाक आणि दोन डोळे आमच्याकडे पाहात होते. आम्ही पुढे येतो आहोत असे दिसताच तो प्राणी त्या फत्तराआडून पळाला आणि दुसऱ्या फत्तराच्या आश्रयाला धावला. पण दडण्याआधी त्याने मागील दोन पायांवर बसून आमच्याकडे मागे वळून बघितले आणि त्या क्षणी मी त्याचे छायाचित्र टिपले.

हिमालयीन मार्मोटची आणि माझी ही पहिली भेट. सुंदर तांबडट-सोनेरी रंग, मोठी गोंडेदार शेपूट आणि आकार ससाहून मोठा. त्याच्या पाठीवरील रंग अजून गडद तपकिरी झाला नव्हता — म्हणजे स्वारी तरुण होती. तीन ते चार हजार मीटर उंचीवर वावरणारा, खारीच्या जातीचा हा प्राणी. मी आणखी जवळ येतोय् असे दिसताच एका खडकाखालच्या बिळात तो गडप झाला.

हे मार्मोट जमिनीखाली बिळे करून राहतात, आणि हिवाळ्यात हिमनिद्रा (हायबर्नेशन) घेतात. त्यांची बिळे आणि त्यांना जोडणारे मार्ग जमिनीखाली कितीतरी अंतर आडवेतिडवे पसरलेले असतात. ही बिळे खणताना ते जी माती बाहेर टाकतात, तीवर उन्हाळ्यात बर्फ वितळून वनस्पती उगवतात. म्हणजे

वनस्पतींना जगविण्याचे फार मोठे काम करतात या प्रदेशात हे मार्मोट.

त्या सरोवराच्या काठाने आम्ही पुढे गेलो आणि एका लहानशा पुलावरून एक प्रवाह ओलांडला. आता पलिकडे एक सपाट, वैराण मैदान दिसत होते आणि त्या पलिकडे एक मोठी दरी 'आ' वासून बसली होती. त्याही पलिकडे होत्या रखरखीत, भकास टेकड्यांच्या असंख्य रांगा. देशपालने सांगितले की, त्या दरीत लपली आहे श्योक नदी. उत्तरेकडे स्कार्डूजवळ सिंधुला मिळणारी. आम्ही ओलांडला तो प्रवाह श्योक नदीलाच मिळत होता. श्योक नदीपर्यंत आम्ही आलो म्हणजे सिंधूचे खोरे आणि श्योकचे खोरे याना विभागणारी 'लडाख' (किंवा कैलास) पर्वतमाला आम्ही ओलांडली होती. कैलास पर्वता-पासून काराकोरम पर्वतापर्यंत हिमालयाच्या मुख्य रांगेला समांतर जाणारी ही रांग लडाखचे जवळपास दोन सारखे भाग करते काराकोरम पर्वतात उगम पावणारी श्योक नदी दक्षिणेकडे वहात येते, एक वळण घेऊन उत्तरेकडे वळते आणि लडाख पर्वतमालेच्या टोकापर्यंत जाऊन बाल्टिस्तानात सिंधूला मिळते. लडाख पर्वतमाला आम्ही ओलांडली म्हणजे तिबेटच्या पठारी प्रदेशात आमचा प्रवेश झाला होता. आता थेट ल्हासापर्यंत कोणताही मोठा पर्वत आमचा मार्ग अडविणार नव्हता.

□

अठ्ठावीस जून

## सहा

# पँगाँग

आम्ही टागसेला पोहोचलो, तेव्हा तीन वाजून गेले होते आणि पोटात कावळे कोकलत होते. आमच्यासाठी इथेही गरम जेवण सुदैवाने तयार होते. राहण्याची सोय आरामशीर होती. पण बाहेर पडण्यास मी उत्सुक होतो. पहिल्याच दिवशी फार उतावळेपणा नको, हा देशपालचा सल्ला दुर्लक्षून मी बाहेर निघालोच.

टांगसे आहे लहानसे खेडे – श्योक नदीला मिळणाऱ्या एका प्रवाहाच्या काठी वसलेले. दोन चार घरे, काही शेते, विलोची झाडे आणि एका बाजूला मातीचे कडे तर एका बाजूला किरमिजी, बदामी रंगाचे पाषाणकडे, मोठमोठ्या शिळा इतस्ततः विखुरलेल्या. यांपैकी एका शिळेवर काही अक्षरे कोरलेली मला देशपालने दाखविली.

मी आणि देशपाल बाहेर पडलो, तेव्हा सायकाळचे चार वाजून गेले होते, उन्हे कलली होती, थंड वारा सुटला होता आणि आपण चौदा हजार फूट उंचीवर आहोत हे जाणवत होते. आकाश निरभ्र होते, त्याचा गर्द निळा रंग वातावरणात अल्ट्रा व्हायोलेट किरणांचे प्रमाण जास्त आहे हेच जणू सुचवीत होता. निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर आणि बदामी, सोनेरी पण वैराण टेकड्यांवर लाल चोचीच्या पहाडी कावळ्याचा (चफ) एक मोठा थवा उडत चालला होता. आमच्या बराकीच्या आवारात जी विलोची झाडे होती त्यावर असंख्य पक्षी चिवचिवत होते, आवाज ओळखीचे होते. मी त्या विलोखाली जाऊन उभा राहिलो. विलो फुलांनी बहरला होता आणि कपाळावर नारिंगी

टिळा असलेल्या 'गोल्ड फ्रन्टेड फिंच' पक्ष्यांचे थवे फुलांवर तुटून पडत होते, कित्येकदा फांद्यांना धरून उलटे लोंबकळत होते. राखी रंगाचा, पखात पांढरे पट्टे असलेला आणि शेपटीच्या कडा पांढऱ्या असलेला एक पक्षी जमिनीवर गवताचे बी टिपत होता. आम्ही जवळ जाताच तो पलिकडच्या शेतात उडाला. तेथल्या मातीच्या टेकाडावर बसून त्याने एक दोन ताना हवेत सोडून दिल्या. मग त्याने हवेत सरळ वर वर चढण्यास सुरुवात केली. मध्येच थांबून, पख पसरून, गोल गिरक्या घेत, गाणे म्हणत तो पुन्हा शेतात उतरला. तिबेटी स्नो फिंच पक्ष्याच्या या लीला आम्ही बराच वेळ पाहात होतो.

एका घराच्या मागील भिंतीच्या आडोशाला त्याचे घरटे होते – रिकामे. नुकते पख फुटू लागलेली इवलाली दोन पिले, जवळ चिवचिवत होती, आम्ही जवळ येतोय हे पाहून दगडाच्या सापटीत लपत होती.

परतताना आम्हाला आणखी दोन पक्षी दिसले – चिमणी आणि कावळा. चिमणीने चौदा हजार फूट (४,२६८ मीटर) भरारी मारल्याचे पाहून कौतुका-ऐवजी विषादच वाटतो. माणसाचा हा सहप्रवासी. माणूस जाईल तिथे जाण्याचा वहिवाटीचा हक्कच प्राप्त झाला आहे त्याला. कावळ्याची भेट घेण्यात मात्र पतप्रधान मोरारजीभाईंच्या भाषेत 'आनंद झाला आणि संतोषही झाला.' कारण हा कावळा साधा नव्हता, तिबेटी 'रेव्हन' होता. जगातील कावळ्यामध्ये सर्वात मोठा. डोमकावळ्याच्या दीडपट आकार; भली दांडगी चोच, गळ्या-वरची पिसे आयाळीसारखी आणि शरीराला शोभेलसा कठोर पण भरदार आवाज. ग्रीनलंडमधील रेव्हनच काय तो याची बरोबरी करू शकतो.

हा फेरफटका मारून आम्ही सलीम अलींच्या बराकीपर्यंत पोचतो तर तेथे मोठीच गडबड उडाल्याचे दिसत होते. इथल्या लष्करी अधिकाऱ्यांना काही जवानांनी अंडी आणून दिली होती. सलीम अली त्या अंड्याकडे कौतुकमिश्रित आदराने पाहात आहेत, ही गोष्ट आमच्या नजरेतून सुटली नाही. कोंबडीच्या अंड्याच्या दीडपट आकाराची ही अंडी फिकट हिरवट-निळसर रंगाची होती आणि त्यावर फिकट नारिंगी रंगाचे शिडकावे होते. ही अंडी तिबेटी क्रौंच पक्ष्याची असावीत या मताशी सलीम अली सहमत होते. १९४५-४६ साली मानस सरोवराजवळ त्यांनी क्रौंच आणि अंडी दोन्ही पाहिली होती आणि त्या अंड्यापासून तयार केलेले आमलेटही खाल्ले होते! त्यानंतर तीस वर्षांनी याच अंड्याचा आणि त्या क्रौंच पक्ष्याचा शोध घेण्यास आपल्याला एक स्वतंत्र मोहीम

काढावी लागेल, ही त्यांना कल्पना कशी असणार !

एक जुलै

आता चुशूलला पोहोचल्यावर मी हे लिहावयास बसलो आहे. गेले दोन दिवस आम्ही लुकुंगला काढले, पँगाँग सरोवराच्या काठी. लुकुंग हे नाव नकाशावर कसे आले कोण जाणे ! कारण इथे कोणी राहात नाही. इथे फक्त वारा असतो. या वायुराज्यात राहण्याचे जे कोणी धाडस करतात ते जमिनीखाली बिळे करून राहातात. या बिळातून मात्र शांत, थंड वाटते. सलीम अली आणि डॉ. विश्वास यांची सोय अशा सुरक्षित जागी करण्यात आली होती. या जमिनीखालील 'बंकर्स'च्या झरोक्यातून पाहिले की दोन तंबू दिसत. त्यात आम्ही होतो — मी एका तंबूत आणि हुसेन आणि विजयन हे दोघे एका तंबूत.

इथल्या वाऱ्याला आमचे हे तंबू सलत असावेत. त्यांना उचकटून भिरकावून देण्याचा त्याचा प्रयत्न दिवसभर चालू असे. त्याची हस्तक होती रेती. ती कुठून कुठून तंबूत घुसे आणि आमच्या सामानाला गाडून टाकू पाही.

लुकुंग होते एका चिंचोळ्या दरीच्या तोंडाशी. २९ जूनला आम्ही टांगसे सोडले आणि या दरीत प्रवेश केला. लडाखला दुसरे नाव आहे म्हणे चंद्रभूमी. ते बहुधा याच प्रदेशावरून पडले असावे. निर्जन, रखरखीत, भगभगीत डोंगर; तापलेल्या, भग्न, शिळा; सगळे उत्पाती दृश्य. पण रंग विलक्षण. कुठे पिवळे, नारिंगी, चट्टयापट्टयाचे दगड, तर कुठे गडद जांभळे आणि हिरवे उतार.

मध्येच एका ठिकाणी ही दरी रुंदावली आहे. दक्षिणेकडील टेकडयांमधून एक प्रवाह इथे येऊन थांबला आहे. इथल्या पाणथळ प्रदेशात गवत भरपूर उगवले आहे. आमच्या गाडया इथे थांबताच दलदलीतून पाच-सहा चक्रवाकाचा थवा उडाला. चक्रवाक देशात चक्रवाकांचे हे पहिले दर्शन. यापूर्वी हिवाळ्यात त्यांना मी अनेक ठिकाणी पाहिले होते — भरतपूरच्या अभयारण्यात; गुजरातमध्ये नळ सरोवरावर आणि पुण्याजवळील वीर जलाशयावर. पुण्यातील पाषाण तलावावर पूर्वी चक्रवाक बदके दिसत. पण त्यांची फार शिकार झाली आणि ती दिसेनाशी झाली.

चक्रवाक बदक आपल्याकडे ऑक्टोबरमध्ये दिसू लागतात आणि एप्रिलमध्ये ती उत्तरेकडे जातात. हिवाळ्यात मोठ्या नद्यांकाठची वाळवटे, सरोवरांचे काठ व त्यामधील वाळूचे बांध यांवर ती आढळतात. चक्रवाक जोडीने राहतात पण

कविकल्पनेनुसार या जोडीला विरहाचा शाप मिळालेला आहे. चक्रवाक रात्री भक्ष्य शोधतात आणि यावेळी पुष्कळदा आपल्या जोडीदारास सोडून नर व मादी निरनिराळ्या थव्यात जातात. कदाचित या त्यांच्या ताटातुटीवरूनच वरील कविकल्पना रूढ झाली असावी. उन्हाळ्यात उत्तरेकडे परतताना मात्र नर व मादी एकत्र असतात सिंधूच्या काठाने अशा अनेक जोड्या मे महिन्यात दृष्टीस पडतात असे लेहमध्ये वनविभागाच्या अधिकाऱ्यानी आम्हाला सांगितले होते.

आता आम्ही जिथे थांबलो होतो, त्या जागेला नाव आहे 'चकर तलाव' या ठिकाणी पूर्वी तिबेटी क्रौंच आढळत असे. आम्हाला काही तो दिसला नाही. यानंतर लुकुंगपर्यंत ही दरी चिंचोळी होत गेली होती आणि लुकुंग सोडून जरासे पुढे गेले की पँगाँग सरोवराचा विस्तृत जलसंचय दिसे. सरोवराच्या थंड पृष्ठभागाकडून या चिंचोळ्या दग्ध नळीत सतत वारा घुसे आणि लुकुंगमध्ये धुमाकूळ घाली.

लुकुंगमध्ये पोचताच सामान टाकून आम्ही सरोवराकडे पळालो. इथे वारा नव्हता. पण मधूनच वाऱ्याच्या जोरदार लहरी उठत, आणि डोक्यावर प्रखर सूर्य तळपत असला तरी थंडी वाजे.

पँगाँग सरोवर आहे ८५ मैल (१३६ कि.मी.) लांब आणि तीन मैल (४.८ कि. मी.) रुंद चौदा हजार फूट उंचीवरचा हा छोटा समुद्रच आहे म्हणा ना! पाण्याचा रंग विलक्षण गर्द निळा. जणू काही निळ्या शाईचे मोठे थारोळेच ओतले आहे इथे. मी पाण्याची चव बघितली — अतिशय खारट. तळे अगदी जीवनविरहित आहे. मासे नाहीत, इतर जलचर नाहीत.

आम्ही होतो सरोवराच्या उत्तर टोकाशी. इथून सुमारे चाळीस किलोमीटर हे सरोवर दक्षिण दिशेने पसरले आहे. नंतर पूर्वेकडे वळले आहे. तेथून त्याचा उर्वरित भाग चिनी हद्दीत मोडतो. सरोवराची पश्चिम बाजू लडाख पर्वतमालेने सीमित केली आहे. या पर्वतमालेतील अठरा ते वीस हजार फूट उंचीची (५,८०० मीटर) शिखरे सतत हिमाच्छादित असतात. उत्तरेकडे काराकोरम पर्वताची शाखा दिसते. पूर्वेकडचे डोंगर उंचीने कमी असले तरी वर्णाला उजवे आहेत. एखाद्या प्रचंड काहिलीतून वितळलेले लोखंड ओतून घडविल्यासारखे ते दिसतात. मावळत्या सूर्याची किरणे त्यावर पडली की द्रवरूप होत चाललेले लोखंड खरोखरच धगधगते आहे असा भास होतो.

ईशान्येकडून एक प्रवाह सरोवरात प्रवेश करतो. या ठिकाणीच काही पक्षी आम्हाला आढळले लुकुंगला पोहोचलो त्या दिवशी या नदीच्या मुखाजवळ आम्ही खूप भटकलो. मेजर प्रभाकर यानी वाळवंटातून जोंगा वाटेल तशा घुसविल्या.

चक्रवाकाच्या काही जोड्या आणि त्यांची पिले, काही टर्न आणि गल पक्षी हे इथले पक्षि-जीवन. इथे दिसलेला टर्न म्हणजे 'कॉमन टर्न' या युरोपीय जातीचीच तिबेटी उपजात. राखी रंग, काळे डोके आणि नारिंगी चोच. तपकिरी डोक्याचा गल हासुद्धा ओळखीचाच पक्षी. हिवाळ्यात समुद्रकिनाऱ्यावर शेकडोंनी आढळणारा. मुंबईच्या चौपटीवर चणे खायला आणि घाण साफ करायला उतरणारा. हिवाळा माणसाच्या सान्निध्यात काढणारा हा पक्षी उन्हाळ्यात मात्र अशा प्रदेशात जातो की जिथे माणसाचा वाराही लागणार नाही. जणू वानप्रस्थाश्रम स्वीकारलाय बेट्याने !

सूर्य मावळण्याच्या वेळाला दूरवर आम्हाला नऊ राजहंस पक्षी दिसले. राजहंस पक्ष्याचेही लडाखमध्ये झालेले हे पाहिलेच दर्शन. पांढरेशुभ्र डोके, त्यावर आडवे गंध लावावे तसे दोन आडवे काळे पट्टे, शुभ्र मान आणि राखी पंख असा हा मोठा देखणा पक्षी. हिवाळ्यात थव्याने येतो आणि मोठ्या नद्यांची पात्रे आणि काठ आणि सरोवरे यांवरच दिसतो. अतिशय सावध, त्यामुळे राजहंसाची शिकार करणे ही सोपी गोष्ट नाही हे अनुभवी शिकारी जाणतो आणि ही शिकार मिळालीच तर स्वतःला भाग्यवान समजतो हिवाळ्यात राजहंस मुख्यतः पहायला मिळतात उत्तर भारतात. महाराष्ट्रात मोठ्या नद्या आणि सरोवरे यांचा एकूण अभावच. त्यामुळे महाराष्ट्रात राजहंस क्वचितच दिसतो. महाराष्ट्र टाळून काही पक्षी कर्नाटकापर्यंत जातात.

तिबेट आणि मध्य आशियातील पाणथळ जागा ही राजहंसाची प्रजोत्पादनाची ठिकाणे. स्थलांतर करताना मात्र हे पक्षी फार उंचावरून उडतात. एकदा एका संशोधकाला चंद्राची छायाचित्रे घेताना चंद्राच्या पार्श्वभूमीवर उडून दिसणारा राजहंसाचा थवा छायाचित्रात मिळाला. यावेळी हे पक्षी एव्हरेस्टपेक्षाही जास्त उंचीवरून उडत चालले होते असे दिसून आले.

तर असा हा राजहंस पराक्रमी पक्षी. पण अलिकडे त्याचीही संख्या रोडावत चालल्याची शंका येत आहे. हिवाळ्यात हा पक्षी सर्वसामान्यपणे आता भारतात आढळत नाही. तेव्हा राजहंस पक्ष्यांची भारतातील जन्मभूमी (म्हणजे लडाख-

मधील पाणथळ जागा) धोक्यात आली आहे की काय, याचा शोध आम्ही घेणार होतो.

आता आम्हाला दिसलेले राजहंस पक्षीही अतिशय सावध होते त्यांच्याबरोबर त्यांची पिले नव्हती. त्यामुळे त्यांना चटकन् आकाशस्थ होण्यास हरकत नव्हती. ते उडाले आणि आमच्यापासून दूरदूर गेले. पँगाँग सरोवरचा चिनी हद्दीतील काही भाग गोड्या पाण्याचा आहे, त्या बाजूला पाणथळ जागाही विस्तृत आहे. तिकडेच ते गेले असावेत. पक्षी राजकीय सरहद्दी मानत असते तर किती बरे झाले असते, असा विचार माझ्या मनात आल्याशिवाय राहिला नाही.

हळूहळू अस्पष्ट होत चाललेल्या त्या थव्याकडे आम्ही पाहात असतानाच सूर्य अस्ताला गेला, जोराचा वारा सुटला, थंडी चांगलीच वाजू लागली आणि आम्ही लुकुंगला आमच्या तंबूत परतलो.

रात्रभर वादळाचा धुडगूस चालूच होता. पण दिवसभराच्या श्रमाने मला गाढ झोप लागली. सकाळी अंगावरची वाळू झटकून तंबूबाहेर पडलो तर दिसले की हुसेन आणि विजयनचा तंबू वाऱ्याने पूर्ण कोलमडून पडला आहे आणि त्यांना सलीम अलींच्या बंकरमध्ये आश्रय घ्यावा लागला आहे.

लुकुंगला आणखी एक दिवस आम्ही काढला. त्या नदीच्या अंतर्भागात राजहंस दिसतील या आशेने. पण ती आशा फोल ठरली. या दोन दिवसांत मेजर लामाशी गट्टी जमली. त्यांचा स्वभाव विनोदी, गोष्टीवेल्हाळ. एकदा मला ते हळूच म्हणाले, "मीसुद्धा गोळेच आहे. आम्हा नेपाळी लोकांत 'गोळे' ही एक पोटजात आहे." सरहद्दीच्या संरक्षणासाठी उभा ठाकलेला हा 'गोळे' पाहून मी इतरांपुढे उगीचच फुशारक्या मारल्या.

❑

महालय ठाणे
५६६
क्र. २२५७५
(स्थळ प्रत)



सात

# क्रौंच

मेजर लामांच्या अगदी उलट चुशुलचे मेजर शर्मा. मनुष्य अगदी मितभाषी, काहीसा लाजाळू आणि चेहऱ्यावर किंचित त्रासिक भाव. पहिल्या भेटीतच त्यांनी स्वच्छ सांगून टाकले की आपल्याला पक्षी किंवा प्राणी याच्यात 'इंटरेस्ट' नाही. पण दुसऱ्याच वाक्यात ते म्हणाले की, हवा असला तर तिबेटी क्रौंच दाखवितो तुम्हाला. हे ते इतक्या सहजतेने म्हणाले की आम्ही दचकलोच. हवा असण्याचा काय प्रश्न होता, त्याला शोधण्यासाठी तर आमचा आटापिटा चालला होता आणि या गृहस्थाला ती गोष्ट इतकी सोपी वाटत होती की याच्या परसात क्रौंच दावणीला बांधून ठेवलेला आहे.

देशपालची सुद्धा खात्री होती की चुशुलला क्रौंच आपल्याला दिसणार. त्यामुळे जेवण उरकताच आम्ही बाहेर पडलो. खरे तर सकाळपासूनच्या प्रवासाने अंगे इतकी ठेचकाळली होती की स्नायू आणि हाडांचा आतल्या आत भुगा झालाय असे वाटावे. नाकातोंडात आणि कपड्यांत रेती इतकी गेली होती की माणसे चालत्याबोलत्या रेतीची घडविली आहेत असे वाटावे. जोपर्यंत पँगाँग सरोवराची निळाई सोबतीला होती, तोपर्यंत शरीर भाजले तरी डोळे निवत होते. वीसएक मैलांनंतर मात्र आम्ही पँगाँगचा सहवास सोडला, हिमाच्छादित पर्वत आणि त्याच्या पायथ्याची तिबेटी फर्झची हिरवी झुडपे सोडली आणि उन्हाने भाजून निघाल्याने तांबडट दिसणाऱ्या वाळवंटात शिरलो. वाटेत जागोजागी बकऱ्याच्या कवट्या आणि शिंगे यांचे ढीग रचलेले दिसत,

वाळवटात वाट समजावी म्हणून त्यांना रंगीत फडकी बांधलेली असत.

भाजक्या मातीच्या काही टेकड्या चढून गेल्यावर चुशुलच्या हिरवळी दिसल्या आणि बरे वाटले. चुशुल गाव दोन लहान टेकड्यांच्यामध्ये लपले आहे. त्याच्या पूर्व आणि पश्चिम बाजूंना विस्तीर्ण मैदाने आहेत. आजूबाजूच्या डोंगरावरून वाहात येणारे पाणी साचून इथे लहान-मोठे जलाशय, पाणथळ जागा तयार झाल्या आहेत. आज आम्ही गेलो होतो पश्चिमेकडल्या पाणथळीत.

चपट्या कपच्यांचे वाळवट चराचरा तुडवीत आमच्या जोंगाचा ताफा या हिरवळीच्या दिशेने धावला. त्यासरशी तांबड्या चोचींच्या चफ पक्ष्यांचे थवे आणि हिरवळीत चरणाऱ्या मेंढ्या इतस्ततः पळाल्या. या विस्तीर्ण मैदानात नैऋत्येकडे एक मोठे तळे लपलेले आहे ही गोष्ट प्रथम जाणवलीच नाही. देशपालने या तळ्याकडेच आमच्या जोंगा घेण्यास सांगितले. तळ्याच्या जवळ निरनिराळ्या ठिकाणी आम्ही विखुरलो. आणि तळ्याला वेढा घालून कोणाला काय दिसते हे पाहण्याचे ठरविले.

तळे गोड्या पाण्याचे होते, पाणी नितळ निळे होते. तळ्याच्या तीन [illegible] मातीच्या लहान-लहान उंचवट्यांवर उगवलेले गवताचे मोठे पुंजके दिसत होते. या मातीच्या टेकाडावर उड्या मारीत दलदलीत बरेच आतवर शिरणे शक्य होते. मात्र यातील काही उंचवटे तरते होते आणि आपल्या शरीराचा भार त्यावर पडला की ते सावकाश खाली बुडत किंवा डुचमळत. उन्हामुळे काही भागातले पाणी सुकले होते, तेथे जमिनीतले क्षार (बोरॅक्स) वर आले होते. तळ्याच्या अगदी नजीकचा भाग सोडला तर ही सारी खारी दलदल होती. पण या खाऱ्या जमिनीवरही गवताला तोटा नव्हता आणि त्यावर शेकडो मेंढ्या चरत होत्या.

मी माझी जोंगा तळ्याच्या अगदी दक्षिण टोकाला नेली आणि तळ्याच्या दिशेने चालत निघालो. मी जवळ येतोय असे दिसताच त्या दलदलीतून रेडशँक पक्ष्याची एक जोडी उठली आणि कर्कश चीत्कार करीत हवेत चकरा मारू लागली. त्याचे घरटे या दलदलीतच होते हे नक्की. पण ते बरेच आतल्या बाजूला असावे. तिथल्या गवताच्या पुजक्यापर्यंत जायचे म्हणजे मध्ये बरेच खोल पाणी होते. एकूण ही स्वारी उन्हाळ्यात इथे परतते वाटते. रेडशँक पक्षी हिवाळ्यात भारतात सर्वत्र पसरतो. तळी, नद्यांच्या जवळच्या दलदली, खाड्या आणि खाजणे, मिठागरे इथे तो दिसतो. पुण्याजवळ मुळा मुठेच्या काठीही तो

आढळतो. तपकिरी, रेषाळ अंग आणि भडक तांबडे पाय असे त्याचे रूप. या दलदलीत दोन जोड्यांनी घरटी केलेली दिसत होती. याशिवाय टर्न पक्ष्याची (कॉमन टर्न) एक जोडी माझ्या डोक्यावर घिरट्या मारीत होती, चिर्र ऽ ऽ चिर्र ऽ ऽ आवाज करीत. त्यांचेही घरटे इथेच एका गवताच्या पुजक्यावर होते.

मी सभोवती दुर्बीण फिरविली. क्रौंच पक्ष्याचा डौलदार बांधा कुठेच दिसत नव्हता. दलदलीच्या पलिकडे तिबेटी फर्झचे असख्य पुजके पसरलेले दिसत होते, तिकडे मी आता मोर्चा वळविला. कॅरॅगाना किंवा हे फर्झ ही इंग्लंडमधील गॉर्ससदृश झुडपे, हिरवीगार पाने आणि इवलाली पिवळी फुले. जमिनीसरपट पसरलेले झुडूप पण अतिकणखर. लडाखमध्ये चौदा हजार फूट किंवा त्याहून अधिक उंचीवर हीच प्रमुख वनस्पती आढळते. अतिशय विषम हवामानात जगते. रेतीत उगवते. शिवाय त्याची पिवळी फुले हे पक्ष्याचे आवडते खाद्य आहे हे आम्ही पाहात होतो. लडाखी लोक या वनस्पतीला म्हणतात ' तमा '

पँगाँग सरोवराला मिळणारा जो प्रवाह होता, त्याच्या परिसरात 'डेझर्ट व्हीटिअर' या पक्ष्याने मला ओझरते दर्शन दिले होते. तो या तमाच्या पसाऱ्यात मला अगदी मनसोक्त पहावयास मिळाला. आपल्याकडील खाटिक किंवा श्राइक पक्ष्यासारखे काहीसे रूप. फिकट तपकिरी-बदामी डोके, गळा आणि डोळ्याभोवती काळा रंग, पाठ व पोट बदामी, पख रेषाळ गडद तपकिरी आणि टोकाशी काळा पट्टा असलेली शेपूट. हा पक्षी लडाख आणि त्याही उत्तरेला मध्य आशियात घरटी करतो आणि हिवाळ्यात भारतात स्थलांतर करतो. पुण्याच्या दक्षिणेला ज्या ओसाड, वैराण टेकड्या आहेत, तिथे याचाच जातभाई मी पाहिला होता. इथेही असल्याच रखरखीत भागात तो घरटे करतो. हा आहे खास वाळवटी भागात आढळणारा पक्षी. आज मल त्याचे संपूर्ण कुटुब पहावयास मिळाले. पायवाटेच्या कडेला, डोंगर-उतारावर पसरलेल्या लहानमोठ्या दगडापैकी एकाखालील फटीत त्याने घरटे केले होते. मात्र आता पिले घरट्यातून बाहेर पडली होती. इथे कोणा मेंढपाळाने दगडावर दगड रचून एक आडोसा तयार केला होता, त्याच्या आधाराने ही पिले हिंडत होती, धोका वाटला तर लपू पाहात होती आणि नरापेक्षा फिक्या रंगाची मादी दर तीन-चार मिनिटांनी कीटक पकडून आणून त्याना भरवीत होती. कुटुबप्रमुख आसपास हिंडून अन्यत्र बारीक लक्ष ठेवीत होते.

या बाजूला क्रौंच दिसण्याचा संभव नाही हे पाहून मी परत फिरणार तोच

एका अत्यंत दुर्मीळ पक्ष्याने दर्शन देऊन मला तृप्त केले. हा होता 'अफगाण रेडस्टार्ट'. काळे पख, पांढरे डोके; गळा, पाठ आणि पोट, तांबडे आणि काळ्या पंखावर ठसठशीत पांढरा ठिपका. लडाखमध्ये इतर रेडस्टार्ट भरपूर आहेत, पण हा रेडस्टार्ड फार तुरळक आढळतो तो स्थलांतर करून आपल्याकडे येत नाही. आता पुरेसा सूर्यप्रकाश नव्हता, त्यामुळे छायाचित्र घेता येत नाही म्हणून मी हळहळलो.

मी परत फिरलो. वाटेत हुसेन एका ठिकाणी कॅमेरा सज्ज ठेवून ठिय्या मारून बसलेला दिसला. त्याच्यासमोर सुमारे पचवीस फुटावर एका गवताच्या पुजक्याच्या कडेला पिवळ्या डोक्याच्या धोबी पक्ष्याचे घरटे होते. हा धोबी पक्षीही हिवाळ्यात भारतात सर्वत्र पहावयास मिळतो. राखी, काळ्मट पख आणि सुवर्ण मुकुट घालावा तसे पिवळेजर्द डोके. त्यामुळे तो चटकन लक्ष वेधून घेतो. त्याच्या घरट्यात एकच पिलू चिवचिवत होते, आईवडील मधूनमधून त्याला किडे आणून देत होते, आई घरट्यातील घाण बाहेर टाकीत होती. एकदा तर ते उतावळे पिलू पाण्यात पडले आणि हुसेनला चिखलात उतरून त्याला बाहेर काढावे लागले. धोबी पक्ष्याच्या संसाराची उत्कृष्ट क्षणचित्रे घेण्यात हुसेनला यश आले हे सागणे नकोच. पलिकडे विजयन रेडशँक पक्ष्याचे आवाज ध्वनिमुद्रित करीत बसला होता.

सलीम अली जिथे उतरले होते, तिथे आम्ही बरोबरच पोहोचलो. सलीम अली, विश्वास आणि देशपाल दुर्बिणी रोखून दूरवर पाहात होते. आम्ही तिथे पोचताच सलीम अली म्हणाले, "तुम्हाला काही दिसतय का पहा बरं!" आम्ही तिघांनीही दुर्बिणी सरसावल्या. देशपाल माझ्याजवळ येऊन मला नेमके कुठे पहायचे हे सागू लागला या विस्तीर्ण हिरवळीच्या अगदी दक्षिण टोकाशी आम्हापासून सुमारे तीन-चार मैल दूर मेंढ्याचे कळप चरत होते, त्यांच्यात काही दिसते का, हे मला तो विचारीत होता. त्याच्या मते तिथे क्रौंच पक्ष्यांची एक जोडी होती

मी शक्य तितके निरखून पाहिले. क्रौंच मला दिसले नाहीत. पण मनाला आतून जाणवले की तिथे काही तरी निराळे असणार– नव्हे आहेच, जवळ जाऊन पहायलाच पाहिजे. "मी पुढे जाऊन पाहून येतो," मी सलीम अलींना म्हणालो आणि त्यांच्या अनुमतीची वाट न पाहता धावण्यास सुरुवात केली.

सुमारे अर्धा मैल मी पळालो. आता मी दलदलीत आतवर घुसलो होतो.

कुठे कुठे पाणी खोल होते, गवताचे पुजके लांब लांब होते, त्याच्यावरून उड्या मारीत पुढे जाता येत नव्हते. मग डावी-उजवीकडे वळून वाट शोधावी लागली. वाटेत काही चक्रवाक कुटुंबांना मी सावध केले, आणि दम खाण्यासाठी थांबलो. एका गवताच्या पुजक्यावर बसून, उडती छाती सावरीत, दुर्बीण शक्य तितकी स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला. आता शंकाच नव्हती. दोन काळ्या माना डुलताना मला चक्क दिसल्या. मी मागे वळून पाहिले. हुसेन आणि विजयन माझ्याच दिशेने येत होते. त्यांनाही माझ्यासारखेच काही तरी जाणवले असावे.

मी पुन्हा धावण्यास सुरुवात केली, आणि पाच-सहाशे यार्ड पुढे जाऊन पुन्हा थांबलो. आता मला ती जोडी नीट दिसली. काळ्या माना, काळ्या कडा असलेले पांढरे-राखी पंख आणि झुपकेदार काळी शेपूट. ते तिबेटी क्रौंच होते यात शंकाच नव्हती. जगातील एका अत्यंत दुर्मीळ पक्ष्याला मी पहात होतो. आमची मोहीम तिबेटी क्रौंच पक्ष्याचा तपास लावण्यात यशस्वी झाली होती.

हुसेन आणि विजयनही माझ्याजवळ येऊन पोहोचले. इतक्यात एका मेंढपाळाचा घोडा फार जवळ आला म्हणून ती जोडी उडाली आणि आमच्याच दिशेने पुढे येऊ लागली. मावळत्या सूर्याच्या उन्हात त्या लांब माना आणि लांब पाय, संथ हलणारे पंख आणि क्रौंच पक्ष्याचा तो प्रसिद्ध घुमावदार आवाज— दृश्य अतिशय विलोभनीय होते. आमच्या पलिकडे सुमारे मैलभर अंतरावर ते दोघे उतरले. हुसेन त्यांचे छायाचित्र घेण्यासाठी गेला, आणि मी व विजयन परत फिरलो — सलीम अलींना ही आनंदाची बातमी कळविण्यासाठी धावत निघालो.

□

## आठ

# चुशुल

तीन जुलै

आज आम्हाला सुटी मिळाली. म्हणजे आमच्या वाहनानी विश्रांती घेण्याचे ठरविले त्याना मरम्मतीची जरूर आहे, हे त्याच्या चालकांचे म्हणणे. खरे तर वाहन-चालकानाही मरम्मत हवी आहे, हे दिसत आहे. बिचाऱ्याचा निघते वेळीचा टेच आता पार नासून गेला आहे. धुळीने भरलेले केस व कपडे, ताबारलेले डोळे आणि वाढलेल्या दाढ्या! सैन्यातले जवान ही दशा किती दिवस खपवून घेतील? याउलट, 'बरं झाल, दाढी आंघोळीची रोजची कटकट गेली!' असा आमचा विचार. एकूण आजचा 'ब्रेक-फास्ट' बराच आरामात झाला आणि कॅम्पभोवती पाय मोकळे करण्यास आम्ही बाहेर पडलो.

आमचा हा तळ आहे दोन डोंगराच्यामधील सपाटीवर. या सपाटीमधून एक पाण्याचा प्रवाह खळाळतो आहे. त्याच्या काठाने थोडी हिरवळ आहे, तिबेटी फर्झ किंवा कॅरॅगानाची झुडपे आहेत आणि तळावरच्या लोकांनी मुद्दाम लावलेली विलोची झाडे आहेत. आमच्या तळापासून पुढे हा प्रवाह चुशुलच्या खाऱ्या हिरवळीकडे वहात जातो. या बाजूस म्हणजे ईशान्येसच चुशुल गावातली चार घरे आहेत आणि हिरवळीवर पसरलेली शेतेही आहेत. त्याही पलिकडे आहे विस्तीर्ण खारे आणि पाणथळ मैदान, त्याही पलिकडे वाळूच्या व रेतीच्या टेकड्या आणि पार्श्वभूमीला दिसतात काराकोरम पर्वताची हिमाच्छादित शिखरे. असा आहे चुशुलचा परिसर. आम्ही जेथे क्रौंच पाहिला ती पाणथळ जागा आहे नैऋत्येला.

आमच्या तळामागील ओढ्याकाठी कोणते पक्षी दिसतात ते पहावे, असा सलीम अलींचा विचार. म्हणून आम्ही ओढ्याच्या दिशेने निघालो. खाऱ्या जमिनीवर उगवलेल्या हिरवळीवर आम्ही पोहोचतो न पोहोचतो तोच सगळीकडे पळापळ झालेली दिसली. हिरवळीवर लुचुलुचू गवत खाणारे इवलाले जीव एकदम गडप झाले आणि आम्ही थबकलो. चार-दोन मिनिटे स्तब्धतेत गेली. मग गवताच्या पुंजक्याखालच्या बिळातून इवलाली ओली नाके बाहेर आली आणि त्या पाठोपाठ लांबोळकी डोकी. फुरफुरत्या नाकांनी हवा हुंगली आणि मग एकेकजण हळूच बिळाबाहेर पडला. राखी रंगाचे, पिटक्या आकाराचे आणि आखूड शेपटीचे उंदीर होते ते. माझा हात कॅमेऱ्याच्या दिशेने वळतोय असे दिसताच पुटकन पुन्हा गडप झाले. आम्ही पाहिले तर हिरवळीवर असंख्य बिळे खोदलेली दिसली. या उंदराचे छायाचित्रण इथे बसून करणे शक्य आहे हे सर्वांनाच पटले. मग मी कॅमेरा सज्ज करून शांतपणे बसून राहिलो, सलीम अली सिने-कॅमेरा आणि तिकाटणे आणायला गेले आणि हुसेन व विजयन ओढ्याकडे निघाले.

डॉ. विश्वास म्हणाले, "हे प्राणी म्हणजे अती उंचावर आढळणारे 'व्होल्स' गवत, किडूकमिडूक, बिलोची फळे, धान्य, हे खाऊन जगणारे." हिवाळ्यात मात्र ते काय करतात, हे अजून कोडे आहे. म्हणजे ते सुस्त हिमनिद्रा (हायबरनेशन) हिमनिद्रा घेत पडतात, का अन्नाचा साठा करून त्यावर गुजराण करतात, हे कोणाला माहीत नाही.

अर्धा-पाऊण तास गुपचूप बसून राहिल्यावर मला आणि सलीम अलींना हवी तशी छायाचित्रे मिळाली. पण सलीम अली परत फिरले तर मी ओढयाच्या काठाने हिंडू लागलो.

ओढयाच्या काठी होता काळा-पांढरा धोबी. आपल्याकडे आढळणाऱ्या काळ्या-पांढऱ्या धोबी पक्ष्याची ही छोटी आवृत्ती. हिमालयीन प्रवाहावर हमखास भेटणारा हा पक्षी. गतवर्षी काश्मीरमध्ये त्याने आमची सतत सोबत केली होती. पण लडाखमध्ये अजून तो दिसला नव्हता, लेहमध्ये नव्हता, कारगिलजवळ दिसला होता, पण इथे लडाखच्या अंतर्भागात तो दिसेल अशी अपेक्षा नव्हती. शिवाय इथे नर आणि मादी दोघेही होते. म्हणजे जवळपास घरटे असणार, पण निसरड्या गोट्यांवर, उथळ पाण्यात, शेपूट वर-खाली हलवीत दोघे पाणकीटक पकडून स्वतःच मटकावीत होते. पिलासाठी खाद्य नेताना दिसले नाहीत काल क्रौंच जिथे पाहिला त्या पाणथळ जागेतही फक्त पिवळ्या डोक्याचे धोबी दिसले,

काळे-पाढरे नव्हते.

ओढयाच्या दोन्ही काठावर कॅरगानाची झुडपे माजली होती आणि त्यामधून लाबव्या छातीचा रॉबिन ॲक्सेंटर आणि त्याची भुरकट रगाची मादी, पिवळ्या डोक्याच्या धोबी पक्ष्याची एक जोडी आणि रेडस्टार्ट पक्ष्याचे एक सपूर्ण कुटुब चिवचिवत होते. रॉबिन अक्सेंटरचे छायाचित्र घ्यावे, या हेतूने त्याच्या हालचाली मी लक्षपूर्वक पाहू लागलो.

ॲक्सेंटरच्या जोडीचा पाठशिवणीचा खेळ काही वेळ चालू राहिला. मग भुर्रक भुर्रक करीत दगड-गोट्याच्या सापटीत, झुडुपाखाली कीटक शोधणे झाले आणि मग गवताची एक काडी चोचीत धरून नर पक्षी उडाला, मातीच्या एका उचवट्यावर क्षणभर टेकला, आणि त्या उचवट्याच्या एका बाजूला केलेल्या बिळात शिरला. एकूण घरबाधणी चालू होती तर! या उचवट्यासमोरच्या झुडपाच्या आडोशाला मी बसून राहिलो, कॅमेरा सज्ज ठेवून. गवताची काडी घेऊन पुन्हा तो केव्हा येतोय याची वाट पाहात.

माझ्यापासून काही अतरावरच रेडस्टार्ट पक्ष्याची टिल्ली भिरभिरत होती, चिवचिवत होती. वाहते पाणी हा केवढा आधार होता प्रत्येकाला. हा प्रवाह इथे नसता तर त्याभोवती हे गवत उगवले नसते. गवत नसते तर सभोवतीची ही माती अशी भुसभुशीत राहिली नसती, त्या पिटुकल्या उदराना लुसलुशीत खाद्य मिळाले नसते आणि राहायला बिळेही मिळाली नसती. पाणी नसते तर या रेतीत कॅरगाना (तमा)उगवले नसते, बहरले नसते. कॅरगाना नसते तर त्याच्या दाटीत पक्ष्याना घरटी बाधता आली नसती, त्याची पिवळी फुले खाता आली नसती आणि तिबेटी ससाची पिले कॅरगानाच्या जाळीत निर्धास्तपणे दडली नसती. हे कॅरगाना नसते तर पाणथळ कुरणातून चरणाऱ्या शेकडो मेंढयांच्या अगावरची लोकर त्याला इथे-तिथे अडकून राहिली नसती, केवळ हिवाळ्यात मेंढयाच्या अगावर उगवणारी ही उबदार लव — पश्मीना — मग गोळा करणे सुलभ गेले नसते आणि या मेंढयांवर जगणाऱ्या माणसाला पश्मीना लोकरीचा व्यापार मोठ्या प्रमाणावर करणेही जड गेले असते पाणी होते म्हणून चिमुकल्या उदरापासून माणसापर्यंत सर्वांचे व्यवहार या वाळवटात निर्वेध चालू शकत होते.

त्या प्रवाहाकडे पाहता पाहता मनात निर्माण झालेल्या या विचार-मालिकेची दोन टोके जोडली गेली, आणि माझी तद्री भग पावली. तरी त्या रेडस्टार्ट

पक्ष्याचा पत्ता नव्हता. इतका वेळ हा पक्षी परत कसा आला नाही याचे आश्चर्य वाटून मी सहज मागे वळून पाहिले. तर दिसले, माझ्या तीन बाजूंनी आठ-दहा जवान मोर्चे बांधून राहिल्यासारखे दबा धरून स्तब्ध राहिलेले, मी काय करतोय ते लक्षपूर्वक पाहात. भारतीय सैन्याची फळी फोडून आत घुसणे बिचाऱ्या रेडस्टार्टला कसे जमणार? मुकाट्याने चबूगबाळे आवरून मीच शेवटी माघार घेतली.

डॉ. विजयन आणि हुसेनही एव्हाना परत आले होते. त्याना रोझफिंच पक्ष्याचे एक घरटे सापडले होते, कॅरॅगानामध्येच अजून ते पूर्ण बाधून झाले नव्हते. या घरट्याच्या मालकाची आणि आमची मात्र जानपछान अगोदरच झालेली आहे. बुलबुलाच्या आकाराचा हा पक्षी आमच्या बराकीच्या आसपासच वावरतो आणि आपले गोड गाणे ऐकवितो, पाठीवर निळसर, राखी, रेघाळ रंग आणि डोके, चोच, गळा व छाती भडक तांबडी आणि त्यावर पांढरे ठिपके. कारगिलला पाहिलेल्या रोझफिंचपेक्षा ही जात आहे आकाराने मोठी, म्हणून तिला म्हणायचे 'ग्रेट रोझफिंच' तिबेट आणि मध्य आशियात हा रोझफिंच आढळतो.

सध्याकाळी गावाच्या दिशेने फिरायला गेलो तर चार विलो वृक्षाच्या छायेत एक शाळा बांधलेली आढळली. शाळेच्या बाधापलिकडे होती हिरवीगार शेते. सूर्याच्या कलत्या उन्हात त्याचा पोपटी रग अतिशय सतेज पण स्निग्ध भासत होता. त्याही पलिकडे होते चुशुलच्या खाऱ्या हिरवळीचे पोपटी पाढुरके पट्टे, त्याच्या पार्श्वभूमीला करड्या, किरमिजी टेकड्या आणि निळ्या आकाशात चमकणारी हिमशिखरे. आम्ही किती तरी वेळ ते सतेज, स्नेहाळ दृश्य पाहात बसलो होतो.

**पाच जुलै**

कालपासून आम्ही चुशुलच्या पूर्वेकडील खाऱ्या हिरवळीत धुमाकूळ घालीत आहोत, धुमाकूळ म्हणजे अक्षरशः धुमाकूळ! काल या पाणथळ जागेत आम्ही आमच्या जोंगा वाटेल तिकडे आणि वाटेल तशा घुसविल्या त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. शेवटी आमची जोंगा ओल्या वाळूत भक्कम रुतली. मग चुशुलला माणूस पाठवून तिथून ट्रक बोलाविले आणि तिला बाहेर काढली. मला तर असा सशय येतोय की जोंगा रुतून बसल्याशिवाय मेजर प्रभाकरना

चैनच पडत नसावे. लुकुंगला हुसेन, विजयन याची जोंगा रुतविण्यात मेजर यशस्वी झाले. आता सलीम अली, विश्वास आणि मी याची जोंगा रुतून बसली.

आज या हिरवळीत आम्ही घोडे घातले होते. जोंगा रुतते, पण घोडा ओल्या रेतीत रुतणार नाही असे आमचे साधे गणित. पण जिथे रेती विशेष ओली आहे, तिथे घोड्याचे पायही रुतून बसतात आणि जीप काढण्यापेक्षा रुतलेला घोडा बाहेर काढणे अधिक कठीण असते, ही गोष्ट घोडेवाल्यानी ध्यानात आणून दिली.

जीप आणि घोडा यावरच्या आमच्या कसरती सरहद्दीपलिकडे दबा धरून बसलेल्या चिन्याना पाहवल्या नाहीत आणि त्यानी आपल्या ठाण्यांवरून आकाशात धूर सोडला ही देशपालची बातमी. आम्हाला तो धूर आणि ते चिनी दोन्ही गोष्टी दिसल्या नाहीत.

आम्ही इथे एवढा धुमाकूळ घालण्याचे कारण म्हणजे, काल मेजर प्रभाकर आमच्या जोंगाचे कुशलतेने सारथ्य करीत असताना आमच्या समोरून अचानक एक तिबेटी क्रौंच उडाला, आकाशात हा हा म्हणता वरवर चढला आणि पर्वतापलिकडे दिसेनासा झाला. या जोडीपैकी दुसरा पक्षी इथेच कुठे तरी असेल, कदाचित ती मादी असेल आणि घरट्यात अंडी उबवीत बसली असेल, अशी आम्हाला शंका. म्हणून तर आम्ही जीप वाटेल तिकडे घातली आणि ती रुतली. जोंगा निरुपयोगी म्हणून घोड्यावरून मुलुख पालथा घातला. पण आज तर तो क्रौंचही दिसला नाही, किंवा त्याचे घरटेही सापडले नाही !

पण या विस्तीर्ण खाजणात इतर कोण कोण रहाते, हे मात्र शोधून काढता आले. या पाणथळ भागात जसे कॅरेगानाच्या झुडपाचे समुच्चय पसरलेले आहेत, तसेच छोट्या-मोठ्या खळग्याच्या आधाराने वाढणारे जांभळ्या आणि पिवळ्या फुलांचे गुच्छही आहेत. इथे गवताच्या पुंजक्यात बेमालूम दडविलेले रेडशँक पक्ष्याचे घरटे एकदम नजरेत येते आणि फिकट-हिरव्या रंगावर निळसर किरमिजी ठिपके असलेली चार अंडी उबविताना तांबड्या पायाचा रेडशँक दृष्टीस पडतो. इथे मधून-मधून खाऱ्या पाण्याचे लहान तलाव दृष्टीस पडतात आणि त्यात पोहत असतात चक्रवाकाची पाढरी, गडद तपकिरी पंख असणारी चिमुकली; आणि या तळ्याच्या काठी असतो, लांब पायांचा, नारिंगी छातीचा सॅन्ड-प्लोव्हर पक्षी. तुम्ही जवळ जाऊ लागलात की त्याची चिटुकली रेतीत बेमालूम दडतात आणि मोठे पक्षी, पंख तुटल्याचे नाटक करीत जमिनीवर रांगतात,

तुमचं लक्ष त्यापलीकडून स्वतःकडे खेचीत ! हा लेसर सॅन्डप्लोव्हर पक्षी हा या अती उंचावरील वाळवंटी प्रदेशाचा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण रहिवासी. लाहूल, स्पिती या अशाच प्रकारच्या प्रदेशात आणि मध्य आशियातील वाळवंटी प्रदेशातही सापडतो. बस् ! एवढेच पक्षी आणि काही सरडे यांशिवाय या खाऱ्या साम्राज्यात दुसरे काही नाही.

मला कौतुक वाटले आमच्या घोडेवाल्याचे. आम्हाला आणि आमच्या घोड्यांना सांभाळण्यासाठी बरोबर शाळकरी मुले आणि मुली होत्या. अंगावर, डोक्यावर लोकरीची लक्तरे कशीबशी गुंडाळलेली, कोणाच्या पायात गवताचे चढाव तर कोणाच्या पायात काहीच नाही. खूप हिंडता यावे म्हणून आम्ही घोडे ठरविले, मैलोन् मैल अनवाणी हिंडायचे या पोरांना काहीच वाटत नव्हते. आम्हालाच लाज वाटून मग आम्हीही त्यांच्याबरोबर चालतच भटकलो.

त्यातून आज थंडी चांगलीच पडली होती. (तपमान ३४ अंश फॅ. आणि आर्द्रता २० अंश) सकाळी आम्ही घोडे येण्याची वाट पहात थांबलो होतो, तर उन्हात उभे राहूनही जरासा वारा आला की हुडहुडी भरायची आणि हवा इतकी कोरडी होती की नाके आतून कोरडी पडून ठणकायला लागली. अर्थात् या पोरांची कीव करण्यापलिकडे आणि त्यांना बक्षिशी देण्यापलिकडे आमच्या हातात काहीच नव्हते, ही वाईट गोष्ट होती.

□

नऊ

# किआंग

सहा जुलै

सकाळी सहा वाजता नेहमीप्रमाणे ऑर्डर्लीच्या हाकेने जाग आली आणि चहाचा कप पुढे आला. सकाळी सहा वाजता आणि त्यानंतरही वेळ मिळेल तेव्हा आम्ही जे रसायन पितो, त्याला कौतुकाने आम्ही चहा म्हणतो. त्याला कॉफी म्हटले तरीही फारसे बिघडणार नाही, किंवा कोणी काही आणखी कल्पनाशक्ती लढविली तरीही कोणाचे फारसे बिघडणार नाही. ते गरम असते एवढाच मुद्दा आमच्या दृष्टीने महत्त्वाचा.

आमचे इथले ऑर्डर्ली बहुतेक लडाखी तरुण आहेत. तिबेटी क्रौंचाला ते म्हणतात 'कुटुंग' किंवा 'टुंग टुंग.' या टुंग टुंगला बघायला आलेल्या आणि टुंग टुंगचे नाव कौतुकमिश्रित आदराने घेणाऱ्या आम्हा साहेबांना पाहून त्यांना काय वाटत असेल कोण जाणे! त्यांनी बहुतेकांनी टुंग टुंग बघितलेला आहे. पण त्यांच्याशी बोलताना एक गोष्ट जाणवते की त्यांनीही या पक्ष्याला फार मोठ्या संख्येने कुठेही पाहिलेला नाही.

आमचे ऑर्डर्ली आहेत तसे कष्टाळू. ते कपडे धुतील की नाही, त्यांना कपडे धुवायला कसे सांगायचे या विषयी आमच्यात काथ्याकूट झाला. शेवटी त्यांना कपडे धुण्यास सांगायचे ठरले. त्यांनीही कपडे धुण्याचे मान्य केले. फक्त पायमोजे धुणार नाही असेही नम्रपणे बजाविले!

काल रात्री थंडी बरीच पडली असावी. आमच्या बराकी एस्किमो लोकांची घरे आहेत की काय असे वाटत होते. या बराकींच्या भिंती आहेत पत्र्याच्या डब्याच्या (जेरी कॅन्स). खरोखर लडाखमध्ये वनस्पती नाहीत, पिके होत नाहीत

पण जेरी कॅन्स मात्र भरपूर मिळतात, असे पुढे मागे भूगोलाच्या पुस्तकात वाचायला मिळाले तर आश्चर्य वाटू नये. इथे कुठेही ते पडलेले आहेत, कोणीही यावे आणि वाटेल तितके जेरी कॅन उचलून न्यावे, अशी मुभा आहे. इथल्या भिंती, रस्ते, फरशी, रस्त्याच्या कडेचे दगड या सर्वांसाठी जेरी कॅनचाच उपयोग केलेला आहे.

उद्या चुशुलहून आमचा मुक्काम हलणार. आज नेमके काय करायचे हे बराच वेळ ठरत नव्हते, कारण या परिसरातले नेमके काय पाहायचे राहिले आहे, याचाच कोणाला पत्ता नव्हता ! शेवटी सलीम अली आणि विश्वास यांनी पँगाँगच्या काठी टुकुगला जाण्याचे ठरविले, हुसेन आणि विजयन क्रौंच दिसला होता, त्या पाणथळीतील वनस्पतींचे नमुने गोळा करण्यास गेले आणि मी व देशपाल 'त्साका ला' या खिंडीकडे निघालो.

आजची माझी निवड योग्य ठरली. काल स्वत:च्या कामगिरीवर हुसेन बेहद्द खूश होता, आज मी माझी पाठ थोपटून घेतली.

त्याचे असे झाले. मी आणि देशपाल सुमारे आठ वाजता जोंगातून निघालो. चुशुलचा कॅम्प ओलांडून आग्नेयेकडे वळलो आणि खाऱ्या दलदलीच्या काठाने भाजक्या सुपारीच्या रंगाच्या टेकड्याच्या उतारावरून जाणाऱ्या रस्त्याने 'त्साका' खिंडीचा चढ चढू लागलो.

वाटेत लागतो इथला जुना विमानतळ. १९६२ च्या युद्धात भारतीय सैन्याला तो खाली करावा लागला. शत्रूच्या ताब्यात जाऊ नये म्हणून इथली साधनसामग्री नष्ट करावी लागली. तिचे अवशेष आणि इथले खास पीक जेरी कॅन एवढेच सध्या विमानतळावर शिल्लक आहेत. आता चिनीही इथे शिल्लक नाहीत. ते आहेत पूर्वेच्या टेकड्यांपाठीमागे. पण हा विमानतळ भारतीय सैन्याने वापरण्यास मात्र त्यांचा सक्त विरोध आहे

इथून रस्ता दगड-गोट्यातून, वाळूतून चढत जातो आणि आपण अचानक एका स्मारकापाशी येऊन थांबतो. १९६२ मध्ये कुमाऊं पलटणीने चिन्याशी घनघोर सामना दिला त्याचे हे स्मारक. पलटणीचे प्रमुख शैतानसिंग मरणोन्मुख होऊन पडले. त्याना उचलून पिछाडीला नेण्यासाठी लोक आले तर त्यानी स्वत:ला उचलू न देता, बरोबरच्या जखमी जवानांना मदत पोचवायला लावली शैतानसिंगांना रणभूमीवरच मृत्यू आला. त्या शौर्याची आठवण देणारे हे स्मारक. स्मारकाचे बांधकाम अजूनही पूर्ण झालेले नव्हते. काही विलोची झाडे,

काही हिरवळ उगवली होती, आणि त्यातून माउन्टन फिंचचे थवे आणि शिंगवाल्या लार्कची जोडी फिरत होती.

देशपालने पूर्वेकडे बोट दाखविले. दोन डोंगरांमधून एका मोठ्या प्रवाहाचे प्रशस्त पात्र मधल्या मैदानाला येऊन मिळाले होते. पात्र कोरडे ठणठणीत होते. "इथूनच ल्हासाला रस्ता जातो !" देशपाल म्हणाला.

दक्षिणेकडच्या पर्वतशिखरावर मात्र अजूनही बर्फ रेंगाळत होते, तिथून त्याचे प्रवाह खाली येत होते आणि त्यांच्या काठाने तमाची दाट झुडपे उगवली होती. पाण्यावर जागोजागी बर्फाचे आरसे तडकले होते. हा कालच्या रात्रीच्या थंडीचा परिणाम. आमची जोंगा त्साका लाच्या माथ्याकडे जाणारा नागमोडी रस्ता, चढू लागली आणि थांबण्याची देशपालने ड्रायव्हरला खूण केली.

आमच्यापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर वाळवंटात तीन प्राणी उभे होते. त्यातील एक लहानसर होता, इतर दोघांबरोबर खेळण्याचा प्रयत्न करीत होता. किआंगचे एक कुटुम्ब होते ते. किआंग म्हणजे तिबेटी वन्य घोडा किंवा गाढव म्हणा हवे तर. दुरून मला तर हे प्राणी घोड्यासारखे दिसले. त्यांचा रंग फिकट तपकिरी होता, मानेवर आणि पायावर गडद तपकिरी होता. घोड्याच्या मानेवर जसे लांब केस असतात तसे त्याच्या मानेवर दिसले नाहीत. पण दुरून बांधा आणि उंची घोड्याइतकीच वाटली. त्यातील बाळ-घोडा किंवा गाढव पुढचे दोन पाय उचलून आणि मान जोरजोरात हलवून इतर दोघांबरोबर खेळत होते. इतर दोघांपैकी नर कोणता आणि मादी कोणती हे काही दुरून कळले नाही.

मी जोंगातून खाली उतरलो आणि कॅमेरा घेऊन किआंग कुटुंबाच्या दिशेने चालण्यास सुरुवात केली. डोंगराचा उतार उतरून मी खाली आलो, काही तमाची झुडपे बाजूला टाकली, एक दोन वाळूची टेंगळे चढलो, वाटेत एका तिबेटी सशाला पळण्यास वाट दिली. एका सॅन्डप्लोव्हर पक्ष्याने पिलापासून मला दूर नेण्यासाठी आपण जखमी झाल्याचे नाटक करून दाखविले आणि मी वाळूच्या मैदानात पोचलो.

किआंग कुटुंबाने अजून माझ्या अस्तित्वाची दखल घेतली नव्हती. वाळूत उगवलेले खुरटे गवत कुरतडत, उगीचच इकडे तिकडे पाहात ते शेपट्या हलवीत होते. त्यांची शेपूट घोड्यासारखी भरपूर केस असलेली नव्हती. गाढवाप्रमाणेच यांच्या शेपटाला फक्त शेवटी केसाचा झुबका होता.



नेते डॉ. सलीम अली आणि उपनेते डॉ. विश्वास




कारगिल येथील दर्द मुसलमान दुकानदार



डॉ. सलीम अली कारगिल येथे छायाचित्रण करताना

वाखा नदीकाठावरील पुरक्युम गाव, सातूची शेते आणि विलो वृक्ष





कारगिल येथील
दोन दर्द बच्चे



मुलबेख गावाजवळचे
मैत्रेयाचे कोरीव शिल्प



लेहमधील बाजार आणि पार्श्वभूमीला टेकडीवरील राजवाडा

शे प्राणीसंग्रहालयातील भरलचा बच्चा





लेहजवळील हिमिसचा सुप्रसिद्ध गोम्पा

वैराण टेकड्यांमधून पँगॉंग सरोवराकडे जाणारी वाट



डॉ. विजयन् आणि श्री. हुसेन





पाणथळ जागेत चरणारे याक



चुशूलजवळच्या पाणथळ जागेत सचारासाठी निघताना
पार्श्वभूमीला चुशुलमधील घरे व शेते

चुशुलजवळच्या खाजणात रुतून बसलेली
जोंगा बाहेर काढताना





चुशुलजवळच्या खाजणात
रेडशँक पक्ष्याचे घरटे आणि अंडी

किआग किंवा तिबेटी वन्य गाढव





मी आणखी जवळ येतोय हे पाहताच
किआंगने धूम ठोकली





रॉबिन ॲक्सेंटर—
एक लडाखी पक्षी



हान्ले येथे वास्तव्य करून असलेले एक निर्वासित तिबेटी कुटुंब

हान्ले नदीच्या तीरावरील वाळवंट—पार्श्वभूमीला टेकडीवरील हान्ले गोम्पा






जगातील एक अत्यंत दुर्मिळ पक्षी--
काळ्या मानेचा तिबेटी क्रौंच

हान्ले गोम्पामधील तरुण आणि वृद्ध लामा





पुगाजवळच्या हिरवळीत चरणारे याक.

पुगा येथील उष्ण पाण्याचे उच्छ्वास





तांबड्या शेपटीच्या ससाण्याचे घरटे आणि पिल्लू

सोळा हजार फूट उंचीवरील कुरणात चरणाऱ्या मेंढ्या






मोठ्या आकाराचा 'माऊस-हेअर'

त्सो मोरीरीच्या परिसरातील मार्मोट





स्टार त्सा पुक त्सो सरोवरानजीक
घरटी बाधणारे तपकिरी डोक्याचे गल



त्सो मोरीरीजवळ घरटी बांधणारे राजहंस




बिळाच्या तोंडाशी खेळणारे मार्मोटचे बच्चे



हान्ले येथील तिबेटी क्रौंचाची जोडी

तिबेटी क्रौंचाचे दलदलीत बाधलेले घरटे. नरपक्षी अडी उबवीत आहे.



मी सावकाश चालत त्याच्यापासून सुमारे शंभर मीटर अंतरावर पोचलो, आणि तिघेही माझ्याकडे तोंड करून उभे राहिले — आई-वडील दोन बाजूला आणि मध्ये त्यांचे शिंगरू. पण मी आणखी जवळ येतोय हे पाहताच तिघां-नीही एकदम माना फिरविल्या, ते एकत्र आले, काही अंतर पळाले आणि पुन्हा विखरून माझ्याकडे तोंड करून उभे राहिले असे दोन-तीनदा झाले. मी मधूनमधून त्यांची छायाचित्रे घेत होतो. त्यांच्या मागे मागे जात मी जोंगापासून बराच दूर आलो होतो. हे प्राणी मला शंभर मीटरपेक्षा जवळ येऊ देण्यास तयार नव्हते. मी मुकाट्याने कॅमेरा खाली ठेवला. दुर्बिणीतून त्यांना पुन्हा एकदा निरखले आणि परत फिरलो.

जोंगातून देशपाल आणि ड्रायव्हर अमरसिंग माझ्या हालचाली निरखीत होते त्यांना माझ्यापेक्षाही आनंद झाला. " आजका काम बहोत अच्छा हो गया, " अमरसिंग समाधानाने उद्गारला.

वळणावळणाने घाट चढत आम्ही त्साका खिंडीच्या माथ्यापर्यंत पोचलो. या खिंडीची उंची आहे १५,५०० फूट (४,७२२ मीटर). आजूबाजूच्या टेकड्या खिंडीपेक्षा आणखी हजार फूट उंच आहेत. त्यांचे उतार वाऱ्याच्या माराने अगदी गुळगुळीत बनले आहेत. शिखरांवरून बर्फ वितळून वाहणाऱ्या पाण्याने त्यांना उभे छेद गेले आहेत. कुठे पाण्याच्या आधाराने तणाची किनार उगवली आहे.

खिंडीच्या रक्षकांनी तसेच शिंगवाल्या लार्कनी माथ्यावर आमचे स्वागत केले. एक लॅमरगियर किंवा दाढीवाले गिधाड आणि एक रेव्हन किंवा मोठ्या आकाराचा तिबेटी कावळा हेसुद्धा आकाशातून आमचे निरीक्षण करून गेले.

खिंडीच्या माथ्यावरून मी दक्षिणेकडे नजर टाकली. खिंडीच्या पायथ्याशी एक खेडे होते आणि त्यापलिकडे एक अतिशय विस्तीर्ण मैदान थेट क्षितिजापर्यंत पसरले होते. हे मैदान एवढे रुंद होते की सिंधूसारख्या मोठ्या नदीचे पात्र त्यात दडले होते. त्याच्या दोन्ही बाजूंना टेकड्यांच्या रांगा होत्या. नैर्ऋत्ये-कडच्या टेकड्या आपल्या ताब्यात होत्या, तर आग्नेयेकडच्या टेकड्यात कोठे-तरी चिनी दबा धरून बसले होते. उद्या या मैदानातच आमचा मुक्काम पडणार होता.

रक्षकांचा निरोप घेऊन आम्ही परत फिरलो. या सीमेवरच्या सैनिकांची गाठ पडली की मिश्र भावनांनी मन हेलावून जाते. आमच्यासारखे अनोखे कोणी

दिसले की त्यांच्या एकाकी आणि पुष्कळशा कंटाळवाण्या जीवनात त्याना क्षण-भर विरंगुळा वाटतो. मग स्वागतही दिलखुलास होते. शहरी माणसाला हा दिलखुलासपणा पाहून मकोचल्यासारखे होते आणि ज्या हलाखीत व मृत्यूच्या छायेत हे देशबांधव दिवस काढतात ते पाहून शहरी सुखसोयींना चटावलेले शरीर अर्धमेले होते.

'आजका काम बहोत अच्छा हुआ' अशा समाधानात असलेल्या अमर-सिंगाने आता गाडी सपाट्याने काढली. घाट उतरून आम्ही भराभर टेकड्या मागे टाकल्या आणि चुशुलच्या खाऱ्या हिरवळीच्या समीप पोचलो आणि अचानक माझे लक्ष गेले रस्त्याच्या कडेला उभा असलेल्या एकट्या किआंगकडे. आमच्यापासून तो पन्नास मीटर अंतरावर असावा. ब्रेकचा आवाज होणार नाही, इतक्या बेताने अमरसिंगाने गाडी थांबविली. किआंग जोंगाकडे पहात होता. इतक्या जवळून त्याचे छायाचित्र घेण्याची संधी दवडून चालणार नव्हते.

मी पटकन गाडीतून उडी टाकली आणि खाली बसून त्याच्यावर कॅमेरा रोखला. मी खाली उतरलेला पाहताच त्याने पळण्याचा पवित्रा घेतला, पण थांबून मान वळवून माझ्याकडे पाहिले. मी आणखी पुढे सरकलो. त्याचे छाया-चित्र घेतले. मग मात्र त्याने पळण्यास सुरुवात केली. तो पळत असतानाच मी आणखी एक छायाचित्र घेतले. तो उभा राहून माझ्याकडे पहात होता, तेव्हा त्याचा रुबाब पहाण्यासारखा होता, पण तो पळताना मात्र चक्क गाढव दिसला. पण तरीही तो 'वन्य' गाढव होता. वन्य प्राण्यात आढळणारी ऐट आणि एक प्रकारची स्वतंत्र वृत्ती याचे तेवढ्या क्षणातही मला दर्शन घडले. किआंगचे एवढ्या जवळून छायाचित्र मिळेल अशी मला सुतराम कल्पना नव्हती. आता अमरसिंगइतकाच मीही समाधानी होतो.

हा किआंग नर होता. विणीचा हंगाम संपला की नर एकेकटे राहतात, भटकतात. पुष्कळदा असे नर वाझ असतात. त्यामुळे ते एकटे पडतात, अर्थात हे सर्व झाले कयास. किआंग या प्राण्याबद्दल एकूणच फार कमी माहिती उपलब्ध आहे. पूर्वी म्हणे हा प्राणी सर्व युरोपभर आढळत असे. पण उत्क्रांतीदृष्ट्या अधिक यशस्वी ठरलेल्या प्राण्यांनी किआंगला हटविले आणि अगदी दुर्गम, ज्या प्रदेशात इतर प्राण्यापासून स्पर्धेची सुतराम शक्यता नाही, अशा प्रदेशात किआंगला आश्रय घ्यावा लागला. किआंगच्या जीवनाचा अभ्यास करण्याचे आव्हान अजून फारसे कोणी स्वीकारलेले नाही. कच्छमध्ये आढळणारे वन्य

गाढव हे किआगचेच जातभाई.

किआगला माणसाळवण्याचे प्रयत्न यशस्वी झालेले नाहीत. लडाखी किंवा तिबेटी लोक किआगला मारीत नाहीत आणि त्याचे मासही खात नाहीत. लडाखमध्ये लष्कराचा तळ पडण्यापूर्वी हा प्राणी पुष्कळ सख्येने आढळत असे. लष्करी अधिकाऱ्याकडून मात्र त्याची भरपूर शिकार झाली, हे दुर्दैव.

दुपारचे जेवण झाल्यावर 'मेस' समोरच्या चिमुकल्या हिरवळीच्या तुकड्या-वर खुर्ची टाकून अरामात बसलो— भरल्या पोटी, समाधानी चित्ताने. हवेत अजूनही गारठा असल्याने उन्हाचा चटका सुखद वाटत होता. पलिकडच्या बराकीत हुसेन, विजयन आणि विश्वास याचा गप्पांचा अड्डा पडला होता. विजयनने आणलेल्या वनस्पतींचे नमुने 'प्रेस' करणे, हुसेनने मारलेल्या तिबेटी तित्तराचे विच्छेदन करून त्याचे शरीर जतन करण्यायोग्य बनविणे वगैरे कामे चालू असतानाच समानशील शास्त्रज्ञ आणि सशोधक यांची टवाळी चालू होती.

मला त्यात रस नव्हता. माझी नजर समोरच्या कड्यावर खिळली होती. तिथल्या पाषाणाला असख्य क्षते होती. त्यामधून अनेक तिबेटी पारव्यानी घरे केली होती. तांबड्या चोचीच्या चफ पक्ष्याचा थवा उगीचच इकडून तिकडे फेऱ्या घालीत होता. कड्यावर पाऊल ठेवायला इंचभर जागा का नसेना पण अशा ठिकाणी मेंढ्या आणि त्यांची कच्चीबच्ची खुशाल हिंडत होती.

लडाखमध्ये माणसाचे जीवन म्हणजे सुद्धा अशी कड्यावरची कसरतच नव्हती का?

□

दहा

# डुंगटी

नऊ जुलै

आज डुगटीला येऊन दोन दिवस पूर्ण झाले. त्साका लाच्या माथ्यावरून मी जे विस्तीर्ण मैदान पाहिले, त्याच्या नैऋत्येला जी डोंगराची रांग आहे, तिथेच एका टेकडीच्या आडोशाला डुगटीचा तळ आहे. समोर सिंधू नदीचे रुंद पात्र आहे. त्याच्या दोन्ही बाजूंना हिरवळीचे मोठे पट्टे आहेत.

त्साका खिंड उतरून आपण एका छोट्या खेड्यात येतो. इथे ग्रिमची शेते आहेत, ओढ्याकाठी तमाची दाट झुडुपे आहेत. गावातून पाण्याच्या प्रवाहांनी जागोजाग वाटा काढल्या आहेत, तेच रस्ते. त्यामधून ठेचकाळतच आमच्या जोंगा गावापल्याड झाल्या. शेतात काम करणाऱ्या बायका आणि इतस्ततः चरणारे याक यांनी सारख्याच कुतूहलाने आमची दखल घेतली.

गाव सोडले आणि एकदम जोंगा वाळवटात घुसल्या. आमच्या दोन्ही बाजूला थेट डोंगरांच्या पायथ्यापर्यंत वाळूच्या लहान मोठ्या शिगा होत्या. त्यामधून वाट काढीत घसरत, फसत, गिरकत, फिरकत आणि मधून-मधून रुतत आमच्या जोंगा पुढे सरकत होत्या. या वाळवंटात एक वाट अशी नव्हतीच, अनेक चाकोऱ्या होत्या. इथून जाणाऱ्या प्रत्येक वाहन चालकाने आपल्या कुवतीप्रमाणे आणि इच्छेप्रमाणे वाळवटातून वाट काढून स्वतःची एक चाकोरी निर्माण करून ठेवली होती !

आम्ही सिंधू नदी पहायला उत्सुक होतो तर अचानक आडवे आले एक सरोवर. खाऱ्या पाण्याचे. या वाळवटात काय काय दडलेले होते राम जाणे !

सरोवराच्या पृष्ठभागावर विहरणारी बदके पाहताच आम्ही वाहने थांबवून बाहेर उड्या टाकल्या.

आम्ही खाली उतरलेले पाहताच सरोवराच्या काठावरील चिखलात भक्ष्य शोधणाऱ्या तीन-चार सॅन्डप्लोव्हर पक्ष्यानी पळ काढला, काळ्या डोक्याचा राखी पखाचा आणि नारिंगी चोचीचा एक टर्न दूर गेला आणि सरसर पोहत बदकाच्या रांगा पलिकडच्या तीराला जाऊ लागल्या. पलिकडच्या तीरावर खूपशी चक्रवाक बदके अस्पष्ट दिसत होती. तो तीर आमच्या दुर्बिणींच्या टप्प्याबाहेर होता. यावरून या सरोवराच्या विस्तृतपणाची कल्पना येईल. पाण्यावर विहरणारी बहुतेक बदके मरगॅन्झर जातीची आहेत असे सलीम अलींचे मत पडले. मला त्याच्यात एक पिनटेल बदक असावे असे वाटले. पण निश्चित सागता येईना. ही मरगॅन्झर बदके लडाखमध्ये डोंगरकपारीत घरटी बाधतात. चक्रवाकाप्रमाणेच हे मरगॅन्झर बदक लडाखशिवाय उत्तर युरोप व सायबेरिआ या प्रदेशात घरटी करते. लाब, टोकाशी निमुळती होत गेलेली आणि दातेरी चोच हे त्याचे वैशिष्ट्य. मासे पकडण्यासाठी ती खास उपयोगी.

डुंगटीला आम्ही लष्कराचे पाहुणे नाही, इन्डोतिबेटी सीमा सुरक्षा दलाचे पाहुणे आहोत. त्याना आम्ही येणार याचा पत्ताच नव्हता, त्यामुळे इथे आल्यावर आमचे महत्त्व पटवून देऊन जागा मिळविण्यात, सामान लावण्यात आणि शरीराच्या कानाकोपऱ्यात शिरलेली वाळू काढून टाकण्यात बराच वेळ गेला. असा प्रशासकीय गोंधळ झाला की सलीम अली संतापतात. पण बोलत नाहीत. त्याच्या एखाद्या सहज वाक्यातून मात्र मग तो संताप केव्हा तरी बाहेर पडतो.

तळावरचे प्रमुख केरळी निघाले. त्यामुळे त्याची आणि विजयनची तात्काळ दोस्ती जमली. आम्हाला रात्रीचे जेवणाचे आमत्रणही मिळाले. जेवताना प्रमुखानी अभिमानाने सागितले की आमच्यासाठी खास वन्य बकऱ्याचे मांस शिजविले आहे! आणि इकडे आम्ही लडाखचे वन्य जीवन कसे वाचवावे याची पाहणी करण्यासाठी आलो होतो!! मी अर्थातच त्यांची ती खास ' डिश ' खाण्याचे नाकारले. इतरांनी ती बिनदिक्कतपणे खाल्ली. सलीम अलींपर्यंत ही वार्ता पोचलीच नाही. त्यामुळे आमच्या यजमानाना धन्यवाद देत त्यानीही तो वन्य प्राणी मोठ्या चवीने पोटात ढकलला!

लेहच्या लष्कर प्रमुखाच्या मते डुगटाच्या आसपास किआंग भरपूर दिसतात. म्हणून डुगटीचा समावेश आमच्या कार्यक्रमात हवाच. इथे आल्यावर मात्र किआंग पहावयास नेमके कुठे जायचे हे कोणालाच ठाऊक नसल्याचे दिसले. सलीम अलींची भिस्त मेजर प्रभाकर यांच्यावर. पण आमची आणि आमच्या वाहनांची पोटापाण्याची व्यवस्था करण्यासाठी त्यांनी पहिल्याच दिवशी पळ काढला. फक्त जाताना सांगितले की सिंधू नदीच्या काठाने हव्या तितक्या पाणथळ जागा आहेत, त्यावर ठुग ठुंग नक्की दिसणार.

—याचा प्रत्यय घेण्यासाठी दक्षिणेकडे चागले तीस-पस्तीस मैल वाळवट आम्ही धडाळले. त्या पाणथळ जागाही नव्हत्या आणि अर्थातच तिबेटी क्रौंचही दिसला नाही. सिंधू नदीच्या पालेकड मधून-मधून किआंग चरताना दिसले. या वाळवंटात ओलाव्याच्या आधाराने दाभणासारख्या जाड पात्याचे कडकडीत गवत उगवते. तेच किआंगचे खाद्य. विजयनने तीस किआग मोजले. मला एक ससाणा दिसला. त्याचे नाव सलीम अलींनी सांगितले ' रेडटेल्ड किंवा तांबड्या शेपटीचा बझर्ड '. वाळवंटात ' शॉर्ट टोड लार्क ' किंवा चंडोलही पुष्कळ दिसले.

शेवटी फुकचेचा विमानतळ—जो आता उपयोगात नाही—तो पाहून आम्ही परत फिरलो. हा जगातील सर्वात उंच जागेवरचा विमानतळ म्हणे. या जागेची उंची आहे १३,५४० फूट (४,१२५ मीटर).

सलीम अलींना किआग पाहण्यात फारसे यश आलेले नाही असे कळताच मेजर प्रभाकरनी सलीम अलींना दहा यार्डांवरून किआग दाखविण्याचा विडाच उचलला.

आज सकाळी किआगच्या पाठीमागे पळण्याचा (अर्थात वाहनांतून) हा कार्यक्रम (सलीम अलींच्या भाषेत ' तमाशा ') पार पाडला. जिथे किआग हमखास पाणी पिण्यास येतात अशा एका ओढ्याकाठी मेजर प्रभाकरनी आम्हाला नेले. ओढ्याचे पात्र जवळपास कोरडे होते. काही ठिकाणी पाणी साचले होते आणि सभोवती हिरवेगार लुसलुशीत गवत उगवले होते. पात्राच्या आसपास लमाची खूप झुडपे होती आणि दाभणासारखे जाड, कडकडीत गवतही वाळूत उगवले होते. एका लहान झुडपाने मात्र माझे लक्ष विशेष वेधून घेतले. झुडपे पांढऱ्या फुलांनी बहरली होती. याचे शास्त्रीय नाव ' ॲरबीस ' असे सांगितले गेले. त्साका लाचा चढ चढतानाही ही झुडपे मी पाहिली होती, पण तिथे ती तेवढी बहरली नव्हती.

दूरवर आम्हाला एक किआंग दिसला. तो पाणी प्यायला ओढ्यावर येणारच अशी मेजरसाहेबांची अटकळ. तो ओढ्यावर येईतो वाट पाहणे प्राप्त होते. नुसते बसण्यापेक्षा तमाच्या झुडपांतून हिंडून काय दिसते याची तपासणी आम्ही सुरू केली.

आमच्या जोंगा जिथे थांबल्या होत्या, तिथे वाळूत निबेटी उदरांनी (व्होल्स) बिळे केली होती. एकेक जण हळूच बिळाबाहेर येई, फुरफुरत्या नाकाने बाहेरच्या वातावरणाचा अंदाज घेई आणि जोंगाच्या चाकाकडे किंवा आणखी कशाकडे लक्ष जाताच पटकन बिळात गायब होई, पुन्हा मिनिटभराने बाहेर डोकावे. त्यांची ही क्रीडा मी बराच वेळ पहात बसलो होतो. पटकन बिळात लपणारे हे प्राणी मूळचे मध्य आशियातील पठारी प्रदेशाचे रहिवासी. तेथून ते हिमालया-पर्यंत आणि रशियाच्या पूर्व किनाऱ्यावरून बेअरिंगच्या सामुद्रधुनीमार्गे अलास्कातही पोहोचले आहेत.

आजूबाजूला तमाच्या झुडुपातून मोठ्या रोझफिंचची एक जोडी बागडत होती, हिरवळीत बरेचसे ' शॉर्ट टोड लार्क (चंडोल) ' आणि ' शिंगवाले चंडोल ' हिंडत होते, ' सॅन्ड प्लोव्हर ' पक्ष्यांच्या एक-दोन जोड्या पाणथळीतून कीटक शोधीत होत्या आणि तमाच्या एका झुडपात चिमणीच्या आकाराचे पण अधिक रेखाळ तपकिरी रंगाचे ' तिबेटी ट्वाईट पक्षी ' घरटे बांधीत होते. अंडी घाल-ण्याची त्यांची ही कदाचित दुसरी वेळ असावी. कारण एव्हाना बाकीच्या बहुतेक पक्ष्यांची पिले घरट्याबाहेर पडली होती, नाही तर अंड्यातून तरी बाहेर पडली होती. तमातून लपतछपत जाताना तिबेटी ससाची दोन पिलेही आम्ही पाहिली.

मेजर प्रभाकर यांचा अंदाज बरोबर होता. एव्हाना किआंग खरोखरीच ओढ्याच्या जवळ पोहोचला होता. त्याबरोबर मेजर साहेबांच्या लष्करी हालचाली सुरू झाल्या. त्यांनी स्वतः आपला जोंगा ओढ्याच्या खालच्या बाजूने किआं-गच्या पिछाडीला नेऊन किआंगला सलीम अलींच्या जोंगाकडे हाकलायचे ठरविले. किआंग ओढ्याच्या खालच्या बाजूने वाळवंटात निसटू नये म्हणून तेथे हुसेनचा जोंगा पाठविला. या दोन बाजूच्या हल्ल्यातून तो सुटलाच तर आमचा जोंगा तयारीत होताच.

मेजरसाहेबांनी इशारा देताच हालचालींना द्रुतगतीने सुरुवात झाली. मेजर साहेबांचा आणि सलीम अलींचा जोंगा आपापल्या जागा धरण्यासाठी वेगाने निघाले. पिछाडीहून जोंगाचा आवाज येताच किआंग गांगरला आणि ओढ्याच्या

खालच्या अगास पळू लागला. तिकडे सलीम अलींचा जोंगा त्याच्या स्वागताला सिद्ध होताच. पण इथ वाळवंटाच्या अवाढव्यतेचा आमचा अंदाज चुकला. किआगला गाठण्यासाठी सलीम अलींच्या जोंगाला कितीतरी अंतर काटायचे होते. तेवढ्या वेळात उजव्या बगलेने होणाऱ्या या हल्ल्याची किआगला चांगली कल्पना आली. सलीम अलींच्या जोंगाला चुकविण्यासाठी तो वेगाने अंतर काटून सरळ वाळवंटात घुसला. आता त्याचा पाठलाग करणे कठीण होते. ही वाळू अत्यंत फसवी होती, जोंगा कुठेही रुतून बसली असती. सलीम अलींच्या जोंगा-समोरून सुमारे पाचशे यार्डांवरून किआग वाळवंटात घुसून पसार झाला.

आम्ही आमच्या जोंगा सलीम अलींजवळ नेल्या पण मेजर साहेबाचा पत्ता नव्हता. तेव्हा आता सलीम अलींनी त्याचा पाठलाग करण्याचे ठरविले! आमच्या सर्वांच्याच जोंगा वेगाने वाळू कापीत मेजर साहेब जिकडे गेले असावे अशी सर्वांची अटकळ होती, तिकडे निघाल्या. पण बरेच पुढे जाऊनही मेजर साहेबाची जोंगा दिसेना. ते टेकड्यांच्या पायथ्यापर्यंत गेले असावेत असे वाटून हुसेनच्या जोंगाला तिकडे पाठविण्यात आले आणि आम्ही सावकाश परत जाऊ लागलो. तेव्हा तीन किआगचे एक कुटुंब वाळूत उगवलेले गवत खाताना आम्हाला अचानक दिसले. सलीम अलींनी आपली जोंगा हळूहळू त्यांच्या दिशेने घेण्यास सांगितले. सलीम अलींना किआगची छायाचित्रे शेवटी एकदा मिळणार म्हणून आम्हाला समाधान वाटते न वाटते तोच डोंगराकडून येणारा हुसेनचा जोंगा त्या किआग कुटुम्बाला दिसला, आणि त्यांनी ओढ्याच्या दिशेने धूम ठोकली. आता त्यांना तिकडे अडविणारे कोणी नव्हते.


थोड्या वेळाने मेजर साहेबाची जोंगा आमच्या मागून येऊन थडकली! किआगचा पाठलाग करीत ते वाळवंटात घुसले होते पण या वाळूच्या अमाप पसाऱ्यात ते आम्हाला दिसू शकले नाहीत. आम्ही भलतीकडेच त्यांचा शोध घेतोय असे जाणवल्याबरोबर ते आमच्या पाठलागावर निघाले होते!

एकूण डुगटीच्या दोन दिवसात आमच्या ज्ञानात किंवा आतापर्यंत जमवि-लेल्या माहितीत फारशी भर पडली नाही पण एवढ्या विस्तृत वाळवंटाच्या एका कोपऱ्यात विसावलेला डुगटीचा तळ मला आवडला. इथल्या तरुण तळ-प्रमुखाशी आमची दोन दिवसातच दोस्ती जमली. सलीम अलींची शुभ्र दाढी, ऋषितुल्य चेहरा, सर्वांशी हसून आणि आपुलकीने बोलण्याची लकब यांनी इथल्या सामान्य जवानानाही आकर्षित केले. चार बराकींच्या आश्रयाने

राहणाऱ्या या देशोदेशींच्या वाऱ्यामध्ये आम्ही सामावून गेलो होतो. शेवटच्या दिवशी आम्ही जायला निघालो तेव्हा आम्हाला आणि त्यानाही वाईट वाटले.

डॉक्टरसाहेब आता जाणार हे पाहून एका सरदारजीने त्याना एकातात गाठले आणि हळूच विचारले, "डॉक्टरसाहेब, मूल होत नाही, काय करावं!" डॉ. सलीम अलींनी काय उत्तर दिले हे मात्र कळले नाही.

चुशूलपासून आमच्याबरोबर असलेल्या डॉक्टर गौरनाही आमचा निरोप घेताना वाईट वाटले. हे डॉक्टर होते दिल्लीचे आणि लवकरच रजेवर दिल्लीला परतणार होते. दिल्लीला परत भेटण्याची आश्वासने एकमेकाना देत आम्ही त्यांचा निरोप घेतला. काल सध्याकाळी त्यांच्या जागी डॉ. डोग्रा हे आपल्या ॲम्ब्युलन्ससह आमच्यात दाखल झाले.



डुंगटीचा 'रेव्हन

डुंगटीच्या कावळ्याची आणि आमचीही चागली जानपछान झाली होती. तिबेटी रेव्हन हा कावळ्याच्या जातीतला सर्वात मोठा कावळा आणि 'लडाखी', किंवा इग्रजीत ज्याला 'कॅरिअन क्रो' म्हणतात तो कावळा, असे दोन्हीही इथे पहायला मिळाले. अगदी उजाडताना या दोन्ही कावळ्याची पथके आमच्या तळावर येऊन दाखल होत. तळाच्या एका कडेला असलेल्या उकिरड्यावर दिवसभरात लोकानी आणून टाकलेल्या निरनिराळ्या जिनसाचा मग फन्ना उडे. बराकींच्या छपरावर बसून कोणाचे कूजन तर कोणाचा विलाप चाले. सुमारे तासभर तळावर कावळ्याची वर्दळ असे, त्याच्या घोगऱ्या पण तरीही कानात बाणासारख्या घुसणाऱ्या आवाजाने दिवसाची नादी म्हटली जाई. तळ ते सिंधू नदी यामधली सफाई करीत करीत काळ्या सेनेची ही पथके सिंधू

नदीच्या पलिकडच्या हिरवळीत जात, तिथे चरणाऱ्या मेंढ्याच्या आणि गुरांच्या पायांतून फिरत कीटक वेचीत आणि मग कुठच्या कुठे पसार होत.

संध्याकाळी आम्ही सिंधूच्या काठी हिंडायला जात असे. इथे सिंधूचे पात्र सुमारे दोनशे फूट रुंद असावे. ते फार खोल नव्हते आणि पाण्याला वेगही फारसा नव्हता. पात्रात भरपूर मासे सापडत. सायकाळी माशाचे कढण घेण्याची इथे प्रथाच दिसली. हुसेन आणि विजयन मासे पकडण्याची कोशीश करीत, पण माझे लक्ष असे निळ्याजांभळ्या टेकड्यामागे जाऊ पाहणाऱ्या सूर्याकडे. दुपारच्या उन्हाची दाहकता आता नाहीशी होई. पश्चिमेकडून येणारा वारा उन्हाळी थंडीची नाजूक चाहूल फुलवीत फुलवीत अंगाला स्पर्शून जाई. लांबणाऱ्या सावल्या डोंगराच्या कडे-कंगोऱ्याना आणि वाळूच्या शिंगाना आकार देत, सौष्ठव देत नाहीशा होत. वातावरण इतके तरल भासे की दूरवरचे डोंगर सिंधू नदीत आपले प्रतिबिंब पाहण्यासाठी जवळ सरकले आहेत असे वाटे. दोन डोंगरामधल्या ओहोळात घुसलेल्या प्रकाशाच्या पट्ट्यातून जाणारा मेंढरांचा कळप तेजाने झळाळे आणि थोड्याच वेळात दाटत चाललेल्या सावलीत अदृश्य होई. वाऱ्याने डुचमळलेल्या पाण्यावर एखादा बंडखोर मासा हलकेच लपका मारी, आणि सरोवराकडून डोंगरात निवाऱ्याकडे निघालेल्या चक्रवाकाचा आँख आँख शब्द आधी स्पष्ट कानावर येई आणि वाऱ्यावर विरत चालला असतानाच सूर्यास्त होई.

□

## अकरा

# हान्ले

दहा जुलै

डुगटीपासून पुढे सिंधू नदी पश्चिमेकडे एक मोठे वळण घेते आणि नंतर वायव्येकडे वाहात जाते, या वळणावरच दक्षिणेकडून हान्ले नदी तिला येऊन मिळते.

सिंधूनदीबरोबर पश्चिमेकडे वळत वळत आम्ही लोमाला येऊन पोहोचलो. हा सारा प्रवास सिंधूच्या काठच्या वाळूतून आणि डोंगरउताराला लगटून काढलेल्या रस्त्यावरून झाला. ही वाळू ओली होती. त्यात मधून-मधून पाणी साचले होते. डोंगरात काही ठिकाणी बदामी, किरमिजी रंगाच्या प्रचंड पाषाणाचे कडे होते, अरुंद घळ्या होत्या आणि त्यात मोठमोठ्या शिळा घसरगुंडीवर बसावे तशा थाटात पडलेल्या होत्या. या कड्यांवर आणि त्यातील लहानमोठ्या गुहाजवळ काही चक्रवाक बदके आम्हाला दिसली. अशाच जागी त्यांची घरटीही सापडण्याची शक्यता होती. पण एव्हाना पिले अंड्यातून बाहेर पडली असणार.

लोमाजवळच हान्ले नदी सिंधूला मिळते. तिच्या पाण्याचा करडा गढूळ रंग पाहून तिचा उगम हिमनदीपासून होत असावा असा अंदाज करता येत होता. नदीच्या प्रवाहाच्या बाजूने तमाची दाट झुडपे होती. लोमा इथे आमच्या जेवणाची तयारी होईपर्यंत हुसेन, विजयन आणि डॉ. विश्वास नदीकाठाने हिंडून आले, पण त्यांना पिवळ्या डोक्याच्या धोबी पक्ष्याशिवाय काही दिसले नाही. नदीकाठी एक तिबेटी गोम्पा होता; आणि त्याच्या शेजारी एक विलोचा वृक्ष होता. त्याचे भले जाड खोड त्याच्या वयाची साक्ष देत होते. तो शतायुषी

तर निश्चितच असावा. कारण इथे झाडे फार सावकाश वाढतात. टांगत्से सोडल्यापासून मोठा असा वृक्ष आम्ही प्रथमच पाहत होतो. खळाळणारी नदी, आसपासची हिरवीगार झुडपे, तो वृक्ष आणि पांढराशुभ्र, नीटनेटका गोम्पा, पार्श्वभूमीला त्रिटकरी रंगाचे भगभगीत डोंगर आणि त्याच्या शिखराला टेकलेल्या, उन्हात चमकणाऱ्या वाळूच्या शिगा – हे सर्व दृश्य छायाचित्र घेण्यासारखे निश्चितच होते.

वळणे वळणे घेत चाललेल्या हान्ले नदीचे खोरे मला आवडले. तिच्या उजव्या तीरावरून आता आमचा रस्ता जात होता. लहान मोठ्या वाळूच्या टेकड्यामधून तर कधी त्याच्या माथ्यावरून आमच्या जोंगा धावत होत्या. उजव्या तीरावरचा मुलूख कमालीचा वैराण होता. गवताचे एक पाते नाही की ॲरबीसचे किंवा ॲस्ट्रॅगॅलसचे झुडुप नाही. पण टेकड्याचे रंग मात्र विलक्षण गडद जाभळे आणि हिरव्या रंगाचे आख्खे डोंगर मी आज प्रथमच पाहिले. अर्थात हे सगळे दगडाचे रंग, डोंगराचे आणि फत्तराचे सौंदर्य पाहण्यास आम्हास मुबलक वेळही मिळत होता, कारण आमच्या जोंगा दर काही अंतरावर नियमितपणे वाळूत रुतून बसत होत्या. मग खाली उतरून त्या ढकलणे. आमच्याबरोबरच्या जवानानी आम्हा लोकांना हात लावू दिला नाही की सृष्टीसौंदर्य पाहत वेळ काढणे असा प्रकार नियमित चालू होता.

डाव्या तीराकडे पाहून मात्र डोळे निवत होते. उजव्या तीरावरचा प्रदेश जितका भगभगीत होता, तितकाच डाव्या तीरावरचा हिरवागार होता. हा प्रदेश जरा खोलगट होता, नदीने कुठे कुठे आपल्या भुजा त्यात लाबविल्या होत्या. आणि हिरव्यागार हिरवळी दूरवरच्या डोंगराच्या पायथ्यापर्यंत पसरल्या होत्या. त्या हिरवळीत अतराअतरावर एखादा तबू दिसे आणि जवळपास पाढऱ्या मेंढ्या आणि काळे याक याचे कळप चरताना दिसत. आपले लांब, टोकदार पख सावकाश हलवीत नदीवर येरझारा घालणारा टर्न मध्येच दिसे.

पुढे मात्र उजव्या तीरावरचे वाळवट चागलेच आडवे झाले, डावीकडच्या हिरवळी निरुंदल्या आणि दूरच्या डोंगराचे नाकाड एकदम नदीच्या पात्रात घुसले. याच नाकाच्या शेंड्यावर हान्लेचा सुप्रसिद्ध तिबेटी गोम्पा दुरूनही आम्हाला दिसला

सरसर, चपचप वाळू कापीत आमच्या जोंगा एक टेकाड उतरल्या आणि नदीकाठी थाबल्या. इथे, चपट्या आणि गोल दगडगोट्यानी भरलेल्या पात्रातून

तीन-चार प्रवाहांनी नदी वाहात होती. पात्रापलिकडे डोंगराच्या पायथ्याशी उभारलेली चार-पाच घरे, त्याच्या आसपास आम्हाला पहावयास जमा झालेली गोल चेहऱ्याची, गोरी पण कळकट्ट मुले—माणसे एक जीर्ण विलो वृक्ष आणि मावळत्या उन्हाने, काळसट निळ्या दिसणाऱ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर चमचमणाऱ्या गोम्पाच्या पांढऱ्याशुभ्र भिंती, असे ह्यान्लेचे पहिले दर्शन आम्हाला झाले. आमचा तळ मात्र कुठे दिसत नव्हता.

इथेही ह्यान्लेचे आणि उत्तर क्षितिजावर पसरलेल्या हिमाच्छादित शिखराचे मनसोक्त दर्शन घेणे आवश्यक होते. कारण वाळवंटात सतत रुतणारी आमची एक टनी ट्रक आता नदीच्या पात्राच्या मध्यभागी बंद पडली होती आणि गर्भवती म्हशीसारखी मजेत पाण्यात डुबत होती, हलायला तयार नव्हती.

आमच्या बरोबर असलेली दुसरी ट्रक मात्र सुखरूप पलिकडे पोहोचली होती. आम्ही येऊन पोहोचलो तेव्हा, पाणी नेमके कुठे खोल आहे, कुठे धारेला वेग आहे, याची पाहणी चालू होती. आमच्या अग्रभागी असलेल्या मेजर साहेबाची पाहणी पूर्ण होताच त्यांनी सलीम अलींच्या जोंगाला कूच करण्याचा आदेश दिला.

लहानमोठ्या लाट उसळवीत, अडकून पडलेल्या ट्रकला लाटाच्या टपला मारीत सलीम अलींची जोंगा पाण्यातून पलिकडे गेली. पाठोपाठ डॉ. डोग्राची ॲम्ब्युलन्स आणि डॉ. विजयनची जोंगा पाण्यात उतरल्या. यावेळी विश्वास आणि देशपाल सलीम अलींबरोबर नदीपार झाले होते. मेजरसाहेब विजयन बरोबर होते आणि मी व हुसेन मागे थांबलो होतो. डॉ. डोग्रांनी कौशल्याने ॲम्ब्युलन्स पाण्याबाहेर काढली, पण डॉ. विजयनबरोबर मेजर प्रभाकर आहेत, हे नदीला कसे कळले कोण जाणे! तिने पात्राच्या मध्यभागी त्या जोंगाला बरोबर आपल्या पकडीत धरून ठेवले. केवळ वाळवंटातच नव्हे तर नदीतही जोंगा रुतविण्यात मेजरसाहेब यशस्वी झाले!

नदीत अडकून पडलेली भीमकाय ट्रक, हिरवी बुटकी जोंगा आणि त्याच्या अंगाखांद्यावर पँट वर सारून लीलया वावरणारे किडकिडीत मेजर प्रभाकर पाहून दलदलीत डुचमळणाऱ्या हिरव्या टेंगळावर शेपूट हलवीत नाचणाऱ्या धोबी पक्ष्याची मला आठवण झाली.

डॉ. विजयन मात्र साहसी संशोधकाला साजेशा धीरगंभीर वृत्तीने जोंगात स्वस्थ बसून होते आणि नदीचे पाणी लचकत, मुरकत, गिरक्या घेत त्याच्या

बाजूने वाहत होते.

पलिकडे गेलेल्या ट्रकमधून साखळदंड काढून अडकलेल्या वाहनांकडे तो फेकण्यात मेजरसाहेब एव्हाना यशस्वी झाले होते. थोड्याच वेळात ट्रक आणि जोंगा याना बाहेर खेचण्यात आले आणि आमची जोंगाही बिनतक्रार त्याच्या-पाठोपाठ नदीपल्याड झाली.

नदीपलिकडे व्यवस्थित पोहोचल्यावर मी आजूबाजूला नजर टाकली. पश्चिमेकडे एक विस्तीर्ण पाणथळ पसरली होती. काही ठिकाणी गवत खूप दाट होते व जागोजाग पाणीही साचलेले दिसत होते, तर काही ठिकाणचे पाणी आटून गेले होते आणि मातीच्या उचवट्यावर पांढऱ्या क्षाराचा थर पसरलेला दिसत होता.

या दलदलीच्या पाठीमागे पिवळ्या, बदामी आणि किरमिजी रंगाच्या लहान टेकड्या होत्या, त्याही पाठीमागे नारिंगी-तपकिरी रंगाचे प्रचंड पर्वतांचे उतार होते आणि तेथून चढत चढत नजर ढगाना टेकलेल्या हिमशिखरापर्यंत जाऊन थबकत होती.

या पाणथळीच्या पूर्वेकडील टेकड्यांच्या पायथ्याने गेलेल्या पायवाटेवरून आणि मधे मधे साचलेल्या तळ्यांतून वाट काढीत आमच्या जोंगा इन्डो-तिबेटी सीमा सुरक्षा दलाच्या तळावर पोहोचल्या.

आमच्या तळासमोर पसरलेली ती विस्तीर्ण पाणथळ जागा पाहताच मला चुशुलची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही. तेव्हा बराकीत सामान लागताच मी बाहेर पडलो आणि दुर्बिणीतून निरखून पाहू लागलो. मला जी शंका आली होती ती डॉ. विजयनलाही आली असावी. तोही पाणथळ जागेकडे दुर्बिणीतून पहात होता आणि थोड्याच वेळात त्याचे तोंडून एक हर्षोद्गार बाहेर पडला.

"क्रेन, क्रेन" तो ओरडला. तो जिकडे पहात होता, तिकडे मी नीट पाहिले, पण सूर्याच्या उन्हात चकाकणाऱ्या हिरव्या पिवळ्या पट्ट्याशिवाय मला काही दिसले नाही. या हिरव्या पट्ट्यातच मला काही खाणाखुणा विजयनने सांगितल्या आणि थोड्याच वेळात डुलणाऱ्या दोन काळ्या माना माझ्या डोळ्याना सापडल्या, आणि सलीम अलींच्या संमतीची वाट न पाहता आम्ही धावत सुटलो.

पाणथळीत आम्ही जसजसे आत घुसत चाललो, तसे साठलेले पाणी आणि त्यावर तरंगणारे, हिरव्या गवताने आच्छादलेले मातीचे उचवटे लागले. त्यावरून

उद्या मारीत पुढे जाता जाता मध्येच थांबून आम्ही क्रौंच निरखीत होतो. ती क्रौंचाची जोडी एका मेंढ्याच्या कळपाजवळ हिंडत होती. चुशुललाही त्याना आम्ही मेंढयाच्या कळपाजवळच पाहिले होते. एवढेच नव्हे तर क्रौंच ओरडू लागले की मेंढ्या घाबऱ्याघुबऱ्या होत आसरा शोधण्यासाठी पळू लागतात हेही आम्ही पाहिले होते. क्रौंच आम्हाला किती जवळ येऊ देतात हा प्रश्न होता.

आम्ही क्रौंचाच्या जवळ जायचा प्रयत्न करीत होतो आणि ते माना डोलवीत सावकाश आमच्यापासून दूर जात होते. पण उडत मात्र नव्हते. ते उडू इच्छित नाहीत असे दिसल्याबरोबर आमच्या दोघाच्याही मनात आणखी एक शंका उद्भवली आणि आम्ही त्याच्या आसपासची जागा बारकाईने निरखू लागलो. अजूनही क्रौंच आमच्यापासून सुमारे दीडशे यार्ड दूर होते.

यावेळेलाही विजयनलाच ती आकृती प्रथम दिसली आणि त्याने मला दाखविली. क्रौंचाच्या पायामधून एक चिमुकला लोकरीचा नारिंगी रंगाचा गोळा तुरूतुरू धावत होता. क्रौंच उडायला का तयार नाहीत हे आता स्पष्ट झाले. पिलाला सोडून आईबाप कुठे जाणार ?

क्रौंचाचे पिलू हा नवीन शोध होता. त्याच्या पिलाला अजून कोणी पाहिले नव्हते, त्याचे वर्णन कोणी केलेले नव्हते. क्रौंचाच्या पिलाचा रंग आणि आकार ही गोष्ट शास्त्राला अजून अज्ञात होती. आम्ही पाहात असलेल्या पिलाचे वय सुमारे दोन महिने असावे.

पिलू दृष्टीस पडताच आम्ही उलट दिशेने धावत सुटलो. सलीम अलींना ही बातमी कळविण्यासाठी. त्याचा आमच्यावर विश्वासच बसेना. अंधार पडत चालल्याने " उद्या नीट पाहू, " एवढेच ते आम्हाला म्हणाले.

☐

बारा

# पुन्हा क्रौंच

अकरा जुलै

पाणथळ जागेत घोडे कुचकामी ठरतात हे माहीत असूनही मेजरसाहेबांनी घोडे का ठरविले हे उलगडले नव्हते. पण आमची न्याहरी आटपते न आटपते तोच घोड्याना हाकलणारे घोडेवाले आणि त्याना हाकलणारे डॉ. डोग्रा आणि मेजर प्रभाकर वगैरे सरंजाम हजर झाला.

डॉ. डोग्राना घोड्याचा विशेष षोक दिसला. प्रत्येक घोड्याशी वैयक्तिक ओळख करून घेणे हा त्याचा कार्यक्रम बराच वेळ चालला होता. आम्ही बिचकत का होईना, घोड्यावर बसलो खरे पण घोड्यावरून पाणथळ ओलाडण्याचा आमचा विचार आहे हे कळताच "मध्ये पाणी लागल तर साहेबाना उतराव लागेल" अस घोडेवाल्यानी नम्रपणे बजाविल.

हे ऐकताच हुसेनने चालतच जायचे ठरविले. डॉ. सलीम अलींनी कुठपर्यंत घोडा जाऊ शकतो, हे पहायचे ठरविले; 'आफ्रिकी चीफ' डॉ. विजयन याच्याशी हुज्जत घालण्याची घोडेवाल्याची छाती झाली नाही. त्याचा घोडा पाणथळीच्या मध्यभागाकडे जाताना आम्ही सर्वांनी आदरपूर्वक पाहिला आणि मी आणि डॉ. विश्वास यांनी घोड्यांचा नाद सोडून पाणथळीच्या बाजूने जाणाऱ्या पायवाटेने दुसरे टोक गाठण्याचा विचार केला.

पाणथळीच्या उत्तर आणि पूर्व बाजूला विटकरी रंगाच्या लहान टेकड्या होत्या त्याच्या पायथ्याशी वाळवंटाचा पट्टा होता. जोंगामधून आम्ही हे वाळवंट ओलाडले आणि पूर्वेकडून पाणथळीच्या दिशेने येऊ लागलो. जोपर्यंत वाळू कोरडी होती, तोपर्यंत जोंगा पुढे जाऊ शकली. मग मात्र पाय टाकला तर

दबणारी कचकचीत ओली वाळू लागली आणि जोंगा थांबवून आम्ही बाहेर पडलो. पाणथळ जागेच्या या काठावर तिबेटी निर्वासिताचे दोन तंबू होते: दोन वेण्या घातलेला एक उंच, धिप्पाड माणूस तंबूजवळ बसून काम करीत होता, एक म्हातारी बाई लोकर पिंजत होती आणि एक तरुण बाई मुलाला पाजीत होती. त्यांच्या मेंढ्या जवळपास चरत होत्या, बांधून ठेवलेली कुत्री आमच्यावर भुंकत होती आणि दोन – तीन पोरं कुतूहलाने आमच्याकडे पहात होती.

दुर्बिणीतून आम्ही पाणथळीचा भाग निरखिण्यास सुरुवात केली. डॉ. सलीम अलींचा घोडा वेताबेताने पाणथळीतून वाट काढीत होता. त्याच्याबरोबर देशपाल होता. हुसेन आणि विजयन यांचा मात्र पत्ता नव्हता. क्रौंचाची जोडीही कुठे गडप झाली होती कोण जाणे!

गंमत म्हणजे डोक्यावर स्ट्रॉ-हॅट घातलेला देशपाल आता साहेब बनला होता आणि देशपालचा पायघोळ तिबेटी अंगरखा सलीम अलींनी चढविला होता. क्रौंचाना चकवून त्यांच्या जवळ पोहोचण्यासाठी ही तयारी. पण क्रौंच परागंदा होते.

योग्य तेवढे अंतर ठेवून आमच्या भोवती घुटमळणाऱ्या एका चुणचुणीत तिबेटी पोराला मी जवळ बोलाविले. त्याला दुर्बिणीतून गंमत दाखविली आणि हातवारे करून विचारले, "टुंग टुंग ?"

"दिखाएगा!" तो पोरगा हिंदीत बोलला आणि त्याला हिंदी समजत नसणार हा माझा समज जमीनदोस्त झाला तो दोन इयत्ता शिकलेला होता आणि आता आई-वडिलांच्याबरोबर इकडे आला होता. एक रुपयाच्या बोलीवर त्याने 'टुंग टुंग' शोधण्याची तयारी दाखविली आणि दलदलीतल्या टेंगळा-वर उड्या मारीत दूर निघून गेला.

सुमारे अर्ध्या तासाने तो परत आला, म्हणाला, दूरवर चरणाऱ्या मेंढ्यांच्या कळपाच्या बाजूला टुंग टुंग आहेत. मी त्याच्या बरोबर निम्मे अंतर चालून गेलो आणि दोन टेकड्यांच्या मधून एक क्रौंच खरोखरच उडत आला आणि जमिनीवर उतरला. उतावळेपणाने आम्ही आणखी काही अंतर पळालो. आता मेंढयांच्या कळपामागे मला दुसराही क्रौंच दिसला. आपली लांब मान डोलवीत तो टेकड्यांच्या दिशेने चालत होता. दोन्हीही क्रौंच आता साद घालीत होते. पण ते अजून आमच्यापासून इतके दूर होते की त्यांची ती सुप्रसिद्ध पल्लेदार हाक अत्यंत अस्पष्ट ऐकू येत होती.

मेंढयांच्या कळपाच्या अलिकडे बसलेले हुसेन आणि विजयनही आम्हाला दिसले. तेही क्रौंचाचे बारीक निरीक्षण करीत होते. क्रौंचाची जोडी आता टेकडीच्या पायथ्याशी पोचली होती. तेथून एक पक्षी उडाला आणि दोन टेकड्यांमधून पलिकडे गेला. दुसरा पक्षी हुडकून काढायला आता प्रयास पडत होते, इतका त्याचा रंग आणि आकार टेकड्याच्या किरमिजी रंगात मिसळून जात होता. उडून दूर गेलेला पक्षीही काही वेळाने परत आला. मग ती जोडी मागे फिरली आणि पश्चिमेकडे आमच्यापासून दूर दूर सरकू लागली. ते पाहून हुसेन आणि विजयन परत फिरलेले दिसले आणि आम्हीही त्यांचेच अनुकरण केले.

आजचा दिवस हुसेन आणि विजयनने गाजविला. हुसेन आणि विजयनला क्रौंचाच्या पुष्कळच जवळ जाण्यात यश मिळाले. केवळ दीडशे फुटांवरून हुसेनने क्रौंचांचे फोटो टिपले तर विजयनने त्यांचा तो सुप्रसिद्ध आवाज ध्वनिमुद्रित केला. नारिंगी रंगाचे क्रौंच बालकही त्या दोघांनी पाहिले. सलीम अलींना खूप आनंद झाला असल्यास नवल नाही. त्यांनी त्या दोघांचे कौतुक सर्वांजवळ केले.

संध्याकाळी हान्लेचा गोम्पा पाहण्याचा कार्यक्रम झाला. जिथे आम्ही हान्ले नदी ओलांडली तिथेच एका उंच टेकाडावर हा गोम्पा आहे. काल आमच्या गाड्या नदी ओलांडण्याचा खटाटोप करीत असताना गोम्पातले समस्त लामा उंचावरून गंमत पहात होते. आज टेकडीची खडी चढण आम्ही चढून गेलो. सलीम अलीही या वयात तो चढ सहज चढले. विरळ हवेचा त्रास त्यांना झालेला दिसला नाही. जयालबाईंची मला आठवण झाल्याशिवाय राहिली नाही.

गोम्पाचे बांधकाम ठिकठिकाणी ढासळले होते आणि त्याच्या दुरुस्तीचे प्रयत्न चालले होते. दुरुस्तीचे कामही लामांकडेच असावे. कारण एकेका लामाला झटकला असता तर मणमण धूळ एकेकाच्या अंगातून आणि कपड्यातून सहज बाहेर पडली असती. आंघोळीचे प्रस्थ न माजविण्याचा गुण त्यांच्याकडूनच शिकावा.

आतही पडझड झालेलीच दिसली, पण मध्यभागी असलेले मंदिर सुस्थितीत होते, हा एक डोंगरी किल्लाच म्हणा ना ! या गोम्पाच्या किंवा राजवाड्याच्याही भिंती डोंगराच्या कडेकपारींशी इतक्या बेमालूम सांधलेल्या असतात की भिंती मुद्दाम बांधलेल्या आहेत असे जाणवतच नाही.

मंदिरात काळोख होता; मध्यभागी जमिनीवर बुटकी, लांब, टेबले होती. त्याच्याजवळ लामांना बसण्यासाठी गालिचे घातलेले होते. त्याच्या डोक्यावर एकावर एक कळसापर्यंत चढत जाणाऱ्या लाकडी गॅलऱ्या होत्या. भिंतीच्या कडेला लाकडी घडवच्यावर हस्तलिखितांच्या थप्प्या रचलेल्या होत्या. लामाचे धर्मग्रंथ ते हेच ते पुढे ठेवून त्याचे पठन चालते. आम्ही लामाना त्याचे काही मत्र म्हणण्यास सागितले आणि विजयनने ते ध्वनिमुद्रित केले. ती टेप त्याना वाजवून दाखविल्यावर त्याच्या कळकट्ट पण निरागस चेहऱ्यावर उमटलेले हसू पाहून गोम्पातल्या वासाने चक्रावलेली आमची डोकी ठिकाणावर आली. कारण गोम्पात आमच्याबरोबर आत शिरलेले लामा, तेथील जीर्ण हस्तलिखिते, याकच्या दुधापासून केलेले तूप भरून ठेवलेले दिवे, आणि असख्य वर्षांच्या वापराने चामट झालेले लाकडी कठडे आणि गालिचे, यांच्यापासून निघणाऱ्या संमिश्र दर्पाने आमची झिंगल्यासारखी अवस्था झाली नसली तरच नवल.

लामानी नतर आम्हाला दुसऱ्या मजल्यावर नेले, तेथली भित्तिचित्रे दाखविण्यासाठी. गोम्पाच्या आतल्या भिंतीवरही चित्रे रगविलेली होती, पण ती पाहण्याचे आमचे प्रयत्न फोल ठरले. इतकी ती अस्पष्ट झाली होती. या मजल्यावरील चित्रे मात्र खूपच चांगल्या स्थितीत होती. बहुतेक चित्रामध्ये वन्य प्राणी आणि पक्ष्याना स्थान होते. क्रौंचही त्यात प्रामुख्याने झळकत होते हे विशेष. चक्रवाक बदके, राजहस आणि वन्य मेढे व लाडगे यानाही चित्रामध्ये स्थान होते. क्रौंचांच्या ज्या निरनिराळ्या 'पोझेस' दाखविल्या होत्या, त्या खूपच स्वाभाविक आहेत हे जाणवत होते.

येताना आणि जाताना आमच्या जोंगाना एक लहानसे तळे पार करावे लागले. आमच्या नेहमीच्या फौजी सारथ्याला बाजूला सारून जोंगाचे चक्र डॉ. डोग्रानी हातात घेतले होते. या तळ्याच्या पाण्याखाली लपलेल्या एका खडकाचा त्याना राग आला का त्याच्याबद्दल आपुलकी वाटली हे नीटसे कळले नाही, पण जाताना आणि येतानाही या खडकाला जोंगाची अचूक आणि जबरदस्त धडक देण्यास डॉक्टरसाहेब चुकले नाहीत! परिणामी तळ्याबाहेर येताच जोंगा बद पडली, तिची टाकी फुटली आणि बाकीचे अतर आम्ही चालत काटले. सुदैवाने मार्गात आणखी एखादे तळे नव्हते.

परत येताना वाटेत सुरक्षा दलातील दोघे भेटले. सकाळभर आम्ही क्रौंचाच्या मागे होतो, हे कळताच त्यातला एक म्हणाला की दोन आठवड्यांपूर्वी दलाच्या

काही अधिकाऱ्यानी इथे दोन क्रौंच मारले, शिजविले आणि खाल्ले. वन्य प्राण्याची जाणून बुजून हत्या झाल्याचा हा दुसरा प्रसंग कानावर येत होता. ही बातमी ऐकून सलीम अली चांगलेच संतापले. बातमीच्या खरेखोटेपणाची शहानिशा करून योग्य वाटल्यास उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविण्याचा निश्चय त्यानी तावडतोब जाहीर केला.

फौजी लोकाना आणि अधिकाऱ्याना वन्यप्राण्याची हत्या करण्यास प्रमुख सेनाधिकारी यानी मनाई केल्याचे लेहला येताच आम्हाला कळले होते. या हुकमाची कडक अमलबजावणी करण्यात येत असल्याचेही आम्ही पाहिले होते. दुर्दैवाने इतर सुरक्षा दले वन्य प्राण्याच्या संरक्षणाबाबत तितकी जागरूक दिसत नव्हती. त्याना वेळीच जाग आणली गेली नाही, तर लडाखमधील वन्य जीवन थोड्याच दिवसाचे सोबती आहे असे खेदाने म्हणावे लागते.

बारा जुलै

बारा जून रोजी आम्ही पुणे सोडले होते, म्हणजे त्या गोष्टीला आज महिना होऊन गेला. १२ जुलै म्हटले की पानशेतची आणि त्यावेळच्या पुण्यातील परिस्थितीची आठवण येते. पुण्यात आजही कदाचित मुसळधार पाऊस चालू असेल. इथे मात्र सतत स्वच्छ हवा आणि नको होण्याइतका सूर्यप्रकाश आम्ही अनुभवीत आहोत.

बारा जुलैला 'पानशेत' झाले असेल, पण बारा जुलैलाच, म्हणजे आज, मला काळ्या मानेच्या क्रौंच पक्ष्याची छायाचित्रे घेण्याची संधी मिळाली; सुमारे दोनशे फुटावरून.

आज क्रौंच कुटुंबाला 'घेराओ' घालून त्यांची शक्य तितक्या जवळून पाहणी करण्याचा, छायाचित्रे घेण्याचा, प्रयत्न करायचा असे आम्ही ठरविले होते. कोणी कोणत्या बाजूने स्वारी करायची ही खलबते करूनच आम्ही निघालो. सलीम अलींनी क्रौंचाना गडविण्यासाठी देशपालचा तिबेटी डगला पांघरला होता. त्यांच्या डोक्यावरची टोपी मात्र तिबेटी नव्हती. तेवढा फरक हुशार क्रौंचाच्या ध्यानात आला असता, पण त्याला सलीम अलींचा नाइलाज होता. 'पांढरी शुभ्र दाढी आणि ती खाकी टोपी याशिवाय सलीम अलींना मी कधीही पाहिलेले नाही' अशी त्यांच्या वृद्ध भगिनीचीही तक्रार होती!

रोज काही वेळ तरी आम्ही घोड्यावर बसलेच पाहिजे, असा डॉ. डोग्रांचा

आग्रह असल्यामुळे तळापासून पाणथळीपर्यंत मैलभर अंतर, घोडेवाल्यांच्या मागून निमूटपणे चालणाऱ्या पण आम्हाला पाठीवर घेण्यास स्पष्टपणे नाराजी दाखविणाऱ्या घोड्यावरून आम्ही काढले. पण डॉ. डोग्रा रपेट करावयास निघून जाताच घोड्याच्या इच्छेस मान देऊन आम्ही पायीच पाणथळीत आलवर घुसण्यास सुरुवात केली. उत्तर आणि दक्षिण बाजू रोखून धरण्यास अनुक्रमे हुसेन आणि डॉ. विजयन रवाना झाले. पूर्वेकडून क्रौंचाना पश्चिमेकडे म्हणजे सलीम अलींच्या बाजूस रेटण्यासाठी मी निघालो.

क्रौंच कुटुम्बाने आम्हाला दुरूनच पाहिले असावे, कारण आपल्या लांब माना सावकाश डोलवीत ते वायव्येकडे निघाले. दोन पक्ष्याच्या मध्ये सुमारे वीस फुटांचे अंतर टेवून ते चालत होते. ते उडत नव्हते, कारण त्यांच्यामध्ये त्यांचे बाळ तुरुतुरू धावत होते. अर्थात हा अंदाज, कारण इतक्या दुरून दुर्बिणीतूनही ते आम्हाला दिसणे शक्य नव्हते. पण ते त्यांच्याबरोबर असणार हे निश्चित.

वायव्येकडे त्यांचे मार्गक्रमण चालू असतानाच पश्चिमेकडून येणारे सलीम अली त्यानी पाहिले असावेत. कारण त्यानी तात्काळ 'घूम जाव' केलेला मी पाहिला. दक्षिणेकडून पुढे येणारे डॉ. विजयन खूपच मागे राहिले होते; क्रौंच दक्षिणेकडे वळलेले पाहून हुसेन थांबूनच त्यांचे निरीक्षण करीत होता. सलीम अली पश्चिमेकडून सावकाश पुढे येत होते. दक्षिणेकडून क्रौंचाना अडविणारे कोणी नाही हे पाहताच मी त्या बाजूला धावण्यास सुरुवात केली

नेहमीप्रमाणे, पाणथळीत तरंगणाऱ्या हिरव्या टेंगळांवरून उड्या मारीत, मध्येच आडव्या येणाऱ्या मोठ्या प्रवाहाला चुकविण्यासाठी आडवातिडवा जात मी क्रौंचाच्या खूपच जवळ पोहोचलो. आता दोन्ही पक्षी आपल्या उंच माना खाली करून त्या जमिनीला समांतर धरून पुढे पुढे जात होते. त्यांच्यामध्ये पिलू मात्र मला दिसत नव्हते. पिलू कुठे गेले असावे असे आश्चर्य मी करीत असतानाच एक पक्षी उडाला आणि माझ्यासमोरून पूर्वेकडे उडत गेला माझ्यापासून सुमारे दीडशे फुटावर तो उतरला आणि मान जवळ जवळ जमिनीला टेकवीत, दोन्ही पंख शरीरापासून विलग करून तो ठेचकाळत पुढे जाऊ लागला. माझे लक्ष पिलाकडे जाऊ नये, स्वतःकडे जावे म्हणून तो जखमी झाल्याचे नाटक करीत होता, पिलाचा पाठलाग सोडून मी त्याला धरायला त्याच्या पाठीमागे जावे ही बिचाऱ्याची अपेक्षा. पण त्याला काय माहीत की

पक्ष्याचा हा 'डायव्हर्शन डिसप्ले' चांगला परिचित असलेली माणसे, त्याला पहायला इथे आली आहेत; त्याचे शिरकाण करण्यासाठी नाही तर त्याचे कौतुक करण्यासाठी, त्याला डोळे भरून पाहण्यासाठी आज माणसाची धावपळ चालली आहे !

त्याचा हा डायव्हर्शन डिसप्ले' चालू असताना मी त्याचे छायाचित्र टिपले आणि दुसऱ्या पक्ष्याकडे वळलो. ही कदाचित मादी असावी आणि तिच्या आसपास तिचे पिलू घुटमळत असावे, असा माझा अंदाज.

जमिनीला समांतर मान धरून ती मादी अजूनही सावकाश दक्षिणेकडे चालत होती. पण पिलू मात्र मला कुठे दिसले नाही. मी आता तिच्या आणखी जवळ पोहोचलो होतो आणि छायाचित्रे घेण्यास सुरुवात केली होती. तिची काळी मान, डोळ्याजवळचा पांढरा भाग मला स्पष्ट दिसत होता.

पूर्वेकडे गेलेला पक्षी आता आणखी लांब उडून गेला आणि दूर अंतरावरून त्याने साद घातली. त्याबरोबर दुसरा पक्षी उडाला आणि पूर्वेकडे गेला. त्यानंतर त्यांनी सतत साद घालणे सुरू ठेवले. दोन्ही पक्षी आता जलद जात होते. लवकरच ते आम्हाला मागे टाकून आमच्या तळाच्या दिशेने लांब गेले, आता त्यांचे पिलू त्यांच्याजवळ नव्हते हे उघड होते. दुरून त्यांची साद आमच्या कानावर येतच राहिली. आमच्यापासून ते आता दीड-दोन मैल अंतरावर असावेत

आता काय करायचे, असा प्रश्न आमच्यापुढे उभा राहिला. अभावितपणे माता-पित्याची आणि अपत्याची ताटातूट करण्यास आम्ही कारणीभूत झालो होतो त्या विस्तीर्ण दलदलीत ते पिलू घाबरेघुबरे होऊन आपल्या आई-बापांना शोधीत असणार, त्याचे छत्र त्याच्या डोक्यावर नाही, म्हणजे कावळे किंवा ससाणे त्याचा बळी घेणार, आणखी एका क्रौंचाच्या हत्येला आम्ही कारण ठरणार.

माझ्या मनात हे विचार एकापाठोपाठ येऊन गेले आणि क्रौंचांच्या मागे जाण्याचा विचार मी सोडून दिला. बाकीचेही लोक आता मागे फिरले. क्रौंचाना घाबरविल्याबद्दल हुसेनने मला दोष दिला. शेवटी जरा लांब जाऊन पुढे काय होते, हे पहायचे आम्ही ठरविले.

क्रौंचाची जोडी अजूनही पूर्वेकडे घुटमळत होती, उच्च स्वराने ओरडत होती. डॉ. विजयन अजूनही पाणथळीच्या मध्यभागी होता, पण हळूहळू आमच्या दिशेने येत होता. विजयन आणखी थोडा पुढे येताच पूर्वेकडे घुटमळणारे ते दोन्ही

पक्षी उडाले आणि ओरडतच पुन्हा पाणथळीच्या मध्यभागी आले. आम्ही त्यांच्या हालचाली बारकाईने निरखीत होतो. विजयन त्यांच्या पासून फार दूर नव्हता, अजूनही ते साद घालीतच होते. विजयन पुन्हा चालू लागलेला आम्ही पाहिला आणि त्याक्षणी एक नारिंगी गोळा तीरासारखा धावत सुटलेला मी दुर्बिणीतून पाहिला. तो क्रौंचाच्या जवळ जाऊन थांबला. एका पक्ष्याने मान खाली केलेली मला दिसली. दुसऱ्या पक्ष्याने मान सरळ आकाशाकडे करून पुन्हा साद घुमविली आणि ते क्रौंच कुटुंब सावकाश माना डोलवीत दक्षिणेकडे निघाले.

आमची काळजी मिटली होती. ते सारे कुटुंब एकत्र आले होते, पिलू मृत्यूच्या छायेतून बाहेर पडले होते.

आम्ही फार जवळ येतोय असे दिसताच क्रौंचानी त्यांच्या पिलाला पाणथळीत कुठेतरी सुरक्षित दडविले होते. ते कुठे दडले होते हे आम्हाला दिसले नव्हते. ते पिलू दलदलीत वाट चुकणार अशी आम्हाला भीती वाटत असली तरी क्रौंचांनी ते ठिकाण नेमके लक्षात ठेवले होते का? ते ओरडून त्याला संकटाची कल्पना देत होते, का आपण जवळपास आहोत, असा दिलासा देत होते? आमचे शुक्लकाष्ठ दूर होताच ते दोघे नेमक्या जागी परत आले हे निश्चित, आणि पिलालाही त्यांच्या जवळ जाण्यात अडचण आली नाही.

डॉ विजयन आम्हाला येऊन मिळाला तो नाचतच. तो परत येत असताना, आपली लपण्याची जागा सोडून पळत चाललेले ते पिलू अचानक त्याला आडवे आले आणि त्याला पाहताच जागच्या जागी खिळले. डॉ. विजयनने तात्काळ त्याची छायाचित्रे घेतली. तो दूर जाताच पिलू पुन्हा पळाले आणि आई-बापाना जाऊन मिळालेले आम्ही पाहिले.

□

## तेरा

# पुगा

चौदा जुलै

रस्त्याच्या कडेचे किलोमीटरचे दगड पाहून बरे वाटले हे कबूल करायलाच हवे. टांगत्से सोडल्यापासून आम्ही तथाकथित सुधारलेल्या जगापासून दूरच होतो. तिथे रस्ते नव्हते, होत्या फक्त वाहनांनी पाडलेल्या चाकोऱ्या. तिथे घरे नव्हती, होते फक्त तंबू किंवा जेरी कॅनचा उपयोग करून बांधलेल्या बराकी, तिथे हाडा-मासाची माणसे होती, पण त्यांच्या अंगावर गणवेश होता, आणि ती हुकुमाप्रमाणे हालचाली करीत होती. तिथे ओढ लावणारा निसर्ग होता, विस्तारणारी क्षितिजे होती, पण धोक्याच्या लाल दिव्याची किरणे मध्येच आत शिरू पहात होती.

या सर्वांची अपूर्वाई गेले पंधरा दिवस आम्ही अनुभवित होतो, आणि आता अशा प्रदेशात येते होतो की जिथे रस्त्याच्या कडेला किलो मीटरचे दगड होते, रहायला बांधकाम खात्याचे, दगड-विटांनी बांधलेले विश्रामगृह होते, गप्पा मारायला अधिकारीच होते, पण ते होते तुमच्या-आमच्या वेषातले, नमस्कार करून स्वागत करणारे, काम संपवून संध्याकाळी मुलाबाळांकडे परत जाणारे. थोडक्यात म्हणजे न्योमाला आम्ही आज मुलकी प्रदेशात परत आलो होतो.

कालचा दिवस आम्ही हान्लेलाच काढला. हान्ले गोम्पाच्या समोरील पाणथळ जागा पालथी घातली, क्रौंच काही या बाजूला नव्हते. पिवळ्या डोक्याचे धोबी, लहान बोटाचे चंडोल (शॉर्ट टोड लार्क) आणि लांबड्या चोचीचे चषक दिसले. एका चंडोलाच्या घरट्यात एकच अंडे होते—पांढरे आणि त्यावर फिकट

शेंदरी ठिपके असलेले. मोठ्या आकाराच्या कॅलाड्रा चंडोलाचे मी छायाचित्र घेतले. हा पक्षी काही हिवाळ्यात दक्षिणेत येत नाही. मी त्याला इथे प्रथमच पहात होतो. लहान बोटाचा चंडोल मात्र महाराष्ट्रातही पहायला मिळतो. मोठ्या चंडोलाचा आकार आणि रंग काहीसा होल्यासारखा होता आणि त्याच्या गळ्याभोवती तपकिरी रंगाचे कडे होते. तोही या पाणथळीतच घरटे करीत असणार.

गोम्पाजवळ एक ब्राह्मणी मैना पाहिल्याची बातमी सलीम अलींनी दिली. आता हा खास दक्षिणी, शहरी पक्षी लडाखच्या अंतर्भागात का कडमडला हे कोडेच आहे. कदाचित् कोणीतरी पाळण्याच्या उद्देशाने त्याला पिंजऱ्यातून इकडे आणला असावा आणि तो पिंजऱ्यातून पळाला असावा. बिचाऱ्याचा इथल्या तीव्र हिवाळ्यात कसा टिकाव लागणार कोण जाणे!

डॉ. डोग्राच्या ' ट्रीटमेंट ' मधून आमची वाहने सहीसलामत वाचली याचे श्रेय आमच्या कुशल वाहनचालकाना आणि यंत्रविशारदांना द्यायला हवे मेजर प्रभाकर यानी रातोरात सर्व साधनसामग्री जमवून दिली, म्हणूनच आज आम्ही हान्ले नदीकाठच्या सुंदर प्रदेशातून, निळ्या पाण्याचे आणि गुलाबी तुऱ्यांनी लहडलेल्या टॅमॅरिस्कच्या आणि पिवळ्या फुलानी बहरलेल्या टाकळ्या-सारख्या फुलांचे सौंदर्य निरखीत, निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर पसरलेल्या रंगीबेरंगी पर्वतांबद्दल विस्मय व्यक्त करीत, लोमाला येऊ शकलो.

लोमाला आल्यावर मात्र वाहनानी असहकार पुकारला त्यामुळे लोमाच्या तळापासून सिंधू नदीपर्यंत काही किलोमीटरचे अंतर आम्हाला चालत जावे लागले. दुपारच्या कडक उन्हात, जेवण झाल्याबरोबर चालायचे म्हणजे नको वाटत होते. पण सलीम अलींनी वाहनातून उतरल्याबरोबर जे झपाझप चालायला सुरुवात केली, ते पाहून कटाळा पळाला. आता झपाझप चालण्यात ऐंशी वर्षांच्या वृद्धाची बरोबरी मी करू शकलो, म्हणून स्वतःची पाठ थोपटून मी घ्यायला नको होती हे खरे आहे. पण हुसेन, विश्वास वगैरे कष्टत इतके सावकाश येत होते, की स्वतःचे कौतुक करण्याचा मोह मला आवरला नाही.

लोमाजवळ हान्ले नदी सिंधूला मिळते. इथे एका होडीत बसून आम्ही नदी ओलांडली. पाणी साधारणपणे छातीइतकेच खोल होते मेजर प्रभाकर याचा ऑर्डर्ली हबीबुल्ला याने होडी ढकलत, ओढत पलीकडे नेली. पोहून जावे असे एकदा वाटले, पण सलीम अलींना विचारण्याचा धीर झाला नाही. पाण्यात



सिंधू नदी ओलांडताना

उतरल्यावर थंडी किती वाजेल याचाही अंदाज येईना.

वाहनांना पोहता येत नव्हते आणि होडीत बसविता येणेही शक्य नव्हते. तेव्हा ती बिचारी डुगटीला परत गेली आणि तिथे सिंधू ओलांडून आमच्यापर्यंत आली

सिंधू नदीच्या काठाने जात सायंकाळी न्योमाला येऊन पोहोचलो. इथे सिंधू नदी एका रुंद मैदानातून वाहते आणि तिच्या दोन्ही काठांवर दोन-तीन किलोमीटर रुंदीच्या हिरवळी – पाणथळी आहेत. मेंढ्या चारण्यास योग्य अशा. हिरवळी संपल्या की मात्र कपच्या आणि वाळूच्या शिगा यांचे राज्य सुरू होते. रस्त्याकडेच्या वाळूच्या टेकड्या पाहून मला सहाराच्या चित्रांची आठवण झाली. मी त्यांची छायाचित्रेही घेतली. वाळवट इतके भकास की तमा—कॅरगानाही—दिसले नाही

न्योमाच्या अलिकडे काही अंतरावर रस्त्याची स्थिती सुधारते. किलो मीटर्सचे दगड उगवतात आणि शांतपणे वाहणाऱ्या सिंधूचे अथांग पात्र पाहात आपण न्योमाकडे वळतो.

न्योमा इथे विश्रामगृहात उतरल्यावर येथील डेप्युटी कमिशनर आणि इतर अधिकारी भेटावयास आले. इतका लाजाळू, संकोची डेप्युटी कमिशनर मी अजून पाहिला नव्हता. हस्तांदोलन न करता नमस्कार करणारा अधिकारीही बरेच दिवसांनी भेटला. नमस्कार करताना बरे वाटले.

मेंढपाळीचा धंदा इथे उत्तम चालेल असे वाटले होतेच, आणि डॉ. दिन या तरतरीत, काश्मिरी रंगाच्या तरुण अधिकाऱ्याची ओळख झाल्यावर तो अंदाज खरा ठरला. पश्मीना मेंढ्यांची खास पैदास करण्याचे प्रयत्न इथे चालू आहेत आणि डॉ. दिन रशिया आणि मंगोलियातून त्याचे प्रशिक्षण घेऊन नुकतेच

परतले आहेत. माणूस रसिक दिसला. न्योमा म्हणजे स्त्रीचे स्तन, त्याने अर्थ सांगितला, आणि त्या आकाराच्या दोन टेकड्याही गावाच्या पार्श्वभूमीला दाखविल्या. इथला राजवाडा ही लेहच्या राजवाड्याची छोटी प्रतिकृती आहे. सायंकाळी त्यावर सूर्याची किरणे पडली की पाहणाऱ्याला तो पऱ्यांच्या राज्यात घेऊन जातो आणि त्या उंच भिंतीआड दडलेल्या दुष्ट जादूगाराचे चित्र कल्पनेत उभे करतो. जुन्या काळात म्हणे इथे राजकीय कैद्यांना बंदिस्त करीत असत.

गावाच्या मध्यावरून खळाळणाऱ्या ओढ्याकाठी जेवणापूर्वी फेरफटका मारला आणि मोठा रोझफिंच, शिंगवाला चंडोल, माऊंटन फिंच वगैरे ओळखीची मंडळी भेटली

पधरा जुलै

पुगाच्या डॉ. रेड्डींबद्दल बरेच ऐकले होते त्यांचे आदरातिथ्य, त्यांची सहृदयता, त्यांची रसिकता वगैरे. माणूस उंचापुरा, शिडशिडीत बांध्याचा आणि दिलखुलास हसणारा. पुगा येथील तंबूच्या शहराचा स्वामी आहे हा गृहस्थ

पुगा येथे जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचा मोठा तळ आहे. दोन डोंगराच्या रांगामधल्या प्रशस्त हिरवळीत, पाणथळीच्या एका कडेला इथे काम करणाऱ्या भूशास्त्रवेत्त्यांची पालं ठोकलेली आहेत. डॉ. रेड्डी या तळावरचे प्रमुख अधिकारी आहेत. पुगाच्या जमिनीखाली खूप तप्त वाफ आहे, उष्ण पाण्याचे झरे आहेत, जमिनीला पाडलेल्या भोकातून उष्ण पाण्याची आणि वाफेची कारंजी आकाशात उंच उसळत आहेत. जमिनीवर बोरॅक्स या क्षाराचे थर आहेत आणि बाजूच्या डोंगरात गंधकाचे साठे दडलेले आहेत. या सर्व निसर्ग-संपत्तीचा ठाव घेण्यासाठी आणि तिचा सदुपयोग कसा करता येईल हे अजमविण्यासाठी भूशास्त्रवेत्त्यांचे स्थलांतर गेली काही वर्षे इथे नियमित चालू आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीस हे ' स्थलांतरित ' पक्ष्यांसारखेच न चुकता इथे येऊन दाखल होतात—एकटेच नाही तर बरोबर ड्रिलिंगची अवजड यंत्रसामग्री घेऊन; आणि हिवाळ्याची चाहूल वातावरणात जाणवू लागली की दक्षिणेकडे पसार होतात

इतरांना हेवा वाटावा असे आहे हे तंबूचे शहर. श्रीनगरहून इथे सर्व प्रकारची साधनसामग्री आयात होते आणि जनरेटरवर इथे वीजही निर्माण केली

जाते. या विजेचा उपयोग दुहेरी होत असावा. रात्री प्रकाश देणं हे दुय्यम काम तर ती करतेच, पण सायकाळी कामावरून लोक परतले की दिव्यांच्या आधीही इथला ग्रामोफोन सुरू होतो आणि कर्ण्यावरून सिने-संगीत आणि भजने सारी सायकाळ सर्वांना ऐकायला मिळतात. आता रात्री हे मी माझ्या तबूत लिहीत बसलो आहे, कारण नुकतेच हे कर्णा-संगीत बद झाले आहे. लोकांनी रात्री झोप घ्यावी म्हणून ही सोय असावी!

बाकी इथले तंबू भलतेच प्रशस्त आहेत. दोन माणसे सुखाने ससार करतील असा एकेक तबू आहे. आत पार्टिशन घालून खोल्याही पाडलेल्या आहेत आणि खाटाही टाकलेल्या आहेत. मात्र संसार करायला इथे परवानगी नाही. तबूचे शहर बाप्याचे आहे. बायांना इथे प्रवेश नाही.

अशा या पुगाला आज दुपारी एक वाजता आम्ही येऊन दाखल झालो. सकाळी १० वाजता डॉ. दिन याच्याकडील चमचमीत न्याहरी झोडून आम्ही न्योमा सोडले आणि सिंधूच्या काठाने, जाभळ्या आणि हिरव्या डोंगरांमधल्या दरीतून माहेला आलो. नदी ओलाडताच जवानानी आम्हाला चहा पाजण्याचा घाट घातला आणि चहा होईपर्यंत आमच्या आसपास वावरणारा मोठा रोझफिंच आणि नदीच्या पात्रावर भिरभिरणारे ‘ हाऊस मार्टिन ’ पक्षी पाहात आम्ही वेळ काढला

आता आम्ही सिंधू नदीचा निरोप घेतला आणि पश्चिमेकडे पुगा नाल्याच्या काठाने भाजक्या मातीच्या, तडकलेल्या दगडाच्या डोंगरामधून वळणे घेऊ लागलो. खडकांना धडका देत उसळणारे पुगा नाल्याचे पाणी पाहून मला पाढऱ्या छातीच्या डिपर पक्ष्याची आठवण झाली. पण प्रदेश त्याच्या पसतीचा असूनही वेटा दिसला नाही. मात्र मधूनच दिसायचा एखादा तपकिरी डोक्याचा पाढरा शुभ्र गल पक्षी. जणू पाऊल बुडेल इतक्या पाण्यात उभे राहून ऋषीच तप करतोय. प्रवाहाच्या दोन्ही बाजूला टॅमरिस्कच्या झुडपाचे रान गच्च माजले होते. गुलाबी तुऱ्यानी बहरलेल्या या झुडपातून वाऱ्याची लाट सरसरत गेली की वाटायचे कोणी आदिवासीच डोक्यावर फुलाचे गुच्छ बांधून नृत्यात रगले आहेत.

पुढे एका ठिकाणी आमच्या जोंगा नाल्याच्या पात्रात घुसल्या आणि नाला ओलाडून पलिकडची एक बारकी टेकडी चढल्या. दुरूनच आम्हाला वाफेचे दोन प्रचड झोत आकाशात उसळताना दिसले. एकाजवळ ड्रिलिंग मशिनचा

एक उच्च मनोरा उभा होता आणि त्यावर लोक काम करीत होते. त्या विस्तीर्ण मैदानातून एक प्रवाह वेडावाकडा पसरला होता आणि त्याच्या दोन्ही तीरावर क्षाराचे थर साचले होते. मधूनच एखादे चक्रवाक बदक इकडून तिकडे उडताना दिसत होते. आमच्या जोंगा त्या उष्ण फवाऱ्यापासून सुरक्षित अंतर ठेवून थांबल्या. पण फिरत्या वाऱ्याबरोबर आमच्यावर तुषाराची फुंकर घालून इथे आमचे स्वागत करण्यात आले. फवाऱ्याच्या प्रचंड गर्गशाने आणि आसमंतात पसरलेल्या वाफेने इथले वातावरण कोंदून गेले होते.

नंतर थोड्याच वेळात डॉ. रेड्डींनी आमचा ताबा घेतला आणि आमची रवानगी इथून मैलावर असलेल्या तंबूच्या शहरात झाली.

डॉ. रेड्डी हा माणूस आपल्याला एकदम पटला. इथे आल्याबरोबर चहा आणि सरबते यांचा मारा. पाठोपाठ भाताचा घमघमाट आणि 'करी'चा खरपूस सुवास. रहायला प्रशस्त तंबू. आत विजेचे दिवे – फक्त रात्री प्रकाशणारे. तळ पडला म्हणजे औरंगजेबाच्या मोगल सरदारांनाही एवढा ऐषाराम मिळत नसेल !

दुपारी मेजर प्रभाकर यांनी एक बैठक घेतली आणि डॉ. रेड्डींच्या सल्ल्याने पुढचा कार्यक्रम ठरविला. पुगाला आम्ही आलो होतो त्सो कार आणि त्सो मोरिरी या सरोवरांच्या काठावरील पक्ष्यांचे निरीक्षण करण्यासाठी. या दोन्ही ठिकाणासाठी चार-चार दिवस, मग परत लेह. तेथून कारगिल येथे सुरू खोऱ्यात दोन दिवस आणि मग ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात श्रीनगर. आठ ऑगस्टला श्रीनगरहून पुढील प्रवासाची व्यवस्था करण्याचे ठरले. त्याप्रमाणे संदेश रवाना झाले आणि आम्ही घरी पत्रेही लिहून ठेवली.

उद्या देशपांडे लेहला परत जातो आहे. तो आमची पत्रे घेऊनच जाईल.

□

चौदा

# त्सो कार

**सोळा जुलै**

आज बरेच काही पाहिले, अनुभविले. सगळे लिहून होईपर्यंत वीज बंद होण्याची वेळ होते की काय अशी भीती पडली आहे.

त्सो कारला जायचे म्हणजे पोलोकोंका ला ही १६,००० फूट (५,२०० मीटर) उंचीवरील खिंड ओलांडावी लागते. खिंडीपर्यंत पोहोचण्यासाठी आधी एखादी पायवाट असावी. रेड्डींच्या माणसानी वाटेतले खडक बाजूला करून, वळणे मोठी करून या पायवाटेचा जीप जाईल असा रस्ता करून ठेवला आहे. भूशास्त्रज्ञाला स्थापत्यशास्त्रही आले पाहिजे, असा इथला अलिखित नियम असावा. डॉ. रेड्डींसारखा सव्यसाची या कसोटीला उतरला नसता तरच नवल.

वाळू, दगडाच्या कपच्या, खाचखळगे आणि लहान-मोठे पत्तर यावरून कुशलतेने जीप हाकणाऱ्या रेड्डींच्या मागे आमच्या जोंगा खिंडीपर्यंतचा घाट चढल्या. घाट तसा खडकाळ, रुक्ष आणि शुष्क, पण मध्येच गर्द जांभळ्या फुलानी बहरलेला अस्ट्रॅगॅलसचा ताटवा दिसायचा. या चिमुकल्या झुडपाला फुलण्याइतपत ओलावा तरी इथे कोठून आला? कदाचित कुठे खडकातील भेगेत हिमाचा एखादा ठिपका पडला असेल. पण ओलाव्याचे मऊ पीस इथे खडकाआड दडलेले होते हे नक्की. कारण जसजशी खिंड जवळ येऊ लागली, तशी अस्ट्रॅगॅलसच्या फुलाची दाटी वाढत गेली.

खिंडीचा माथा बराच प्रशस्त होता. आजूबाजूच्या डोंगरावरील बर्फ वितळून सोळा हजार फुटावरील या 'अल्पाईन मेडो'त कुठे कुठे हिरवळीचे

पट्टे उगवले होते. या खिंडीतून दोन्ही बाजूला पाण्याचे प्रवाह जातात. यापैकी त्सो कारकडे वाहणारा प्रवाह बराचसा कोरडाच होता. दुसरा थेट आमच्या तंबू-जवळून वहात पुढे पुगा नाल्याला मिळाला होता. सकाळी आणि संध्याकाळी या नाल्याला पूर यायचा आणि दुपारी पाण्याची पातळी खूप खाली जायची.

खिंडीत तपकिरी पक्ष्याचा एक थवा भिरभिरत होता. सलीम अलींच्या सागण्यावरून त्यातला एक पक्षी हुसेनने मारला. त्याच्या पाठीवरची गुलाबी पिसे पाहून तो 'हिमालयन माउंटन फिंच' असल्याची ओळख पटली. चांग ला खिंडीच्या उतारावर हेच पक्षी आम्हाला भेटले होते.

खिंडीच्या माथ्यावरून पलिकडचे विस्तीर्ण खारे मैदान दिसत होते. हेच म्हणे त्सो कार. त्सो म्हणजे सरोवर. या क्षार समुद्रात कुठे तरी ते लपले होते. "त्सो कार या सरोवराचा हळूहळू लोप होत चालला आहे," डॉ. रेड्डींनी माहिती दिली. सरोवराला मिळणारे गोड्या पाण्याचे प्रवाह जेवढे पाणी सरोवरात आणून ओततात त्यापेक्षा किती तरी जास्त पाण्याचे बाष्पीभवन होते. सरोवर आटत चालले आहे ही गोष्ट १९२० ते ३० या काळात इथे येऊन गेलेल्या ओस-मॅस्टन आणि मायनर्टझहॅगन या साहेबाच्याही लक्षात आली होती. गेल्या ५० वर्षांत सरोवर आणखी किती तरी आटले असणार.

या क्षारसमुद्रात पक्ष्याचा कुठे मागमूसही दिसत नव्हता, आणि रेड्डींनी म्हणे इथे शेकडो पक्षी पाहिले होते. चार दिवस इथे आम्ही करणार काय, असा प्रश्न पडला मला.

खिंडीचा उतार उतरून आमच्या जोंगा लांबलचक पसरलेल्या एका वाळूच्या उचवट्यावरून धावू लागल्या. दोन-तीन मैल लांबीचे हे वाळूचे दाडे मैदानात जिथे तिथे घुसले होते. ते उतरून गेल्याशिवाय आम्ही सरोवराच्या काठी पोचलो नसतो.

वाळूचा दाडा उतरत असतानाच वायव्येकडील एका कोपऱ्यात माझे लक्ष गेले. पक्ष्याचे लहान-मोठे थवे उडत होते, खाली येत होते, पुन्हा हवेत उसळत होते, मध्येच त्या असीम अवकाशात अदृश्य होत होते. दूरवर हिरवळीचा एक पट्टा पसरला होता आणि त्यापलिकडे निळे पाणी चमकत होते.

पाण्याच्या दिशेने धावणाऱ्या आमच्या जोंगा वाळूच्या टेकड्या उतरून हिरवळीच्या पट्ट्याजवळ थांबल्या. चुशुलला, हान्लेला पाहिली तशीच ही हिरवळ होती, पाणथळ जागा होती. पण आता हिरवळीतील खोलगट भागात साचलेले

पाणी आटून गेले होते आणि क्षार उघडे पडले होते, आणि या हिरवळीला पार्श्वभूमी होती एका अथांग सरोवराची. "या सरोवराचं नाव स्टारत्सापुक त्सो," रेड्डी म्हणाले. "या गोड्या पाण्याच्या सरोवरातील पाणी त्सो कारकडे वाहात जाते आणि शेवटी त्या क्षारसमुद्रात गडप होते." रेड्डी सांगत होते, आमचे कान ऐकत होते, पण डोळे न्याहाळत होते सरोवराचा पृष्ठभाग, काहीशा अधाशीपणे पक्ष्यांच्या झुंडी लडाखमध्ये आम्ही प्रथमच पहात होतो.

जोंगातून उतरून आम्ही सरोवराच्या दिशेने निघालो. सपाट हिरवळीचा भाग फारसा रुंद नव्हताच. तो ओलांडल्याबरोबर लागली पाणथळ — आतापर्यंत ओळखीची झालेली. गवत उगवलेले उंचवटे आणि त्यामधून पाणी ओसरून गेल्याने पांढरे क्षार उघडे पडलेले खळगे. या उंचवट्यावरून त्या उंचवट्यावर उड्या मारताना पावलागणिक आम्ही शॉर्ट टोड लार्कना — आखूड पायाच्या चंडोलांना — उडविले. त्याची घरटी याच पाणथळीत असणार. हान्लेला अशाच जागी मला त्याचे घरटे सापडले होते. पण इथे ते पक्षी अक्षरशः शेकड्यांनी होते.

आम्ही पुढे जात असतानाच नैर्ऋत्येकडून सहा राजहंसांचा थवा उडाला आणि झाप् झाप् करीत सरोवराकडे पळाला. नैर्ऋत्येच्या बाजूने वाळूचा एक दांडा सरोवरात जवळजवळ किलोमीटरपर्यंत घुसला होता. या दांड्याजवळ काही चक्रवाक आणि काही राजहंस उभे होते आणि त्यांच्या पुढ्यात सुमारे तीन-चारशे गल (तपकिरी डोक्याचे) पक्ष्यांचा सेनासागर हेलकावत होता. त्यांच्या रोखानेच आम्ही पुढे येत असलेले पाहून त्यांच्यात चलबिचल चालू झाली होती, ते करीत असलेली कलकल दुरूनही ऐकू येत होती.

उत्तरेकडे सहा तुरेवाल्या दाबचिक (ग्रेट क्रेस्टेड ग्रीब) पक्ष्यांचा थवा आपली पिलावळ घेऊन लगालगा सरोवराच्या मध्यभागी पळाला. सरोवराचे पाणी फार खोल नसावे, कारण काठापासून मैलभर अंतरावरही गाळाच्या उंचवट्यांनी पाण्याबाहेर डोकी काढलेली होती. त्यावर तुरेवाल्या दाबचिक पक्ष्यांनी घरटी केली होती आणि दोन दाबचिक अंडी उबवीत बसले होते. त्यांच्या आसपास आणखीही काही घरटी होती, पण ती रिकामी होती. आपल्याकडील नद्यांवर व तळ्यात आढळणाऱ्या दाबचिक पक्ष्यापेक्षा हा दाबचिक आकाराने मोठा आहे. रंग मात्र काळपट तपकिरीच. युरोप, आशिया आणि अमेरिका खंडातही हे दाबचिक आढळतात.

सरोवरात इतस्तत. शभर-सव्वाशे चक्रवाक बदके विखुरली होती; त्याच्या समवेत त्याची बाळेही होती.

पाणथळीतून चालत आम्ही सरोवराच्या काठाशी आलो मात्र, डासाच्या झुडींनी एकदम आमच्यावर हल्ला चढविला. आमच्या सर्वांगावर, कपड्यांवर ते बसले आणि प्रत्येकाचे कोट आणि विजारी याच्यातला धागा न् धागा जिवत भासू लागला हातातल्या दुर्बिणी आणि कॅमेरे साभाळीत प्रत्येकजण जमेल तसे नृत्य करून डासांना उडवून लावण्याचा प्रयत्न करीत होता. डॉ. विश्वास याचे मात्र डासावर प्रथमदर्शनीच प्रेम बसलेले दिसले. आपल्या रोखाने येणारा प्रत्येक डास आत्मसात करायचाच या ईर्षेने ते आपल्या हातातले, फुलपांखरे पकडावयाचे जाळे साऱ्या दिशातून फिरवीत होते. त्यामुळे त्यानी भारतीय आणि पाश्चात्य नृत्य-पद्धतीतील निरनिराळ्या हावभावाचे दर्शन आम्हाला अभावितपणे घडविले. सुमारे खडीभर डास गोळा केल्यावरच त्यांचे समाधान झाले.

या कीटकाना मी डास म्हटले खरे, पण ते शहरातून आढळतात तसले डास नव्हते. पखवाल्या मुग्यासारखे रूप आणि आकार होता त्याचा. (सॅन्ड-फ्लाय) रग काळा होता. ते चावत जरी नव्हते, तरी नाका-तोंडात शिरण्याची त्याना मोठी हौस असावी असे दिसले. श्वास आणि तोंड दोन्ही बद करून त्याना हाकलण्यातच खरे कौशल्य होते. आम्ही सरोवराच्या काठाजवळ आलो तरच त्याचे बिनसत असावे, आणि मोठ्या जमावाने ते हल्ला करावयास उद्युक्त होत होते. आम्ही काठापासून दूर गेलो की मग त्यांची काही तक्रार नव्हती.

उत्तर ध्रुवीय टड्रा प्रदेशात उन्हाळ्यात कीटकाची अमाप उत्पती होते आणि पक्ष्याच्या बालकाना खाद्याचा तुटवडा पडत नाही, असे आतापर्यंत वाचत होतो. त्या टड्रासारख्या प्रदेशातच आता आम्ही वावरत होतो. ध्रुवीय प्रदेशात समुद्रसपाटीवर जसे हवामान अनुभविण्यास मिळेल तसलेच हवामान इथे पधरा हजार फूट उचीवर अनुभविण्यास मिळत होते. जगातील निरनिराळ्या प्रकारचे हवामान हिमालयाच्या परिसरात आढळते त्याचा हा आणखी एक पुरावा.

आम्ही सरोवराच्या काठाजवळ आलेले पाहताच गल पक्ष्याच्या समूहातून दोन पक्षी उठले आणि कलकलाट करीत आमच्या डोक्यावर फेऱ्या मारू लागले. आमच्यावर हल्ला करण्याचा त्याना धीर होत नसावा. डासाच्या झुडींना पळवून लावण्यातील आमचे कौशल्य त्यानी नुकतेच पाहिले होते. मला वाटले, आमच्या हालचाली टिपण्यासाठी आणि आमच्यापासून धोका असेल तर आपल्या बांधवांना

वेळीच जागृत करण्यासाठी हे दोन टेहळे तर आमच्यावर सोडण्यात आले नसतील ? गल पक्ष्याच्या समुदायात त्यांची कितीतरी पिले दिसत होती. त्यांच्या संरक्षणासाठी सारे पक्षी सज्ज झाले होते.

आम्हा निरुपद्रवी मानवांपासून गल पक्ष्याना धोका नव्हता, हे दुर्दैवाने त्याना कळत नव्हते, पण गल पक्ष्यापासून आपल्याला धोका आहे हे आमच्या पलिकडील बांधावर बसलेल्या टर्नच्या जोडीने तेव्हाच ओळखले आणि श्रीयुत आणि सौ. टर्न त्या टेहळ्या गल पक्ष्यावर तुटून पडल्या. आकाशातील हे पक्षी-युद्ध टिपण्यासाठी सलीम अलींचा कॅमेरा निरनिराळे कोन साधू लागला.

टर्न पति-पत्नींची अर्भके जवळ्यासच असावीत अशा समजूतीने आम्ही खूप-शोध घेतला, पण कोणाचेच घरटे शिल्लक राहिलेले दिसत नव्हते. दोन महिन्यांपूर्वी इथे केवढी गर्दी-गडबड असेल प्रत्येकजण घरटे बांधण्याच्या, दुरुस्त करण्याच्या, अंडी उबविण्याच्या, त्याचे गल आणि गरूड यांच्यापासून सरक्षण करण्याच्या गडबडीत असेल. त्यावेळी कदाचित हे तळे इथे जाग्यावरच नसेल. असेल एक पाणथळ जागा — गवताच्या लांब दांड्यानी भरून गेलेली. आता हे गवत सुकून गेले होते आणि त्याचे ढीग सरोवराच्या लाटानी ढकलत आणून काठावर रचले होते. उन्हाळा सुरू झाला, पर्वताच्या माथ्यावरचे बर्फ वितळले, तेव्हा कुठे दलदलीचे सरोवर तयार झाले. एव्हाना पक्ष्यांची घरट्याची गरज संपली होती, पिले अंड्याबाहेर पडली होती. ज्या गवताने त्याना आजवर संरक्षण दिले, त्याचे कार्य संपले होते. आता सरोवराचे अथांग पात्र पक्षी-बाल-काना सांभाळण्यास समर्थ होते. अजूनही जिथे दलदल होती, पाणी उथळ होते तिथे जलचर आणि कीटक यांचे खाद्य पक्ष्यासाठी प्रत्यही तयार केले जात होते. निसर्गाची केवढी उत्पादनशाळा होती इथे.*

मला वाटलेच होते, हे पुराण आता आवरते घ्यावे लागणार. दिवे बारीक झाले. आता दहाच मिनिटात ते जातील. आता पुढची गोष्ट उद्या !

□

* १९७८च्या मे महिन्यात या सरोवराला मी पुन्हा भेट दिली. हिवाळ्यात गोठून गेलेले या तळ्याचे पाणी त्यावेळी नुकते वितळले होते. त्यावर गवताचे लहान-मोठे भारे तरगत होते. सरोवरात उगवणाऱ्या पानवनस्पती शुष्क होऊनच त्याचे हे भारे तयार झाले होते. या तरत्या बेटावर घरटी बांधण्यासाठी गल आणि इतर पक्षी जमा झालेले होते

क्र. 22505
शाखा

सतरा जुलै

पंधरा

# चक्रवाक

आज सकाळपासून सांगण्यासारखे फार काही असे घडलेच नाही. माझ्या दृष्टीने महत्त्वाची अशी एकच गोष्ट घडली. पण ती सांगण्यापूर्वी कालची कथा संपविली पाहिजे.

तळ्याकाठच्या चिखलात तुरतुरणारे दोन सॅन्डप्लोव्हर, इतस्ततः पांगलेले काही रेडशँक आणि आपली पांढरी पोटे आणि पंखांच्या खालचा पांढरा भाग मधूनच उन्हात लककन् तळपविणारा लिटल स्टिंट पक्ष्याचा थवा पाहात आम्ही 'स्टारत्सापुक त्सो' या सरोवराकाठी काही वेळ काढला. सलीम अलींनी काठावरच्या पिवळ्या गर्द फुलाच्या गुच्छाचे आणि माउटन फिंचच्या थव्याचे छायाचित्रण केले आणि त्सो कार कडे आमचा मोर्चा वळला.

वाळूच्या समुद्रातून पुन्हा आमच्या जोंगा धावू लागल्या. डॉ. रेड्डी अजूनही आमचे कर्णधार होते, त्सो कारच्या खाजणाजवळ जिऑलॉजिकल सर्व्हेने आणखी एक 'मिनी' शहर उभे केले होते. त्यामुळे मुक्काम रेड्डींच्या परिचयाचा होता.

स्टारत्सापुक त्सो या सरोवराचे गोडे पाणी एका लहानशा नाल्यातून वाहात त्सो कारच्या विस्तीर्ण खाजणात गडप होते. वाटेत ही नाली आम्ही ओलांडली. वाळवंटातून प्रवास करताना जोंगात बसल्या-बसल्या करावी लागणारी उड्डाणे, त्यामुळे अंगात भरणाऱ्या सणका आणि रेतीचे स्नान याची आता सवय झाली होती. कॅमेरा आणि दुर्बीण यांचे रेतीपासून संरक्षण करता करता मात्र माझी त्रेधा उडत होती.

वाळवंटातून जवळपास वीस मैल अंतर आम्ही काटले असेल. केसांत, एव्हाना

वाढलेल्या दाढ्यात आणि पापणीतही रेतीचे थर जमा झाले तरी हा प्रवास त्रासाचा वाटला नाही. पश्चिम क्षितिजावर काळे ढग जमा झाले होते. मधूनमधून विजा चमकत होत्या, सोसाट्याचा वारा सुटत होता, सूर्य ढगाआड लपला होता वाळवंटातील दुपारची दाहकता शरीराला भासत नव्हती, तशीच डोळ्यानाही. जागोजागी जोंगा थांबवून मी बाहेर येत होतो. मोकळ्या हवेसाठी आणि ॲस्ट्रॅगॅलसचे सौंदर्य आकंठ पिण्यासाठी. आमचा प्रवास वाळवंटातून चालला आहे की ॲस्ट्रॅगॅलसच्या जांभळ्या मखमली गालिच्यावरून चालला आहे असा संभ्रम पडत होता. ॲस्ट्रॅगॅसलच्या ताटव्याचा हा गालिचा मैलोन्मैल पसरला होता, क्षितिजाजवळच्या पर्वतराजीला भिडला होता. जणू आकाशस्थ देवताना प्रसन्न करण्यासाठी प्रचंड आरास मांडली आहे असे वाटत होते. प्रसन्न ॲस्ट्रॅगॅलसच्या ताटव्याचा गोलाकार आणि शेजारी उगवलेली ताठ गवताची पाती पाहून असे वाटत होते की एका भव्य चौरंगाभोवती रांगोळी काढली आहे आणि शेजारी खोचलेल्या उदबत्त्यांचा सुगंध घमघमत आहे. जे अद्भुत दृश्य डोळ्यात मावत नव्हते; ते माझ्या कॅमेऱ्यात काय मावणार ?

ॲस्ट्रॅगॅलसचा गालिचा ओलांडून आमच्या जोंगा पुन्हा एक छोटासा उंचवटा चढल्या आणि तमाच्या (कॅरगानाच्या) झुडपामधून वाट काढीत जिऑलॉजिकल सर्व्हेच्या त्सो कार तळावर दाखल झाल्या. इथून जवळच त्सो कारचे पात्र दिसत होते. पांढऱ्या क्षाराच्या प्रचंड दरडींनी आणि त्यापलिकडे पसरलेल्या पांढऱ्या विस्तीर्ण मैदानाने ते सीमित केले गेले होते. आटत चाललेल्या त्सो कारचे पात्र ते हेच. या विशाल खाऱ्या मैदानात ते शोधावे लागत होते. स्टारपुक त्सोवर आढळणारी पक्ष्यांची गजबज आणि वर्दळ इथे नव्हती. क्वचित एखादे चक्रवाक बदक इकडून तिकडे जाताना दिसे. त्याच्या कंठातून निघणारा आर्त स्वर निर्जनतेची जाणीव अधिकच तीव्र करी.

दुपारी दोन वाजता इथे आम्ही पोहोचलो तर खाना तयार होता. डॉ. रेड्डींच्या योजकतेचे कौतुक करावे तितके थोडेच. या तळावर मोजकेच लोक राहात होते. अज्ञात प्रदेशात मुशाफिरी करणाऱ्या या संशोधकांचेही कौतुक वाटल्याशिवाय राहिले नाही. येथून तीस-चाळीस मैलाच्या प्रदेशात माणूस नव्हता. त्सो कारच्या जवळ एक बुद्ध गोम्पा आहे, असा उल्लेख पूर्वीच्या प्रवाश्यांनी केलेला आहे. पण त्याची माहिती या तळावर कोणाला नव्हती. गोडे पाणीही त्यांना बरेच दुरून आणावे लागत होते.

त्सो कारच्या या दुसऱ्या टोकाकडून पश्चिमेकडे एक खिंड उतरून गेले की उपशी गावाजवळ आपण लेहकडे जाणाऱ्या रस्त्याला मिळतो, असे इथे आम्हाला ऐकायला मिळाले.

तळावर एका तिबेटी रेंजरने मला छायाचित्र घेऊ दिले. बाकी इथे आणखी कोणी भेटेल अशी चिन्हे दिसत नव्हती. मृत्युपथाला लागलेल्या त्सो कारचा काहीशा विषण्ण मनानेच आम्ही निरोप घेतला.

रेतीचे ढीग अंगावर घेत पुन्हा ते वाळवंट ओलांडायचे म्हणजे नको वाटत होते. पण इलाज नव्हता. मी आणि हुसेन एकाच जोंगात होतो. विजयन् डॉ. डोग्रांच्या अँब्युलन्समध्ये होता. अँब्युलन्समधून धडधाकट शरीराने प्रवास करणे किती सुखावह असते हे आम्हाला पुनः पुन्हा ऐकवीत होता. असंख्य स्प्रिंगा बसविलेल्या आतल्या सिटा आणि चारही बाजूंनी बंदिस्त अशी बसावयाची जागा, त्यामुळे वाळवंटातून एवढा प्रवास करूनही तो नवजात अर्भकासारखा तुकतुकीत स्वच्छ राहिला होता.

स्टारत्सापुक त्सोजवळ आम्ही रेंगाळलो आणि डॉ. रेड्डी, डॉ. डोग्रा याच्या गाड्या भरधाव पुढे निघून गेल्या. स्टारत्सापुक त्सोच्या पक्षि-नगरीकडे डोळे भरून पाहून आम्ही पुन्हा मार्गस्थ झालो.

पुन्हा एकदा स्टारत्सापुक त्सोची हिरवळ, मैदानात लाबचलाब घुसलेले वाळूचे दांडे आणि शिंगा याना ओलांडून पोलोकोन्का लाचा चढ आमची जोंगा चढू लागली. खिंडीतून खाली येणाऱ्या प्रवाहाचे चिमुकले पात्र आम्ही दुसऱ्यादा ओलांडले मात्र दोघानी एकदमच ड्रायव्हरला थाबण्याची खूण केली.

समोरच्या उतारावर चक्रवाकाचे एक कुटुंब उभे होते. नारिंगी रंगाचे आई-बाप आणि काळ्या-पाढऱ्या रगाची त्याची आठ पिले. कॅमेरे सरसावीत आम्ही जोंगातून अल्लाद उड्या टाकल्या आणि जमिनीवरच बसून कॅमेरे त्याच्यावर रोखले.

चक्रवाक दंपती काही वेळ स्तब्ध उभी होती. पण कॅमेऱ्याच्या शटरचा आवाज ऐकताच त्याच्यात चलबिचल झाली. तात्काळ त्यापैकी एका पक्ष्याने पख त्रिलग करून शरीर जमिनीसरसे ओणवून, पाय फरफटत आमच्यापासून दूर जाण्यास सुरुवात केली. जखमी झाल्याचे नाटक करून आमचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणारा हा पक्षी नर असावा असा आम्ही अदाज बांधला. आपली पिलावळ घेऊन आई झपाट्याने चढ चढू लागली. पण पिले मागे पडताहेत

असे पाहताच तिने पिलाना जमेल तसे लपण्याचा इशारा दिला असावा. पिले इतस्ततः पांगली, दगड-गोट्यांच्या आड दडू लागली आणि मादीने झटकन् उड्डाण घेऊन टेकाडाचा माथा गाठला. नरपक्षीही उडत काहीसा लांब गेला.

आम्ही त्यांच्या हालचाली लक्षपूर्वक पाहात होतो, जमेल तशी छायाचित्रे घेत होतो. पिले लपलेली आम्ही पाहिली. पण त्यांपैकी एक मात्र अजूनही मूळच्याच जागेवर रखडत होते. त्याला भराभर पाय उचलता येत नव्हते. आम्ही त्यांच्यामागे येत नाही असे पाहताच बाकीची पिले आईकडे पळाली होती. ह्या जखमी पिलाचा नाद आईने सोडून दिल्यासारखा वाटत होता. या पिलाचे काय करायचे असा प्रश्न होता.

त्याला दत्तक घेण्याचा तडकाफडकी निर्णय घेऊन आम्ही तो प्रश्न सोडविला. त्या पिलाला आमच्या हॅटमध्ये जागा मिळाली. जोंगामध्येच त्याची छबी टिपण्यात आली आणि पोलोकोन्का ला ओलांडून त्याच्यासह आमची जोंगा तळावर परत आली.

तळावर पोचताच त्याचा पाय पूर्ण बरा झाल्याचे आमच्या लक्षात आले. काल सायकाळी आमच्याबरोबरच आमच्या दत्तक मुलाचेही जेवण झाले. तळावर ज्याला त्याला बोलायला नवीन विषय मिळाला.

कालच्या या दगदगीनंतर आज पुन्हा त्सो कारला सलीम अलींनी येऊ नये असे आम्हास वाटत होते. पण सलीम अलींनी त्सो कारला जाण्याचा आजचा कार्यक्रमच रद्द केला. त्यामुळे आमचीही ती फेरी वाचली.

स्टारत्सापुक त्सो सरोवरात हिंडण्यासाठी एक तराफा तयार करावा म्हणजे घरट्यापर्यंत पोहोचता येईल असे डॉ. रेड्डींनी त्याना सुचविले आणि संध्याकाळ-पर्यंत तराफा तयार करण्याची हमीही दिली. त्यामुळे आजची सकाळ आम्ही पोलोकोन्का प्रवाहाच्या काठाच्या तमामध्ये शोध घेण्यात घालविली.

रेषाळ तपकिरी रंगाचे आणि चिमणीच्या आकाराचे ट्वाईट (तिबेटी जात) आणि मोठा रोझफिंच याची घरटी या तमाच्या झुडपातून मिळाली. रोझफिंचच्या घरट्यात तीन पिले होती.

सकाळचे पक्षि-निरीक्षण आटोपून आम्ही तळावर परतलो तर हुसेन कष्टी चेहऱ्याने तंबूबाहेर बसलेला दिसला. त्याच्या हातात एक पुठ्ठ्याची पेटी होती. आमचा दत्तक मुलगा चिरंजीव चक्रवाक, याचे वास्तव्य त्या पेटीत होते, ही गोष्ट आम्हाला माहीत होती. सकाळी आमच्याबरोबर उकडलेल्या अंड्याची


न्याहारी झाल्यावर चिरंजीव चक्रवाकाना या पेटीत सुरक्षितपणे बदिस्त करूनच हुसेन बाहेर पडला होता.

त्यानतर केव्हा तरी पेटीच्या फटीतून बाहेर पडण्याचा चि. चक्रवाकाने जोराचा प्रयत्न केला असावा. दुर्दैवाने त्याची चिमुकली मान त्या फटीत जाम अडकली, मुरगाळली गेली आणि त्याचे देहावसान झाले. आमचा छोटा सोबती गेला आणि त्याला मुबईपर्यंत नेण्याचे आमचे बेत कोसळले.

अदमानमधून हुसेनने हॉर्नबिल पक्ष्यांची जोडी सुखरूप मुबईस आणली होती. इथे मात्र त्याचा दुसरा प्रयत्न यशस्वी झाला नाही. लेहला असताना मॅगपायचा बच्चा पाळण्याचा त्याचा प्रयत्नही यशस्वी झाला नव्हता. त्या मॅग-पायलाही अपघाती मरण आले होते!

दुपारी डॉ. रेड्डींचा तराफा तयार झाला. दहा लिटरचे प्लॅस्टिकचे मोकळे डबे आणि त्यावर वायरने करकचून बाधलेल्या फळ्या. तराफा तयार झाल्याबरोबर सलीम अलींच्या हस्ते तो पोलोकोन्का प्रवाहात आमच्या तबूसमोरच सोडण्यात आला. मात्र डॉ. रेड्डी आणि डॉ. डोग्रा त्यावर आरूढ होताच तो कलडला आणि डॉक्टरद्वयांना बऱ्याच दिवसानी आघोळीचे पुण्य मिळाले. पण तराफ्याने जलसमाधी न घेतल्यामुळे त्याच्या उपयुक्ततेबद्दल शंका घेण्यास मात्र जागा नव्हती.

मी सध्याकाळी तबूच्या पाठीमागील पाणथळीत चरणाऱ्या याकचे छायाचित्रण करण्यासाठी गेलो. दुरून हे जनावर फारच हिंस्र दिसले. स्पेनमधील मॅटॅडॉरच्या अगावर चालून येणाऱ्या बैलासारखे. पण ते स्वभावाने मायाळू असते असे ऐकले त्याच्या मायाळूपणाची प्रचीती घेण्यास काही धजावलो नाही



दिसायला हिंस्र पण स्वभावाने मायाळू याक

सायंकाळी सहाच्या सुमारास सलीम अली सायंफेरीसाठी बाहेर पडले आणि आम्हीही त्यांच्याबरोबर निघालो. पुगा नाल्याच्या दिशेने आम्ही सुमारे फर्लांगभर गेलो असू. माझी नजर सहज बाजूच्या पाषाण कड्यावर गेली. जमिनीपासून सुमारे पन्नास मीटर उंचीवर एका ठिकाणी काटक्याचा ढिगारा रचलेला मला दिसला. दुर्बिणीतून निरीक्षण करताच ढिगाऱ्यावर हालचालही दिसली. आसपास पक्ष्याच्या विष्ठेचे पांढरे शिडकावेही दगडांवर सांडलेले दिसले. आम्ही खालून घरट्याचे निरीक्षण करीत असताना एक तपकिरी पक्षी घरट्यावर उतरला, त्याबरोबर आतून कुई कुई असा स्पष्ट स्वरही कानावर आला. घरट्यात त्या पक्ष्याचे पिलू असावे असे दिसत होते.

सलीम अलींनी त्या पक्ष्याला केव्हाच ओळखले होते. तो तांबड्या शेपटीचा ससाणा (रेड-टेल्ड बझर्ड) होता. डुंगटीला सिंधूच्या काठावर तो आम्हाला प्रथम दिसला त्यानंतर हान्लेला आणि पुगालाही तो दिसला होताच. मलाच तो इतरांच्या आधी दिसायचा हे विशेष. "तुझा घास करून तो पिलांना भरविणार बहुतेक. एखाद्या भक्ष्यावर नजर ठेवावी तसा तो तुझ्या मागावर आहे," सलीम अली मला विनोदाने म्हणालेही होते. त्याचे घरटे माझ्याच लक्षात प्रथम आलं हे आणखी एक विशेष.

घरटे पाहात असतानाच बाजूचा डोंगर चढून त्या पातळीपर्यंत पोहोचणे शक्य आहे असेही माझ्या ध्यानात आले. त्याबरोबर सलीम अलींची अनुज्ञा घेऊन मी डोंगर चढून गेलो. पाठोपाठ हुसेनही धापा टाकीत वर येऊन पोहोचला.

त्या घरट्यापासून आम्ही सुमारे वीस मीटर अंतरावर पण एका पातळीत पोहोचलो होतो. घरटे एका कपारीत बांधलेले होते. तमाच्या काटक्या, खालच्या तळावरून पळविलेल्या तारा आणि प्लॅस्टिकचे आवरण असलेल्या केबल्स, चिंध्या, कापूस अशा अनंत गोष्टी एकमेकांत गुंफवून ते रचले होते. माणूसही पक्ष्याच्या उपयोगी पडतो तो असा! घरट्यात एकच पिलू होते, जवळ जवळ पूर्ण वाढ झालेले. त्याचा रंग गडद तपकिरी होता आणि डोके, मान आणि गळा यावरील पिसे मात्र फिक्या सोनेरी रंगाची होती. मधून मधून पंख हलवून ते पंखांना व्यायाम देत होते, घरट्यामधून डोके उंचावून सभोवार पाहात होते, आमच्यावर नजर रोखीत होते आणि घरट्याच्या कडेवर येऊन अवकाशाकडे शेपूट करून विधीही करीत होते. आई-बापांनी पोराला घरटे खराब न करण्याची

शिस्त लावलेली दिसत होती.

त्याची आई आम्ही असताना जवळून घिरट्या मारून गेली, पण घरट्यात उतरण्याचा धीर तिला झाला नाही. आई दिसताच पोर चीं चीं करून तीन-चारदा ओरडले. लपून घरट्यावर नजर ठेवता येईल अशी जागाच कुठे नव्हती. त्यामुळे आम्ही तिथे असेतोपर्यंत नर किंवा मादी घरट्यात शिरतील अशी शक्यता नव्हती. घरट्याचे आणि घरट्यातील पिलाचे छायाचित्रण करणे मात्र सहज शक्य होते

खाली उतरून मी सलीम अलींना ससाण्याच्या घरट्याची कथा ऐकविली. "तुला शंभरपैकी शंभर मार्क," ते उद्गारले. "आता हा ससाणाच माझ्या कॅमेऱ्याचा घास बनेल," मी त्यांना म्हणालो.

□

## सोळा

# स्टारत्सापुक त्सो

अठरा जुलै

कालपासून आकाशात काळे ढग येत आहेत. पण पाऊस अजून पडलेला नाही. वाळवंटात पाऊस किती आणि कसा पडतो हे पहायला मी उत्सुक आहे. स्टारत्सापुक त्सोवर आज आम्ही पोहोचलो आणि त्याच्या शांत, नितळ पाण्यात पडलेले पर्वतांचे आणि आकाशाचे प्रतिबिंब पाहूनच मी इतका वेडावून गेलो की, निरनिराळ्या कोनातून त्याची छायाचित्रे मी टिपली. तोपर्यंत बाकीचे लोक काल तयार झालेला तराफा पाण्यात सोडण्यात गुगले होते तराफ्यातून प्रथम एकेकाला पहिल्या वाळूच्या दाड्यावर सोडण्यात आले. या दाड्यावर मात्र घरटी नव्हती. ती सरोवराच्या मध्यभागी घुसलेल्या वाळूच्या दाड्यावर होती. तेथपर्यंत पाणी किती खोल आहे हे कळत नव्हते. डॉ. डोग्रा आणि डॉ. रेड्डी यानी तराफा तेथपर्यंत नेता येतो का, हे पहायचे ठरविले. तराफा त्यानी पुन्हा पाण्यात ढकलला.

आम्ही वाळूच्या दाड्यावर हिंडू लागलो. डासासारखे कीटक आमच्यावर हल्ला चढवू लागले. गल पक्ष्याच्या थव्यातून दोन गल पक्षी आमच्या डोक्यावर चकरा मारून आम्हाला भिवबू लागले आणि टर्न पक्ष्याची जोडी त्याना हाकलून देण्याचा प्रयत्न करू लागली.

हुसेनने बरोबर टेलिस्कोप आणला होता. बाधाच्या एका टोकापर्यंत जाऊन त्याने तिथे टेलिस्कोप उभा केला व सरोवरातील पक्ष्याचे निरीक्षण सुरू केले. डॉ. विजयन पक्ष्याचा कलकलाट ध्वनिमुद्रित करीत होता आणि डॉ. विश्वास सरोवराकाठी आणखी कोणते कीटक सापडतात का, याचा शोध घेत होते.

इकडे तिकडे हिंडताना मला त्या बांधावर एक मेलेले गार्गेनी टील (बदक) सापडले. बिचाऱ्याला कशामुळे मृत्यू आला असावा, हे कळत नव्हते. त्याच्या अंगावर जखम मात्र दिसत नव्हती. परवा इथे गार्गेनी बदके काही आढळली नव्हती. पण आज मात्र पाच-सहा गार्गेनी बदकांचे तीन थवे सरोवरावर आढळले. ही बदके उत्तर सायबेरिआत घरटी बांधतात. तेव्हा इथे त्यांनी घरटे केले असावे असे संभवत नव्हते. कदाचित ती आपापले संसार आटपून भारतात थंडीचा मोसम घालविण्यासाठी तर उत्तरेकडून परत चालली नसावीत ? कारण गार्गेनी टील बदके हिवाळा सुरू होण्याच्या खूप आधी म्हणजे ऑगस्टमध्येच भारतात येतात आणि ती भारतातून परत जातातही उशिरा, मे च्या सुमारास. म्हणजे मे-जून-जुलै या तीन महिन्यात भारत ते उत्तर सायबेरिआ आणि परत एवढा हजारो मैलांचा खडतर प्रवास ती करतात म्हणायचे

या प्रवासात अनेकांच्या जिवावर बेतते, मला सापडलेल्या मृत बदकाला असाच मृत्यू तर आला नसेल ?

सरोवरावर आज आणखी एक पाहुणा आलेला दिसला. तो होता राखी बगळा - ग्रे हेरॉन. या पक्ष्याचेही मला नेहमीच आश्चर्य वाटत आले आहे. जगातील फार मोठ्या भूप्रदेशावर तो आढळतो. युरोप, आशिया आणि आफ्रिका या खंडामधील बहुतेक भागात तो दिसतो. समुद्रसपाटीपासून पर्वतातील नद्या आणि सरोवरे येथपर्यन्त त्याची जा-ये असते. तेव्हा तो इथे न आढळला तर नवलच. भारतात आढळते ती दक्षिणी जात. आज आम्ही पाहिली ती बहुधा युरोपीय जात असावी. आपल्याकडे त्याचे घरटे एखाद्या उंच झाडावर बांधलेले दिसते. पण युरोपात तो पाणथळीत आणि दाट उंच गवतातही घरटे करताना आढळला आहे.

या बगळ्याने इथे घरटे केले नसावे असे वाटले. तो एकटाच होता आणि घरटे बांधण्यास योग्य असे लांब दांड्याचे गवत इथे उरलेच नव्हते.

सरोवराच्या मध्यभागापर्यन्त जाऊन येण्यास डॉक्टरद्वयांना अपेक्षेपेक्षा बराच वेळ लागला. तोपर्यन्त सलीम अलींना ताटकळत बसावे लागले. डॉक्टरद्वयांनी दोन घरटी तपासली. त्यापैकी एक होते तुरेवाल्या डाबचिकचे. त्यात पाच-सहा पांढरी अंडी होती आणि दुसऱ्या घरट्यात तांबडट रंगाची दहा-बारा अंडी होती. हे घरटे कोणाचे असावे ? अंड्यांच्या संख्येवरून ते बदकाचे असावेसे वाटत होते. गार्गेनी टीलची ती असतील, तर ही बदके इतक्या दक्षिणेला

घरटी बांधू लागली म्हणायची. सलीम अलीही यावर निश्चित मत देऊ शकले नाहीत.

टेलिस्कोप उभा करून हुसेन तेथून दूर गेला होता. तेव्हा टेलिस्कोपमधून मी निरीक्षण सुरू केले. सरोवराच्या पलिकडचा काठ आमच्या दुर्बिणीच्या टप्प्याबाहेर होता. टेलिस्कोपमधून मात्र तो मी न्याहाळू शकलो. त्या काठावर मी सत्तर राजहंस मोजले. काही काठावर उभे होते, काही काठाजवळ पाण्यावर तरंगत होते. इतक्या मोठ्या संख्येने राजहंस आम्ही प्रथमच लडाखमध्ये पाहत होतो. त्या बाजूला चक्रवाक तर किती होते, मोजणेच कठीण जात होते. चक्रवाकाच्या झुंडीच्या झुंडी सरोवराच्या त्या भागात ठिकठिकाणी पसरल्या होत्या.

त्सो कारकडे जाणारी नाली ओलांडून पलिकडे जावे असा एकदा विचार मनात आला होता, पण आम्ही त्या काठावर पोहोचलो असतो आणि बहुतेक पक्षी उडून अलिकडच्या काठाला आले असते !

त्सो कारला आज आमची शेवटचीच भेट होती. यानंतर पुन्हा इथे येण्यात मोठासा फायदा होणार नव्हता. दुपारी ऊन्ह तापायला लागले आणि आम्ही परत फिरलो.

पोलोकोन्का खिंडीकडे जाण्यासाठी आमची जोंगा वाळूची पहिली टेकडी चढली आणि एका माणसाने जोरजोरात हात हलवून आम्हाला थांबविले. जोंगा थांबताच त्याने आमच्या हातात एक कागद दिला. त्यावर पेन्सिलीने काही खरडलेले दिसत होते. अक्षरे वेडीवाकडी आणि अस्पष्ट झाली होती. ती चिठ्ठी डॉ. रेड्डींच्या हाती देण्याविषयी त्याने आम्हाला तीनतीनदा विनंती केली. त्याला तसे आश्वासन देऊन आम्ही पुढे निघालो.

पोलोकोन्का लाचा चढ चढताना जोंगाचे एंजिन भयंकर तापून सतत बंद पडत होते. पाणी शोधून आणून त्यात घालावे लागत होते. त्यामुळे भर उन्हातला तो प्रवास अगदी नकोसा झाला.

सायंकाळी तळावरच्या लोकांनी आमच्यासाठी विविधगुणदर्शनाचा कार्यक्रम केला. एका एकांकिकेत तर आमच्या मोहिमेचे विडंबन होते. सलीम अली, हुसेन, विजयन यांची व्यंगपात्रे उभी केली होती. विडंबन काही ठिकाणी जरा अतिरेकी वाटले तरी सलीम अलींनी आणि इतरांनीही ते खिलाडूपणाने स्वीकारले.

त्यानंतर तळावरच्या सर्वांबरोबर मेजवानी झाली आणि शेवट गोड झाला.

रात्री अचानक डॉ. रेड्डी आमच्या तंबूत दाखल झाले. त्यांच्या हातात एक कागद होता. मी तो ओळखला. स्टारत्सापुक त्सोहून परतताना त्या माणसाने दिलेला कागद होता तो. ज्याने तो कागद दिला तो माणूस म्हणे तळावरच्या सहकारी भांडाराचा व्यवस्थापक होता. भांडारातल्या वस्तूंची आणि पैशाची अफरातफर केल्याचा त्याच्यावरील आरोप सिद्ध झाला आणि डॉ. रेड्डींनी त्याला आठ दिवस स्टारत्सोपुक त्सो येथे हद्दपारीची शिक्षा दिली.

'काळ्या पाण्या'ची शिक्षा भोगीत असलेल्या त्या माणसाने डॉ. रेड्डी-यांच्याकडे दयेची याचना केली होती.

शिक्षा म्हणून नव्हे, पण स्टारत्सोपुक त्सोवर कोणी हद्दपार केले तर आपल्याला कसे वाटेल? कधीतरी इथे मे महिन्यात आलेच पाहिजे, पक्ष्यांचे संसार पाहण्यासाठी. आपल्यावर ही हद्दपारीची वेळ आली तर बरे होईल, असे विचार आता झोपताना डोक्यात घोळत आहेत.

□

सोळा

# खिंडीत

एकवीस जुलै

सायंकाळी सहा वाजता आमची त्सो मोरीरीची छावणी उभी राहिली. आमच्या छावणीपासून सरोवर सुमारे चार कि. मी. दूर आहे. इथून त्याचा एक लहानसा कोपरा तेवढा दिसतो. आमच्या छावणीशेजारून वाहणारा गोड्या पाण्याचा मोठा प्रवाह पुढे त्सो मोरीरीला मिळाला आहे. त्यामुळे इथे पाण्याची टंचाई नाही. मला एकट्याला एक संपूर्ण तंबू मिळाल्याने चैन आहे. मेणबत्तीच्या प्रकाशात शांतपणे बसून लिहायला बरे वाटते आहे.

गेले दोन दिवस लिहावेसे वाटलेच नाही. कारण फारसे काही घडतच नव्हते. १९ तारखेला सकाळी न्याहरी झाल्याबरोबर मी रेड टेल्ड बझर्डच्या घरट्यापर्यंत डोंगर चढून गेलो आणि दुपारी बारापर्यंत तेथेच ठाण मांडले. रंगीत आणि साधी अशी मनसोक्त छायाचित्रे घेतली आणि या चार तासाच्या निरीक्षणाचे एक टाचण जाग्यावरच तयार केले.

या चार तासांत ससाण्याच्या त्या पिलाचे आई-बाप एकदाही घरट्यात उतरले नाहीत. दोनदा त्याच्यापैकी कोणीतरी (बहुतेक पिलाची आई) अगदी घरट्याजवळून गेली आणि पिलाने आनंदाने चीत्कार केला. त्यानंतरही ते एकदोनदा ओरडले – बहुतेक कटाळून. त्याचे आई-वडील फार दूर गेले नव्हते. त्याच्यापैकी कोणीतरी घरट्याच्या सुमारे पन्नास मीटर वरच्या बाजूला बराच वेळ येऊन बसलेही होते. काही वेळा उन्हाचा त्रास होऊन पिलू कपारीत आतवर जात होते. मधूनच पंख हलवून व्यायाम घेत होते. यापेक्षा जास्त मला काही

पहावयास मिळाले नाही. त्याचा आवाज ध्वनिमुद्रित करण्यासाठी टेप-रेकार्डर नाही म्हणून वाईट वाटले

त्या दिवशी दुपारी आकाश भरून आले, वारा सुटला आणि पावसाच्या सरी पडल्या. दक्षिणेकडील पर्वताच्या शिखरावर हिमवृष्टी झाली. इतके दिवस सतत आमच्या पाठलागावर असलेल्या पर्जन्याने एकदाचे आम्हाला गाठले. लडाखमध्ये आम्ही जाऊ तिथे पाऊस घेऊन येऊ, असे अलिकडे घडत होते. हान्लेला जाताना असेच आकाश भरून आले आणि पावसाचे चार थेंबही शिंपडले. आकाशात ढग जमा होताना, विजा चमकताना आम्ही जवळजवळ रोज पाहात होतोच.

भारतात पर्जन्य आता धुमाकूळ घालीत असणार. त्याच्याच बिनीच्या तुकड्यानी हिमालयाच्या शिखराना चुकवून इथपर्यंत मजल मारली असणार.

पाऊस पडल्याने बरे वाटले. पण हवा खराब राहिली तर त्सो मोरीरीकडे जाणे लांबणीवर पडणार की काय अशी भीतीही वाटली.

त्सो मोरीरीला जाण्यासाठी घोड्याची आवश्यकता होती आणि मेजर प्रभाकर घोड्याची जमवाजमव करण्याच्याच उद्योगात होते. त्याचबरोबर जोंगा टेकडी चढू शकते का, हे पाहण्याचाही त्याचा सराव चालू होता असे दिसले. आम्ही स्टारत्सापुक त्सोकडे जात होतो त्यावेळी मेजरसाहेब त्सो मोरीरीकडे जाणाऱ्या वाटेवरील काही गुळगुळीत टेकड्यावर जोंगा चढविण्यात गुतले होते असे नतर कळले.

वीस तारखेचा दिवस सामानाची बाधाबाध करण्यात, त्सो मोरीरीकडे नेण्यासाठी सामानाची निवड करण्यात गेला. पचवीस घोड्यांवर आमचे सर्व सामान आणि चार-सहा दिवस पुरेल इतकी अन्नसामग्री, केरोसीन वगैरे लादण्यात आले.

मात्र आज सकाळी निघताना आम्ही घोड्यांवर आरूढ झालो नाही, तर जोंगातच बसलो, कारण आमच्या तबूपाठीमागील टेकडी जोंगातूनच चढायची असा निर्णय मे. प्रभाकर यानी घेतला होता.

जो डोंगर केवळ पायानीच चढणे शक्य आहे, तो जोंगात बसून चढणे कसे वाटेल याची कल्पना नव्हती. पहिले शंभर-दोनशे फूट चढ चढताना काहीच वाटले नाही. पण नतर मात्र मागे नजर टाकणे जड जाऊ लागले. गाडी पुढे जाण्याऐवजी घरंगळत मागे जाऊ लागली तर काय होईल या विचाराने अगा-

वर काटा येऊ लागला. निम्मा-अधिक डोंगर तर आमच्या जोंगा चढून गेल्या. इथे डोंगर चढताना एकदम उभा खडक वाटेत लागत नाही. त्यामुळे गाड्या-वर जाऊ शकतात. पण पुढचा चढ भलताच खडा निघाला. जोंगात पाठीमागे एका जवानाला हातात एक मोठा दगड घेऊन बसविण्यात आले. गाडी मध्येच थांबली आणि मागे घरंगळू लागली तर चाकाला दगड लावण्यासाठी. अर्थात तशी वेळ न येऊ देण्याचा शहाणपणा आम्ही दाखविला आणि शेवटचे पाचशे फूट पायींच चढलो.

टेकडीचा माथा मात्र सपाट होता, लांबलचक होता. त्यावरून जोंगा मजेत धावल्या. वर कोठे कोठे हिरवळ होती, दगडाच्या कपच्या इतस्ततः पसरल्या होत्या आणि आमच्या जोंगानी दोनदा तिबेटी ससाना घाबरवून पळवून लावले. डोंगरमाथ्यावर शिंगवाले चंडोल (हॉर्नड् लार्क) पक्षीही दिसले. सोळा हजार फुटावरून बाजूच्या पर्वतराजीचे दृश्य विलक्षण सुंदर दिसत होते

टेकडी चढत असताना आमच्या तीन जोंगा तीन दिशाना झाल्या होत्या. आम्ही सर्व एकत्र येईपर्यंत आमच्या आधी निघालेले घोडे आमचे सामान घेऊन एका सोप्या वाटेने टेकडी चढून आले. पण टेकडी एकदा चढल्यावर जोंगा टेकडी सहज उतरू शकतील असे साधे गणित करून मेजर साहेबानी घोड्याना पुढे पिटाळले आणि आम्ही पुन्हा जोंगामध्ये बंदिस्त झालो.

बऱ्याच खटाटोपानंतर टेकडी उतरून जाण्यास सोपा, कमी उताराचा मार्ग एकदा सापडला आणि पंधरा हजार फूट उंचावरच्या एका अतिउच्च[illegible] (अल्पाईन) कुरणात आम्ही दाखल झालो. इथे दोन तंबू होते, तिबेटी निर्वासिताचे, आम्ही हान्लेला पाहिले तसले. शेळ्या-मेंढ्या आणि याक कुरणात चरत होते आणि तिबेटी कुत्रे जोरजोरात आमच्यावर भुंकत होते. शेळ्या एका ओळीत उभ्या करून बायका त्याची धार काढीत होत्या.

वीस हजार फूट उंचीची दोन हिमशिखरे पश्चिम क्षितिज अडवून उभी होती. त्याच्या उतारावरून वहात येणाऱ्या प्रवाहामुळेच इथे ओलावा होता, हिरवळ होती. बाकी डोंगराचे उतार अगदी शुष्क, बोडके, भग्न होते.

दक्षिणेकडच्या छोट्या टेकड्यांमागे त्सो मोरीरी दडले होते. तेव्हा सरळ रेषा हेच कमीत कमी अंतर या तत्त्वाचा आश्रय करून मेजर साहेबानी जोंगाना पुन्हा टेकड्या पार करण्यास लावले. आणखी हजार फूट चढून आम्ही

टेकड्यांमधल्या एका प्रशस्त पठारावर थांबलो. इथेही तिबेटी निर्वासित, त्यांच्या मेंढ्यांसह आमच्या स्वागतास हजर होते.

निळ्या डोळ्यांच्या, 'कर्क डग्लस' चेहऱ्याच्या आणि डोक्यावर तिरकी फेल्ट हॅट घालणाऱ्या या निर्वासिताने आम्हाला मेंढ्याच्या दुधाचा चहा पाजला आणि त्या बदल्यात आमच्याकडून बाटलीभर केरोसीन मिळविले.

पण या पठारावर या तिबेटी निर्वासिताशिवाय आणि त्याच्या देखण्या बायको-शिवाय पाहण्यासारखे इतरही बरेच होते.

चहाचा आस्वाद घेताघेताच माझी नजर त्या पाच जणांच्या कपूवर पडली. इथे जमिनीला असंख्य बिळे होती. आमच्यापासून सुमारे वीस मीटर अंतरावर एका बिळातून पाच चिमुकली डोकी हळूच बाहेर आलेली मला दिसली. मग त्यांपैकी एक जण हळूच बिळाबाहेर पडला. पाठोपाठ भीतभीत बाकीचे चौघेही बाहेर आले. त्यांचा रंग राखट बदामी होता, कान लहान होते आणि शेपूट आखूड होती. हे वाळवटातले उंदीर नव्हते. हे होते 'माऊस हेअर' म्हणजे उंदीरही आणि ससाही; पण सशाला हा प्राणी अधिक जवळचा, दिसायला अत्यंत गोंडस आणि नाजूक. पण वास्तव्य अतिउंचावर, वर्षातले नऊ महिने थंडीने गोठून जाणाऱ्या प्रदेशात.

हे नाजूक प्राणी जमिनीत बिळे खोदत नाहीत, तर दगडाच्या कपच्या आणि लहानमोठे फत्तर याखालच्या फटी यामध्ये राहतात असे मी वाचले होते. पण ज्या पंचकडीवर मी नजर लावून बसलो होतो, ते सारे एका लहानशा बिळातूनच बाहेर आले.

हळूहळू पाचही जण बाहेर येऊन माझ्याकडे पाठ करून बसले. जणू काय आता कोणता पवित्रा घ्यायचा यावर गहन विचारात गढून गेले आहेत. मध्येच दूरवरून कसला तरी आवाज आला म्हणून त्यांपैकी दोघांनी टुणकन् उडी मारून माझ्याकडे तोंड केले. सुमारे चाळीस फूट अंतरावरून मी त्यांच्याकडे कॅमेरा रोखून बसलो होतो, मधूनमधून छायाचित्रे घेत होतो.

जराशी शांतता झाल्याबरोबर दोघातिघांनी ओल्या नाकपुड्या हलवीत इकडे-तिकडे हिंडण्यास सुरुवात केली. जवळपास गवत नव्हते. आणखी काही सापडते का, हे पाहण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र जरा कुठे खुट्ट झाले, खसखस झाली की प्रत्येक जण बिळाकडे धावत होता, क्षणभर गडप होत होता आणि हळूच पुन्हा बिळाबाहेर डोकावत होता.

माझ्यापासून शभर फुटावर एक लहानशी पाणथळ जागा होती. तेथे फूटभर उंचीचे गवत उगवले होते. गवताच्या पुंजक्याआड मला हालचाल दिसत होती. मी लहानग्या 'माऊस-हेअर्स'चे छायाचित्रण करीत असताना खारीसारखा कर्कश चीत्कारही कानावर पडत होता. तेव्हा या 'माऊस-हेअर'चा नाद सोडून मी आता त्या गवताच्या पुंजक्याकडे मोर्चा वळविला.

मी जवळ जाताच त्या पुंजक्याआडून लहानशा सशासारखा, सोनेरी रंगाचा एक प्राणी पळाला आणि काही अंतरावरील त्याच्या बिळात गडप झाला. तो पुन्हा त्या बिळाबाहेर डोकावेल असे वाटून मी त्या बिळापासून काही अंतरावर निश्चल बसून राहिलो.

माझा अंदाज खरा ठरला. पाच-सात मिनिटांनी एक सोनेरी डोके बिळातून आजूबाजूस पाहू लागले. या प्राण्याचे कान सशासारखे लांब नव्हते, आखूड होते. बिळाबाहेर डोके काढून या प्राण्याने कर्कश चीत्कार केला आणि माझी चाहूल लागून असेल कदाचित, तो पुन्हा बिळात पसार झाला.

तो बिळाबाहेर पडेल या आशेने मी दूर गेलो आणि त्या गवताच्या पुंजक्यात जवळच्याच एका दगडापाठीमागे दडलो बिळातून तो प्राणी पुन्हा डोकावीत असलेला मी पाहिला, पण तो बाहेर आला नाही. माझे नशीब मात्र यावेळी जोरावर होते. गवताच्या पुंजक्याजवळ तसलाच आणखी एक प्राणी शांतपणे बसलेला मला आढळला. त्याचे छायाचित्र घेण्यात मी मुळीच वेळ दवडला नाही.

मी परत फिरलो, तर सलीम अली माऊस-हेअरचे छायाचित्रण करीत बसलेले आढळले. काही अंतरावर बर्फाची एक मोठी लादी पसरलेली होती. तिच्या आसपास उगवलेल्या सुंदर रानफुलांचे छायाचित्रण करून हुसेन परतला होता.

पुढच्या मार्गाची टेहळणी करण्यास गेलेले मे. प्रभाकर आणि डॉ. विश्वास थोड्याच वेळात परतले. " पुढच्या खिंडीतून त्सो मोरीरीचा देखावा विलक्षण सुंदर दिसतो आहे " डॉ. विश्वास उद्गारले. मी त्यांना माऊस-हेअरचे ते बीळ दाखविले आणि मला दिसलेल्या त्या सशाएवढ्या प्राण्याची माहितीही दिली. " ती माऊस हेअरचीच मोठी जात असावी " ते म्हणाले.

आता हवा बिघडली होती, वारे सुटले होते आणि भुरुभुरू हिम पडू लागले होते. माऊस-हेअरच्या त्या वसाहतीचा निरोप घेऊन आम्ही पुढे निघालो.

दोन-तीन टेकड्या मागे टाकून एका उचशा डोंगर माथ्यावर जोंगा थाबल्या. मेजर प्रभाकर जोंगातून उतरून पुढील मार्गाची पाहणी करू लागले. सतरा हजार फूट उचीवरील त्या खिंडीतून दूरवर पसरलेली दोन सरोवरे दिसत होती. त्यातल्या त्यात जे जवळचे सरोवर होते त्याचे पाणी अतिशय गहिरे निळे होते. मला पँगाँग सरोवराची आठवण झाली. त्या सरोवराचा परिघ सुमारे पाच किलोमीटर असावा. त्याच्या भोवतीच्या टेकड्या वालुकामय, गुळगुळीत आणि पूर्णपणे शुष्क होत्या. त्या सरोवराच्या काठावर गवताच्या पात्याचाही मागमूस नव्हता. चारही बाजूनी जमिनीने वेष्टिलेल्या या सरोवराचे पाणी अतिक्षारयुक्त असावे असा अदाज करता येत होता.

आणखी पलिकडे होते त्सो मोरीरी. वीस-एकवीस हजार फूट उचीच्या हिमपर्वतानी त्याच्या पश्चिम आणि दक्षिण बाजू अडविल्या होत्या उत्तरेकडून एका प्रशस्त खोऱ्यातून एक प्रवाह त्याला मिळत होता. या खोऱ्यात जागो-जागी हिरवळ होती, लमाही दाट उगवलेले दिसत होते. तळ ठोकण्यास ही जागा उत्तम होती.

पण प्रश्न होता तिथपर्यंत पोचण्याचा. दोन हजार फूट खाली उतरून जायचे होते आणि उतार अतिशय तीव्र होता. ५०-६० अशाच्या उतरडी-वरून जोंगा उतरविणे भाग होते, आणि गाड्या तशाच उतरविण्याचा मे. प्रभाकर यानी निर्णय घेतला. सुदैवाने वाटेत मोठे खडक किंवा कडे नव्हते.

प्रत्येकजण सावरून बसला. गाडीचा दिसेल तो भाग प्रत्येकाने पकडला होता. जीव कुठे पकडून धरला होता, हे न सागता कळत होते. सलीम अली जप करीत असल्यासारखे तोंडातल्या तोंडात काही तरी पुटपुटत होते विजयन सतापाने लाल होऊन चूप बसला होता.

मेजर प्रभाकरानी ड्रायव्हरना योग्य त्या सूचना दिल्या आणि आमच्या जोंगा तो उतार उतरू लागल्या. वाटेत एखाद्या मोठ्या फत्तरावर गाडी गचकली, ठेचकाळली की डोक्याला झिणझिण्या येत. मला मेजरसाहेबाचे कौतुक वाटले. दोन बोटात सिगरेटचे थोटूक धरून, मधून मधून झुरके मारत ते शातपणे जोंगा हाकीत होते.

आम्ही सुमारे हजार फूट खाली उतरलो असू आणि उत्तरेला एकदम एक सपाट जागा आणि त्यावरून खाली खोऱ्यात जाता येण्यासारखी सोपी उतरड नजरेत आली. या बाजूला उतार तीव्र नव्हता, पण डोंगर लहान मोठ्या

कपच्यानी आणि खाचखळग्यानी भरून गेला होता. अर्थात् त्याच बाजूने जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

खडकातून आदळत, आपटत आमच्या जोंगा एकदाच्या सपाटीवर येऊन थांबल्या. त्सो मोरीरी सरोवराला स्वयचलित वाहनाचा पदस्पर्श प्रथमच होत होता. त्सो मोरीरीपर्यंत जोंगा पोचविण्याच्या आपल्या कामगिरीवर मेजर साहेब खूश होते. पण सलीम अलींच्यासाठी तरी, असले भयानक चढ-उतार पार करण्याचा धोका त्यांनी पत्करायला नको होता, असे आम्हाला वाटले.

तळाची जागा नक्की ठरल्यावर तंबूची उभारणी आणि सामानाची लावा-लावी सुरू झाली. प्रवाहाच्या पलिकडील डोंगराच्या माथ्याजवळ शभर-दीडशे चक्र पक्ष्यांचा थवा घिरट्या मारीत होता, रॉबिन ॲक्सेंटर आणि शिंगवाले चंडोल आमच्या अवतीभोवती घोटाळून होते आणि दूरवर त्सो मोरीरीच्या पाण्याची निळी चंद्रकोर डोंगराआडून हळूच डोकावत होती.

मला मिळालेल्या तंबूत शिरून मी सामान लावण्यास सुरुवात केली तेव्हा हेच दृश्य डोळ्यासमोर पुन्हा पुन्हा उभे रहात होते.

□

बावीस जुलै

## अठरा

# त्सो मोरीरी

१५,२०० फूट उंचीवरील आमची ही छावणी दगड-गोट्यांनी भरून गेलेल्या एका खोऱ्यात आहे. एका खळाळणाऱ्या प्रवाहाच्या काठी आम्ही तंबू उभारले आहेत. प्रवाहाच्या पलिकडे म्हणजे पश्चिमेला थोडी सपाट जागा आणि त्यानंतर एक प्रशस्त उंचवटा किंवा 'गच्ची' (टेरेस) आहे. ती कदाचित या प्रवाहाची पूर्वीची पातळी दाखवीत असावी. या गच्चीच्या पलिकडे सुमारे तीन हजार फूट उंचीचे पाषाणाचे कडे आहेत, त्यामधून कोठे कोठे हिम खाली ओघळले आहे. त्या पलिकडे काय असेल अशी उत्सुकता लावतात हे पर्वत. पण त्याच्या पलिकडेही आणखी पर्वत असणार, त्याच्याहूनही उंच असणार, हे ठाऊक असूनही त्याच्या पलिकडे काय आहे हे उडत जाऊन पहावे, असे वाटते आहे. त्या कड्यावर हिंडताना एखादा 'नयन' (पहाडी बकरा) किंवा 'आयबेक्स' दिसला तर काय बहार होईल असे वाटते आहे.

हा देखावा एवढ्या शांतपणे पहावयास आज सकाळी वेळ मिळाला याचे कारण एकच आमच्या पाकशाळेतील चुलींनी असहकार पुकारला आहे. आमची पाकशाळा म्हणजे दगडावर दगड आणि गोट्यावर गोटा रचून उभारलेले एक लहानसे भिंताड आहे त्याभोवती मिळेल तो कपडा बांधून आडोसा करण्याचा प्रयत्न आहे आणि ती कापडे उडवून लावण्याचा आणि भिरकावून देण्याचा इथल्या वाऱ्याला छंदच जडला आहे. चुलीला इथे सरपण म्हणजे याकचे शेण. ते शोधून आणण्यासाठी मेजर साहेबांनी जवानांना पिटाळले आहे,

कारण केरोसीनचे रेशन आहे. ते शेण उत्तम जळू शकते हा दावा खोटा ठरविण्याचा चुलींनी चगच बाधला आहे.

आम्ही इकडे चहाचा कप पुढ्यात केव्हा येतोय याची वाट पहात होतो तर आमचे घोडेवाले घोडे केव्हा उगवतात याची वाट पहात होते. घोडे जमिनीतून उगवणार नव्हते, तर ते जमिनीतून उगवणाऱ्या गवताच्या शोधार्थ गेले होते. रात्री घोड्याना चरायला मोकळे सोडायचे असा इथला रिवाज. सकाळी ते नेमके परत येतात असा घोडेवाल्याचा विश्वास. आज मात्र घोड्याना पल्याडच्या गच्चीवरून हाकलून आणावे लागले. मला सलीम अलींचा हेवा वाटला. त्याना एक पाढराशुभ्र वारू मिळाला आणि मुख्य म्हणजे सलीम अलींना पाठीवर बसू देण्यात त्याला अभिमान वाटत असावा असे दिसले इतक्या शातपणे आणि रुबाबात तो सलीम अलींसह इकडे तिकडे हिंडत होता.

इकडे आमच्या घोड्याची स्थिती निराळी होती. त्यानी आम्हाला बारीक नजरेने न्याहाळले आणि चक्क नाके मुरडली असा मला भास झाला. आम्ही घोड्यावर बसायला जावे आणि घोड्याने आपला पार्श्वभाग फिरवून मुडी आमच्यापुढे धरावी असे अनेकदा झाले. पाठीवरून सामान वाहण्याची सवय असलेल्या या घोड्यावर साइसानी आम्हाला सामानासारखेच जेव्हा बाधले तेव्हा त्या घोड्याची समजूत पटली. थोडे फार अतर चालून जाताच सुसरी-बाईची पाठ मऊ का घोड्याची, असा मला प्रश्न पडला, कारण माझ्या घोड्याला खोगीर असे नव्हतेच. होती एक अरुद लाकडी सीट. अगातला कोट काढून खोगीरभरती करावी असा विचार आला, पण ऊन्ह तापत असले तरी वारा आला की थडी वाजत होती.

आमच्या छावणीपासून सुमारे पाच किलो मीटर अतरावर त्सो मोरीरी सरोवराचे टोक दिसत होते. प्रवाहाच्या कडेने, त्यानेच तयार केलेल्या कमी अधिक चिंचोळ्या खोऱ्यातून एक पायवाट त्सो मोरीरीकडे जात होती. या वाटेने आम्ही निघालो तेव्हा सकाळचे नऊ वाजून गेले होते — म्हणजे निघावयास सुमारे दीड तास उशीर झाला होता. मात्र चालत जाण्यापेक्षा घोड्यावरून आपण लवकर पोहोचू, हा आमचा विश्वास फोल ठरला. विजयन ज्यावर बसला होता तो प्राणी घोडा नसून घोडी आहे हे घोडेवाल्यानी निदर्शनास आणून दिले आणि पुढे असेही सागितले की मी, हुसेन आणि विश्वास ज्यावर बसलो

होतो, ती तिचीच शिंगरे आहेत. हुसेनच्या घोड्याच्या बाबतीत मला पहिल्या-पासूनच तसला संशय येत होता, कारण हे बाळ सतत आईच्या शेपटीला नाक लावून चालत होते, आणि त्याची उंची इतकीच होती की सहा फुटी हुसेनचे पाय घोड्याच्या पाठीवरून ओघळून जवळपास जमिनीपर्यंत टेकत होते!

घोड्याच्या जातीत वयात आल्यावरही मुले आई-बापाचे ऐकतात असा प्रत्यय आला. आईने खाली वाकून गवताला तोंड लावले की मुलेही तसेच करीत. आई थांबली की थांबत, आईच्या मागोमागच चालत. डॉ. विजयनच्या वारूपुढे घोडे दामटण्याचे आमचे प्रयत्न विफल झाले आणि प्रथम हुसेनने आणि त्यानंतर आम्ही एकेकाने शेवटी घोड्यांचा त्याग केला.

घोड्यावरून खाली उतरल्यावरच आजूबाजूस पाहण्यास खरी फुरसद मिळाली. प्रवाहाची धार खूप खळाळती आहे, त्याच्या दोन्ही बाजूला दाट गवत आहे, मधूनमधून तमाची झुडपे आहेत. बाजूच्या डोंगरावरील खडकाचा भुगा झाला आहे, त्याचे उतार लहान गोटे आणि फरशा यांनी भरून गेले आहेत, त्यातून मधूनच ॲस्ट्रॅगॅलसची जांभळी आणि दुसरी कसली तरी पिवळी फुले उगवली आहेत आणि त्याशिवाय गर्द हिरवी, मांसल, टणटणीच्या पानासारखी पाने असलेली काटेरी झुडपेही आहेत; या सर्व गोष्टी नजरेने टिपल्या होत्या. या प्रदेशात मार्मोट पुष्कळ असावेत असे वाटत होते. कारण आम्ही अश्वारूढ होऊन निघाल्याबरोबरच पाच-सहा मार्मोट पळून गेलेले दिसले होते.

घोड्यावरून उतरल्यावर मात्र हुसेनला त्या पिवळ्या फुलांचा फोटो काढायला सवड मिळाली; त्या काटेरी झुडपाआड घरटे करणाऱ्या एका रॉबिन ॲक्सेंटरला आपल्या पिलाला भरविताना मी पाहिले आणि तिबेटी ट्वाईटचा फोटो घेण्याचा निष्फळ प्रयत्नही करता आला

मी ट्वाईटचे छायाचित्र घेण्याच्या प्रयत्नात असतानाच मला बंदुकीचा बार ऐकू आला. याचा अर्थ हुसेनला नवीन पक्षी दिसला होता. मी आणि विजयन धावत पुढे गेलो. इतक्यात आमच्या डोक्यावरून एक लहानसा पक्षी उडत गेला आणि डोंगर-उतारावरील पुढे आलेल्या एका खडकावर टेकला. लगेच हुसेनच्या बंदुकीतून आणखी एक छर्रा सुटला, तो पक्षी पुन्हा उडालेला आम्ही पाहिला. त्याचे काळपट तपकिरी शरीर आणि पांढरी छाती आम्ही सर्वांनीच पाहिली होती. पांढऱ्या छातीच्या डिपर पक्ष्याने आज जवळपास आमची

मोहीम संपताना आम्हाला दर्शन दिले होते. खळाळणारा प्रवाह पाहिला, तेव्हाच मला डिपरची आठवण झाली होती.

हा चिमुकला डिपर पक्षी हे हिमालयातील [illegible]. चिंचोळ्या दऱ्यातून फुफाटणारे, मोठमोठ्या खडकावर धडका खाऊन उसळणारे, गरगरणारे प्रवाह हिमालयात पुष्कळ आहेत आणि अशा प्रवाहावर डिपर आढळणार हेही निश्चित आहे. जितका प्रवाह अधिक उच्छृंखल आणि बेभान तितका तो डिपरचा आवडता असावा. अशा प्रवाहातील निसरड्या दगडांवर सहजपणे उभे राहून, पाण्याचा धबधबा आणि तुषारांचा फवारा अंगावर घेत दगडातून उसळणाऱ्या आणि फत्तरात चिमटणाऱ्या धारेत खुशाल स्वतःला झोकून देणारा हा पक्षी. त्याच्या शरीराला पाण्याचा स्पर्श होणार नाही, कारण त्याच्या शरीरावरची पिसे अत्यंत दाट आहेत आणि जलप्रतिबंधक आहेत. त्याच्या डोळ्यांनाही या पिसांनी संरक्षण दिले आहे. त्याच्या शरीराचा आकार छोटा, गोट्यासारखा गोल गुळगुळीत आहे. पाण्याच्या तळाशी [illegible] ण्याची कला त्याला साध्य झाली आहे आणि पाण्यातील कीटक हे त्याचे मुख्य खाद्य आहे.

हिमालयात आठ ते अकरा हजार फूट उंचीवर आपल्याला नेहमी आढळतो तो डिपर पूर्णपणे तपकिरी (चॉकोलेटी) रंगाचा आहे. पण आज पाहिला त्या पक्ष्याची काळ्या रंगाची आणि छातीवर मोठा पांढरा ठिपका असलेली युरोपीय जात आहे. बारा हजार आणि त्यापेक्षाही उंचीवरील प्रवाहावर हिमालयात हा 'पांढऱ्या छातीचा डिपर' सापडतो. लडाखमध्ये तो नक्की पहावयास मिळणार, नव्हे तो तिथे भरपूर प्रमाणात असणार अशी आमची कल्पना होती. पण आमच्या भ्रमंतीमध्ये आम्ही त्याला आज प्रथमच पाहात होतो. गेल्या वर्षी काश्मीरमध्ये तो आम्हाला अजिबात दिसला नव्हता. सलीम अलींनी तो काश्मीरमध्ये जिथे तिथे आढळतो असे पूर्वी लिहून ठेवले आहे. आता हा पक्षी दुर्मीळ झाला की काय?

डिपर हातातून निसटला म्हणून हुसेनला वाईट वाटले आणि तो वाचला म्हणून मला बरे वाटले! आता मधूनमधून दगडापाठीमागे अदृश्य होणाऱ्या मार्मोटना पहात पहात आम्ही चालतच पुढे निघालो. आता खोरे रुंदावले, पूर्वेकडून आणखी एक प्रवाह वाहात आला, दगड-गोट्यांनी भरलेले डोंगर दूर सरकले, प्रवाहाकाठचे हिरवळीचे पट्टे तुटक झाले, मधूनमधून वाळूच्या लहान

शिगा आडव्या येऊ लागल्या आणि प्रवाहाच्या दोन्ही बाजूला तमाच्या झुडपाचे रान माजले.

आपल्या शुभ्र वाळूवरून पुढे गेलेले सलीम अली एका उंचवट्यावर आमची वाट पहात बसलेले दिसले. तेथून त्सो मोरीरीचे संपूर्ण पात्र नजरेत येत होते. उत्तरेकडून त्याला मिळणाऱ्या या प्रवाहाने वाळवंटात स्वतःचा एक मोठा त्रिभुज प्रदेश निर्माण केला होता. प्रवाह चार-पाच शाखांनी सरोवराला मिळत होता. या शाखामध्ये पाणथळ जागा होती आणि या पाणथळीत दुरून लहान राखी ठिपके विखुरलेले मला दिसले.

यावेळी मी आणि डॉ. विश्वास यांनी भराभरा पुढे चालायला सुरुवात केली. तमामध्ये वावरणाऱ्या एका मोठ्या रोझफिंचच्या लीला पहात आणि वाळूत इथे तिथे बसलेल्या पर्वतीय पाखरांना उडवून लावीत आम्ही त्या पाणथळ जागेपर्यंत पोहोचलो. त्याबरोबर ते राखी ठिपके लगबगा सरोवराकडे पळू लागले. मी दुर्बिणीतून पाहिले, ते सर्व राजहंस होते.

ती पाणथळ जागा ही त्यांची घरटी बांधण्याची जागा असावी असे वाटून आम्ही आणखी पुढे निघालो. वाटेत जागोजागी लहान लहान डबकी साचलेली दिसली. त्याच्या आसपास सॅन्डप्लोव्हर आणि ठिपकेवाले तुतवार (सँडपायपर) पक्षी तुरतुरत होते. आम्हाला पाहताच काही चक्रवाक आणि एक टर्न उडाले आणि दूर गेले.

उत्तरेकडून सरोवराला मिळणाऱ्या या प्रवाहाने सरोवराचे पाणी काठापासून जवळजवळ मैलभर आतवर गोडे केले होते की काय, कोण जाणे! सरोवराच्या या चौरस मैलाच्या भागातच पक्षी दिसत होते, सरोवरापासून हा भाग वेगळा दर्शविण्यासाठी जणू काही एक वाळूचा दांडा पूर्वेकडून पश्चिमेकडे आतवर घुसला होता. या दांड्यापलिकडे त्सो मोरीरीचे विशाल पात्र पसरले होते, त्याला वेढा घालून बसलेल्या पर्वतांच्या पायथ्यापर्यन्त भिडले होते. या पर्वताची हिमशिखरे दुपारच्या उन्हात तळपत होती आणि दक्षिणेकडून त्याच्यामागे काळे ढग जमा होत होते.

आमच्या मागोमाग हुसेन, विजयन आणि सलीम अलीही पाणथळ जागेत येऊन दाखल झाले आणि सरोवरात कोणते आणि किती पक्षी दिसतात हे आम्ही पाहू लागलो. पूर्वेकडे एका ठिकाणी सरोवराचा एक फाटा सुमारे अर्धा मैल आतवर घुसला होता. त्याबाजूला काही राजहंस होते. आम्ही पुढे येतोय

हे पाहताच ते झपाट्याने पोहत सरोवराकडे निघाले. जिथे हा फाटा सरोवराला मिळत होता, ती जागा अरुंद होती. तिथे जाऊन बसलो तर राजहंसाची छायाचित्रे जवळून मिळणे शक्य आहे असे लक्षात आल्याबरोबर मी आणि हुसेन यांनी धावत जाऊन तेथे ठाण मांडले.

राजहंस झपाट्याने पोहत येत होते. त्यांच्याबरोबर त्यांची पिले होती. त्यांना त्यांनी मध्ये घेतले होते आणि मोठे पक्षी पुढे व पाठीमागे राहून त्यांना संरक्षण देत होते.

सरोवरात शिरायचे म्हणजे त्यांना आमच्यासमोरून, सुमारे शंभर फूट अंतरावरून जाणे भाग होते. राजहंस जसे जवळ यायला लागले तसे आमचे दोघांचेही कॅमेरे क्लिकायला लागले. काही आमच्यासमोरून तसेच सरोवरात गेले, कारण पिलांना सोडून दूर जाणे त्यांना शक्यच नव्हते. त्यांनी धोका पत्करला. शेवटी फक्त मोठेच पाच सहा पक्षी आले. त्यांना मात्र आमचा विश्वास वाटणे शक्यच नव्हते. तेव्हा आमच्यासमोर येताच ते सरळ किनाऱ्या-वर चढले आणि चक्क पळत पळत दूर गेले, अर्थात् त्यांच्या पलायनाचे छायाचित्रण करण्यास आम्ही चुकलो नाही.

या गोड्या पाण्याच्या पट्ट्यात राजहंसाशिवाय काही चक्रवाक होते आणि त्यांच्याबरोबर त्यांची पिलेही होती. काही तुरेवाले दाबचिक होते, टर्नची एक जोडी होती आणि एकुलता एक गल होता – वाट चुकल्यासारखा. विजयनने १२४ राजहंस आणि २२ तुरेवाले दाबचिक मोजले. सरोवराच्या मुख्य पात्राच्या आजूबाजूस मात्र एकही पक्षी नव्हता.

मी आणि विजयनने आणखी पुढे जाऊन सरोवराच्या मुख्य पात्राचे निरीक्षण करून येण्याचे ठरविले. आमच्यासाठी दोन घोडे मागे ठेवायचे आणि इतरांनी परत फिरायचे असे ठरले.

पूर्वेकडे गेलेल्या सरोवराच्या फाट्याला वळसा घालून एक मैलभर वाळवंट तुडविल्यावर मी त्सो मोरीरी सरोवराच्या काठावर पोहोचलो. सरोवराचे पाणी हिरवट निळे होते. त्याच्या संथ पात्रावर मधून मधून नाजूक लाटा उचंबळत होत्या. एक पांढरा शुभ्र टर्न माझ्या आसपास घिरट्या मारीत होता. बाकी सरोवरावर सर्वत्र शुकशुकाट होता. सरोवराच्या वायव्येकडे डोंगरामध्ये मधून मधून सपाट खोरी होती. त्यांपैकी एका खोऱ्यात काही शेते आणि घरे दिसत होती. पूर्वेकडे मात्र वाळूच्या शिगा आणि उंचवटे, पिवळे, नारिंगी आणि जांभळे

डोंगर याशिवाय काहीही नव्हते.

मी सरोवराचे छायाचित्र घेतले. काठावरचे काही दगड आणि शिंपले गोळा केले आणि परत फिरलो

त्सो मोरीरीवर तिबेटी क्रौंच काही दिसला नाही. इथल्या प्रदेशाकडे पाहून तो इथे दिसेल असे वाटतही नव्हते

आम्ही परत फिरलेले पाहून घोडेवाला आमच्या घोड्याना आणण्यासाठी धावला. एका वारक्याशा काठीने त्याना हाकलून आणण्यात आले घोड्यांचा ' मूड ' मला एकूण ठीक वाटला नाही. ते जरा बिथरलेलेच वाटले. विजयन कसाबसा घोड्यावर स्वार झाला. मला मात्र घोड्यावर झटकन् बसणे जमेना. तो घोडा मुद्दामच तऱ्हेवाईकपणे उभा राहतो आहे असे वाटले मला. हातात कॅमेरा आणि लेन्स साभाळीत मी कसाबसा स्वार झालो. घोडेवाल्याने पुढच्या घोड्याचा लगाम हातात घेण्यासाठी माझ्या घोड्यापुढे पाठ करताच, माझ्या घोड्याने लहानशी उसळी मारली आणि पुढचे पाय वर उचलले. मी त्याला चुचकारू लागलो. घोड्याच्या कानात वारे भरले होते. विजयनच्या घोड्याने तगड्या झाडीत पळण्यास सुरुवात केली आणि चार-दोन पावले जाऊन विजयनला पाठीवरून चक्क खाली फेकले तो एका कुशीवर पडला. माझा घोडाही बिथरणार हे लक्षात येऊन मी खाली उतरण्याचा निष्फळ प्रयत्न केला. घोड्याने पळावयास सुरुवात करताच मी घोड्यावरून उडी टाकली, पण एका मनगटावर भार देऊन धरणीवर साष्टांग नमस्कार मला घालावा लागला. मनगट दुखावले, सुदैवाने माझ्या हातातील कॅमेरा, त्याला लावलेली लाब लेन्स आणि गळ्यातील दुर्बीण बचावली.

घोडे लाब पळून गेले. दोन घोड्याना आमच्यासाठी ठेवून घेऊन आम्ही मायलेकाची ताटातूट केली होती. आता दुपारच्या उन्हात पाच-सहा कि. मी. चालत जाणे भाग होते. पोटात कावळे कोकलत होते. विजयनच्या खिशात ग्लुकोजचे एक लहान पाकीट सापडले. त्याच्या चिमटी तोंडात टाकीत आम्ही परत निघालो.

कंटाळा आला की मधून मधून थांबत आम्ही सावकाश चालत होतो. वाटेत भेटणाऱ्या झुडपाचे आणि फुलाचे नमुने विजयन गोळा करीत होता. हिरवळीत उगविणाऱ्या एका लहानशा शेवंतीसारख्या फुलाने आमचे लक्ष विशेष वेधून घेतले. पण सगळ्याच झुडपाचे कौतुक करण्याचा आमचा अट्टाहास मात्र

चागलाच भोवला. टणटणीसारख्या पण मासल पानांच्या झुडपास विजयनने हात लावला मात्र, विंचू डसल्यासारखे झाले त्याला. हाताला भयानक खाज सुटली, आग झाली आणि बोटे सुजली. उगीच नाही या झुडपाजवळ रॉबिन ॲक्सेंटर घरटे करताना आणि मार्मोट बीळ करताना आढळला. इतके प्रभावी सरक्षक कवच या प्रदेशात कोणते मिळणार.

मनातल्या मनात मी घोड्यावर जळफळत होतो, पण सावकाश चालत, आजूबाजूला पहात निरखीत जाण्याची सधी मिळाली म्हणून समाधानही वाटत होते. लवकरच आमच्या या श्रमाचे सार्थक झाले.

या भागात मार्मोट खूप आहेत, हे सकाळीच आमच्या लक्षात आले होते. सध्याकाळ होऊ लागली होती, उन्हे कलली होती. आकाश अभ्राच्छादित होते आणि पावसाचे थेब मधून मधून अगावर येत होते. ही वेळ या प्राण्याची बाहेर पडण्याची असावी. आपली बिळे सोडून प्रवाहाच्या काठापर्यंत आलेले मार्मोट आम्हाला पहायला मिळाले. त्याचे छायाचित्रही मी घेतले.

शिवाय पाढऱ्या छातीच्या डिपरने आम्हाला सहकुटुब दर्शन दिले ते निराळेच. तो कर्कश्श चिवचिवला, तेव्हा दुरूनच माझे त्याच्याकडे लक्ष गेले. तो लगेच उडाला नाही, म्हणून मी प्रवाहाच्या जवळ गेलो. पाहतो तो स्वारी प्रवाहामधल्या एका खडकावर उभी राहून शेपूट नाचवीत इकडेतिकडे पहात कर्कशत होती जणू माकडाचा सिनेमा पहायला या, म्हणून फेरीवाला पोरेसोरे गोळा करतो आहे. मी आजूबाजूस पाहिले. दुसऱ्या तीरावरील दोन खडकाच्या आडोशाने आणखी तीन पक्षी होते. काळपट, तपकिरी रंगाची आणि छाती-वरील पाढरा ठिपकाही पुसट असलेली सौ. डिपर मी ओळखली. तिच्याजवळच तिची दोन अपत्ये उभी होती. त्याचाही रंग भुरकट-तपकिरी होता आणि अगावर पुसट पाढरे ठिपके होते. त्या कलत्या उन्हातही या सुखी ससाराचे छायाचित्र टिपण्याचा मोह मला आवरला नाही. जणू डिपर त्याचे घर आणि कुटुब पाहण्यासाठीच मला बोलावीत होता.

आम्ही कँपवर परतल्याचा जास्त आनद झाला असावा डॉ. डोग्राना. बरेच दिवसानी त्याना काम मिळाले होते.

☐

तेवीस जुलै

एकोणीस

# मार्मोट

काल रात्री कल्पना आली नाही की आपल्याला इतके लागले असेल. सकाळी उठलो तर उजवे मनगट हात लावू देईना! डॉ. डोग्राकडे धाव घेण्याशिवाय गत्यंतर नव्हते. मग साग्रसंगीत तपासणी झाली, इतर सर्वांच्या साक्षीने आणि समक्ष माझ्या मनगटाला लाकडी पट्टीचा आधार आणि हात अडकावयाला मला गळ्यात झोळी मिळाली, आणि डॉक्टरानी प्रिस्क्रिप्शनही लिहून दिले! शिवाय लेहला गेल्यावर हाताचा एक्स-रे काढायचा असेही बजाविले. मोहिमेवरून जखमी होऊन परत आलेल्या वीराकडे सर्वांची सहानुभूती वळणार म्हणून इतरांना योग्य त्या प्रमाणात वैषम्यही वाटले. झोळी आणि हाताचे बँडेज कसे लपविता येईल याचा मी विचार चालविला होता.

उद्या सकाळी आमचा मुक्काम इथून हलणार आणि आम्ही पुगाला परत जाणार. तिथे एक दिवस राहून आवराआवरी करून आम्ही लेहला परतणार. म्हणजे मोहिमेचा आजचा शेवटचा दिवस— आजची भैरवी कशी काय वठणार अशी एकीकडे चिंता तर दुसरीकडे परत जाण्याची हुरहुर. सध्याकाळपर्यंत पुण्यापर्यन्त मनाच्या कितीतरी फेऱ्या झाल्या.

त्सो मोरीरीपर्यन्त पुन्हा आज जाऊन आम्ही काय दिवे लावणार ही कल्पना सलीम अलींना असल्यामुळे त्यानी आसपास हिंडून काय काय दिसते हे पाहण्यास आम्हास सांगितले आणि माझी मलमपट्टी होईपर्यन्त ते आणि विश्वास चालतेही झाले. विजयनचे अंग ठणकत असल्याने तो तबूत पडून होता, उद्या

निघण्याची तयारी करायला हवी म्हणून हुसेन मागे राहिला, आणि तबूत बसून राहण्यास डॉक्टराची हरकत नसतानाही बसून कटाळा येईल म्हणून मी बाहेर पडलो.

माझ्या दृष्टीने आजच्या दिवसात दोन-तीन गोष्टी तरी साध्य होणे जरूर होते. मार्मोटचे चागले छायाचित्र मला अजून मिळाले नव्हते. डिपर पुन्हा भेटला तर हवा होता आणि त्सो मोरीरीच्या वाटेवर ठराविक जागी दिसणारा एक रेडस्टार्ट (हॉजसनचा रेडस्टार्ट) छायाचित्र घेण्यासाठी योग्य ठिकाणी सापडायला हवा होता.

तबूतून बाहेर पडून मी त्सो मोरीरीच्या वाटेला लागलो. नेहमीच्या जागेवर रेडस्टार्ट आहे किंवा नाही याचा शोध डोळे घेत होते. प्रथम मला तो दिसला नाही. पण थाबून मी इकडेतिकडे निरखीत असताना पलिकडील डोंगराच्या उतारावरून तो हलकी शीळ घालीत आला, एका लहानशा दगडावर टेकला आणि मी त्याच्यावर लक्ष केंद्रित केले.

हा रेडस्टार्ट होता स्थलातरीत रेडस्टार्टपेक्षा किंचित् मोठा, शरीर लाबुळके असलेला, पख भुरके आणि पोट ताबडट-तपकिरी असलेला. उडताना आणि बसल्यावरही त्याच्या पखावरचे मोठे पाढरे ठिपके दाखविणारा. तो या दगडावरून त्या दगडावर उडत होता, मध्येच प्रवाहाच्या काठापर्यंत पोहोचून परत येत होता. मध्येच पाण्यामधल्या खडकावर टेकून जणू आपले प्रतिबिंब पाहात होता माझ्यापासून तीस-चाळीस फुटापलिकडे तो फारसा गेला नाही आणि मला त्याने छायाचित्रे मनसोक्त घेऊ दिली.

त्याला धन्यवाद देऊन मी पुढे गेलो. पूर्वेकडच्या उतारावरच काल आम्हाला पुष्कळ मार्मोट दिसले होते आणि या उताराजवळ पोहोचताच एक मार्मोट भराभर पळत येऊन आपल्या बिळात शिरताना मी पाहिला बिळापासून तीस-चाळीस फूट अतरावर मी बसून राहिलो. हे बीळ चागले मोठे होते. त्याचे तोंड फूट-दीडफूट व्यासाचे होते आणि जवळच त्या भयानक काटेरी झुडपाचे संरक्षक कवचही होते.

मी जागा धरून बसल्यानतर थोड्याच वेळात मार्मोटने बिळाबाहेर डोके काढले, माझ्याकडे पाहिले आणि तो पटकन् आत गेला. माऊस-हेअरप्रमाणे अर्थातच तो पुनश्च बिळाबाहेर डोकावलाच. यावेळी त्याने खारीच्या आवाजा-सारखा पण जास्त कर्कश्श चीत्कार केला. बिळाबाहेर डोके काढून तो

माझ्याकडे आणि मी त्याच्याकडे कितीतरी वेळ टक लावून पाहत होतो. त्या अवस्थेत मी त्याचे छायाचित्रही घेतले आणि सुमारे पाऊण तासाच्या या वेळात त्याने एकूण चौदा वेळा चीत्कार केला. त्याच्या शेवटच्या आरोळीला प्रवाहाच्या पलिकडून अनपेक्षितपणे उत्तर मिळाले. माझ्याप्रमाणे त्यालाही हे प्रत्युत्तर अपेक्षित नसावे. त्याने लक्षपूर्वक, स्तब्ध बसून कानोसा घेतला आणि मुकाट्याने तो बिळात निघून गेला.

काल डिपर-कुटुंब मला जेथे दिसले होते, तेथपर्यंत मी गेलो. पण आज डिपरचा पत्ता नव्हता. एक टर्न पक्षी मात्र प्रवाहावर चकरा मारीत होता. मी आणखी पुढे गेलो नाही, हवा खराब होत होती, हिमवृष्टी होणार अशी चिन्हे दिसत होती; शिवाय आपला हात दुखावलाय, 'जखमी' माणसाने उगीच भटकत राहणे बरे दिसत नाही, असाही सोयीस्कर विचार करून मी परत फिरलो.

दुपारी चार-साडेचारला मी पुन्हा तंबूबाहेर पडलो माझ्याबरोबर आताही कोणी येणे शक्य नव्हते. सलीम अली आणि डॉ. विश्वास याना परत येण्यास खूप उशीर झाला होता, तेव्हा ते इतक्या लवकर पुन्हा बाहेर पडणे शक्य नव्हते. हुसेन आणि विजयन याची वामकुक्षी अजून चालू होती.

मी पुन्हा त्सो मोरीरीच्या दिशेने निघालो. रेडस्टार्टच्या नेहमीच्या ठिकाणी तो नव्हता. एक तिबेटी रेव्हन पलिकडच्या तीरावर उडत होता. मध्येच जमिनीवर उतरत होता. प्रवाहापलिकडच्या उचवट्यावरून तीस-चाळीस याकचा एक कळप सावकाश खाली उतरून येत होता. त्याच्याबरोबर काही मेंढ्या आणि तीन-चार घोडेस्वार होते. याकवर सामान लादलेले दिसत होते. एक मोठे कुटुम्ब बहुतेक त्सो मोरीरीच्या दक्षिणेकडे निघाले होते. ते ज्या बाजूने येत होते त्या बाजूला कोणतीतरी खिंड असावी असे दिसत होते.

त्या ताफ्याचे मी छायाचित्र घेतले आणि पुढे चालू लागलो. काल याच-वेळी मला डिपर दिसला होता. पण आज मात्र त्याचा पत्ता नव्हता. पुढे जावे का परत फिरावे, याचा विचार करीत असतानाच माझी नजर पूर्वेकडच्या डोंगर-उतारावर गेली. सुमारे शभर फूट अतरावर काही सोनेरी गोळे टणटणत होते, घरंगळत होते, धडपडत होते. मार्मोटची ती सहा पिले होती, आणि बिळाबाहेर येऊन खेळत होती.

मी सावकाश त्याच्या दिशेने पुढे पुढे जाऊ लागलो. वाटेत मधून मधून

थबकून मी छायाचित्रे घेत होतो. त्यांच्या आपसात कुस्त्या चालल्या होत्या, कोणी कोलांट्या खात होता, कोणी दुडदुडत, भरकटत होता, तर कोणी लपाछपी खेळत होता. हे सर्व टिपण्यास आपल्या हातात 'मूव्ही कॅमेरा' नाही याचे मला वाईट वाटले. मी त्यांच्यापासून सुमारे पन्नास फूट अंतरापर्यंत पोहोचल्यावर माझ्याकडे त्याचे लक्ष गेले. त्यातले दोघे-तिघे खेळतच राहिले, तर दोघांनी माझ्याकडे अर्धवट कुतुहलाने, अर्धवट संशयाने पाहिले, नाकाला नाक लावून जणू हितगुज केले. ते दचकणार नाहीत या बेताने मी आणखी पुढे सरकलो. मग मात्र सर्वच माझ्याकडे पाहू लागले. एकमेकांच्या जवळ सरकले, एकमेकांच्या नाकी-कानी लागून खलबते करू लागले. मी एकापाठो-पाठ एक छायाचित्रे घेत होतो. एवढ्यात दूरवरून एक चीत्कार कानावर पडला. मी वळून पाहिले. सुमारे तीनशे फुटांवरून एक मोठा मार्मोट चीत्कारत होता. ती या छोट्यांची आई असावी का? त्यांना इशारा देत असावी का? कारण त्या सर्वांनी तिचे चीत्कार लक्षपूर्वक ऐकले आणि ते एकापाठोपाठ एक बिळात गेले.

मी मोठ्या खुशीत परत फिरलो. आज शेवटचा दिवस. भैरवी उत्तम वठली होती



सलीम अली घरट्याचे निरीक्षण करताना

☐

चोवीस जुलै

वीस

# परत

आज दुपारी १२-३० वाजताच पुगाला रेड्डींच्या तळावर आम्ही दाखल झालो. पुगाहून त्सो मोरीरीला पोहोचण्यात जवळजवळ दिवस गेला होता. अर्थात् मेजरसाहेबाची कर्तबगारी आजच्या झट-पट प्रवासास कारणीभूत होती. गेले दोन दिवस आम्ही त्सो मोरीरीच्या परिसरात भटकत होतो तर मेजरसाहेब जोंगा घेऊन पुगाला जा-ये करीत होते. पेट्रोल आणि इतर सामग्रीची आणाआण करण्यासाठी असंख्य चपट्या कपच्यांनी भरलेले ते भयानक चढउतार पार करणे हा त्यांच्या हातचा मळ झाला होता.

येताना खर म्हणजे आम्ही रस्ता चुकलोच होतो, टेकड्यांच्या या अवाढव्य पसाऱ्यात तसे घडले नसते तरच नवल. या टेकड्यांच्या पसाऱ्यात आम्ही म्हणजे धान्याच्या राशीतले पोरकिडे. पण आता मात्र मेजरसाहेबाना वाट अचूक सापडली. आमच्या पाठीमागची सुमारे दोन हजार फूट उंचीची एक टेकडी वळणे घेत, घरघरत आमच्या जोंगा एकदाच्या चढल्या, त्या आल्या एका विस्तीर्ण सपाट, पठारावर. इथल्या कुरणात याक आणि मेंढ्या चरत होत्या. या पठारावरील एक-दोन टेंगळे मागे टाकून आमच्या जोंगा ज्या दौडल्या, त्या आल्या एकदम पुगा-तळाच्या दक्षिणेकडील टेकड्याच्या माथ्यावर. दीड हजार फूट खाली तबूचे शहर इवलेसे दिसत होते.

इथे आम्ही अमळ थाबलो – चालकाना विश्राती देण्यासाठी. जवळपास सोळा हजार फूट उचीवरच्या त्या पठारावर हिंडताना कोणाला तरी एक ‘माऊस-हेअर’ दिसला. लगेच पळापळ झाली, जवान लोकाना करमणुकीस काहीतरी साधन

हवेच होते. कपच्या आणि फरशा यांच्याखाली दडणारे माऊस हेअर पकडण्यासाठी धावपळ झाली. कोणीतरी कुदळ आणली आणि तीन जिते माऊस-हेअर मुकाट्याने आमच्या स्वाधीन झाले. हा प्राणी दिसतोच इतका गोजिरवाणा की पहिल्या दृष्टिक्षेपातच कोणीही त्याच्या प्रेमात पडावे. डॉ. डोंग्रांनी तेथल्या तेथे त्याना दत्तक घेऊन टाकले. त्याच्यासाठी कोवळे, लुसलुशीत गवत मिळविण्यासाठी डॉक्टरसाहेबाचा आटापिटा सुरू झाला.

हुसेनला इथे एक नवीन पक्षी दिसला होता. त्याच्या मागावर जाऊन हुसेनने शेवटी ती शिकार मिळविली. 'ब्लॅनफोर्डचा स्नो फिंच' सलीम अलींनी ओळख करून दिली. त्सो मोरीरीजवळ त्याच पक्ष्याने आम्हाला निसटते दर्शन दिले होते.

यानंतर थोड्याच वेळात सुरू झाला पुगाचा भयानक उतार. पुन्हा एकदा जीव मुठीत धरून बसणे, सलीम अलींचे तोंडातल्या तोंडात पुटपुटणे आणि विजयनचा चंद्रावर जाणाऱ्या यानात बसल्यासारखा झालेला चेहरा! पण पुगाला आम्ही सारेजण व्यवस्थित, धडपणे पोहोचलो. लेहचे विकास आयुक्त रहमान आमच्या स्वागताला हजर असलेले पाहून बरे वाटले — लेहला आपली सोय आता व्यवस्थित होणार या स्वार्थी विचाराने!

आता जास्त काही लिहिण्यास मनच घेत नाही. कारण ते आता धावते आहे. उद्या पुगाहून लेह, तेथून पाच-सहा दिवसानी श्रीनगर आणि तेथून पुणे.

बाधाबाध करून उद्या इथून केव्हा निघतोय हेच पाहायचे.

**पचवीस जुलै**

सकाळ्यासून निघण्यासाठी मी चुळबुळ करीत असलो तरी आम्हाला निघायला नऊ वाजून गेले, उन्हे चागलीच चढली. रेड्डींचा निरोप घेताना मात्र एक क्षणभरच का होईना, आपण परत चाललोय ही किती चांगली गोष्ट आहे, याचा विसर पडला. या माणसामुळे आमचा पुगाचा कार्यक्रम व्यवस्थित पार पडलाच पण वेळही मजेत गेला.

निघताना अर्थातच अनेकांशी हस्तादोलनाची वेळ आली आणि माझे बिंग फुटले. आतापर्यंत मी हाताची पट्टी आणि बँडेज बहुतेकापासून लपवून ठेवले होते, आता डाव्या हाताने हस्तांदोलन करताना अर्थातच प्रत्येकाने माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले आणि मला थोडक्यात प्रत्येकाला सागावे लागले.

आम्ही पुगाला येत होतो त्यावेळी पुगा नाल्याच्या कडेने टॅमॅरिस्कची झुडपे बहरून गेलेली मी पाहिली होती पण गेल्या नऊ दिवसात त्याचा बहर संपला होता. छायाचित्र घ्यावे म्हणून मला मनासारखा गुलाबी गुच्छ कुठे आढळेना.

सिंधू नदीच्या उजव्या तीरावरून प्रवास करीत आम्ही दुपारी चुमाथागला पोहोचलो आणि तेथे चक्क मुसळधार पावसाने आमचे स्वागत केले. चुमाथाग-पर्यंत सिंधूचा प्रवाह साधारणपणे सम आहे, एक-दोन ठिकाणीच पात्रातील खडकांशी तो झोंबी खेळत आहे (रॅपिड्स) काठाने भरपूर टॅमॅरिस्क आहे. तमा (कॅरगाना) मात्र या भागात नाही. डोंगर आहेत अनेकरंगी — चटणीच्या रंगाचे, आमसुली आणि पिवळे.

पण आता मधूनच एखादे खेडे लागते त्याच्याभोवतीची हिरवीगार शेते नजर सुखावतात, मधूनच गुलाबाचे झुडूप आणि त्यावर अजूनही रेंगाळणारी गुलाबाची फुले दिसतात.

सिंधूच्या काठाने अजूनही जोंगा धावतच असतात. पण रस्त्यावरची रेती आता कमी होते, मधूनमधून डोंगर निथळणारे ओढे लागतात, खेड्याच्या भोवती पोपलर आणि जर्दाळूची झाडे दिसू लागतात आणि मधूनच काळा-पांढरा मॅगपाय इकडून तिकडे जाताना दिसतो.

जोंगा आणखी पुढे जातात, वरवर चढतात. सिंधू नदीने पाडलेल्या घळईतून सावकाश पुढे सरकतात. निरुंद घळईतून सिंधू फेसाळताना दिसते. पिवळे आणि तपकिरी रंगाचे डोंगरउतार, झेब्र्यासारखे पट्टे असलेला एक डोंगर, आपण आश्चर्याने पाहतो आणि भोवतालच्या डोंगराचे रूपही सावकाश बदलत चालल्याचे आपल्या लक्षात येते.

दगडाच्या कपच्या आणि भुगा यांनी भरलेले डोंगर-उतार आता मागे पडतात आणि सिंधू नदीने आपल्या दोन्ही बाजूंना उभी केलेली बदामी-पिवळ्या रंगाच्या प्रचंड पाषाण कड्यांची भव्य तटबंदी दिसते. सँडस्टोनच्या बेलाग पाषाणकड्याचे रौद्र सौंदर्य पाहण्यात मन गुतलेले असतानाच सूर्यास्ताची वेळ जवळ आल्याचे लक्षात येते.

मेजरसाहेब जोंगांना इशारा देऊन थांबवतात. लेहला पोहोचण्यात फार रात्र होता कामा नये असे बजावितात आणि आपण पुढील तयारीसाठी झपाट्याने कूच करीत असल्याचा निर्णय जाहीर करतात. त्याची जोंगा वेगाने वळणाआड होते.

आम्ही संथपणे, सिंधूच्याच गतीने पुढे जात असतो. एका वळणावर

आकस्मिकपणे पुढची जोंगा थांबते. प्रत्येकजण 'काय झाले ?' म्हणून बाहेर डोकावतो. अमरसिंग पुढे जाऊन पाहून येतो. पाठोपाठ आम्हीही खाली उतरतो. वळणापलिकडे मेजरसाहेबांची जोंगा उलटलेली दिसते. तिच्या पुढच्या काचेचा चक्काचूर झालेला असतो वरच्या सांगाड्याला ठिकठिकाणी बाक आलेला दिसतो. शेजारी वाळूच्या ढिगावर मेजरसाहेब बसलेले दिसतात. त्यांच्या नाकातून रक्ताचा ओघळ वहात असतो. हाताला जागोजागी खरचटलेले दिसते.

डॉ. डोग्रा आणि त्यांचे मदतनीस धावत येतात. मेजरसाहेबाचा ताबा घेतात, त्यांना ॲम्ब्युलन्समध्ये बसविले जाते. बाकीचे लोक मेजरसाहेबाची जोंगा पुनश्च चाकांवर उभी करतात. गाडी चालण्याच्या स्थितीत असते. लेहला लवकर पोहोचले पाहिजे या निर्धाराने सर्व पुढे निघतात.

सिंधू नदी आता घळईतून बाहेर पडून एका प्रशस्त पात्रातून वाहते. तिच्या दोन्ही बाजूस आडव्या गच्च्या आणि त्या पाठीमागे कच्च्या लोखंडाच्या रंगाचे पर्वत दिसतात दूरवर क्षितिजाला भेदून वर आलेले एक हिमशिखर दिसते आणि निळ्या आकाशात संथ फिरणारा केस्ट्रेल ससाणा दिसतो.

उपशी आणि तेथून मनालीकडे जाणारा रस्ता मागे टाकून जोंगा लेहकडे जाणाऱ्या विस्तृत खोऱ्यात उतरतात. डोंगर दूर जातात, सिंधूचे पात्र खोऱ्यात कुठे तरी हरवते, पर्वताकडे सावकाश चढत जाणाऱ्या भूमीवर हिरवी शेते दिसतात आणि मधूनच उंच पताका फडकाविणारा, रंगीबेरंगी तिबेटी गोम्पा आणि डोंगरात खिडक्या पाडल्यासारखी दिसणारी घरे पहायला मिळतात.

सूर्यास्त होत असतो. झासकर पर्वतमालेच्या पल्याड एक मोठा नारिंगी-तांबडा गोळा बुडताना दिसतो. एका मोठ्या मेघखंडाआडून त्याच्या शलाका आकाशात घुसतात, ठिकसेच्या टेकडीवरील गोम्पाला झळाळी देतात. हिरव्या शेतांतून, पोपलरच्या रांगातून, घराकडे परत फिरणाऱ्या बाया-बापड्यांना आणि त्यांच्या शेळ्या-गुरांना बाजूला सारीत आम्ही शेजवळ येतो. तिथल्या होळ घातलेल्या प्राणिसंग्रहालयाला ओलांडून लेहच्या वेशीत येतो. तेव्हा रात्र पडते, अकस्मात् विजेच्या दिव्यांनी दूरवर रात्र पेटल्यासारखी वाटते. डोंगराआडून लेहचे दिवे लुकलुकतात, लेहच्या धडधडणाऱ्या जनरेटरची आठवण येते आणि शेवटचा लाडिक चढ चढून आम्ही लेहमध्ये प्रवेश करतो. □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५९६
क्र. २२५४५

# लडाखमध्ये आढळणाऱ्या काही पक्ष्यांची उत्क्रांतीच्या अनुक्रमानुसार सूची

Great crested grebe
Grey heron
Tufted pochard
Brahminy duck
Barheaded goose
Red crested pochard
Garganey teal
Feruginous duck
Blackeared kite
Golden eagle
Pallas's fishing eagle
Goshawk
Longlegged buzzard
Roughlegged buzzard
Lammergeier
Black vulture
Saker falcon
Kestrel
Central Asian Hobby
Blacknecked crane
Coot
Tibetan partridge
Chukor
Lesser sandplover
Common sandpiper
Green sandpiper
Redshank
Common snipe
Little stint
Temminck's stint
Brownheaded gull
Common tern
Blue rock pigeon
Turkestan hill pigeon
Rufous turtle dove
Eagle owl
Snow cock
Swift
Hoopoe
Short-toed lark
Bimaculated lark
Horned lark
Callandra lark
Kashmiri skylark
Crag martin
House martin
Sand martin
Collared sand martin
Common swallow
Twite
Golden oriole
Rosy pastor
Spotless starling
Willow warbler
Chiffchaff
Tickell's thrush
Blue rock thrush
Lesser white-throat
Blue-throat
Ruby-throat
Guldenstadt's redstart
White-capped redstart
Common redstart
Rock bunting
Desert wheatear
Pied wheatear
Collared bush chat
White breasted dipper
Tree pipit
Water pipit
Grey wagtail
Hodgson's pied wagtail
Gray-headed yellow wagtail
Yellow-headed wagtail
Yellow-backed wagtail
Kashmiri house sparrow
Brown Accentor
Robin Accentor
Great rose-finch
Goldfinch
Gold-fronted finch
Hodgson's rose-finch
Tibet snow-finch
Himalayan mountain finch
Blanford's mountain finch
Grey tit
Magpie
Red-billed chough
Yellow-billed chough
Carrion crow
Raven

REFBK-0022545